# माणूस



जानेवारी ६५

५२ पै.



मराठी ग्रंथसूचीचे कर्ते
कै. शं. ग. दाते

## श्रद्धांजलि

हारीने स्थित ग्रंथराज दिसती ग्रंथालयी सिद्ध हे ।
सूची नित्य करात वाङमयखनी संदर्भसाह्यास ये ॥
झाले आजवरी मराठित किती ग्रंथादि जे वाङ्मय ।
आले सूचिस्वरूपि सन्निध गमे, पाहूनि हो विस्मय ॥ १ ॥
सूची आयुभरात ध्येय धरिले जे वाङ्मया भूषण ।
कर्ता तीन तपे तयात श्रमला लावूनि बुद्धी मन ॥
एकाकी करुनी अखंड टिपणे जाऊनि ग्रंथालयी ।
देहातील प्रदीप्त यत्न न कधी मंदावला अल्पहि ॥ २ ॥
सारे अर्पित यज्ञसे गमतसे सारस्वता जीवन ।
दृष्टी शोधित वाङ्मया रमतसे ग्रंथादि दैनंदिन ॥
भावे[१], देव[२], मुजूमदार[३] नि खरे[४], ते राजवाडे[४], भिडे[५] ।
माटे[६], मोडक[७], शुक्ल[७], केतकर[८] अन् ते भातखंडे[९], पदे[१०] ॥ ३ ॥
मोल्स्वर्थ[११], कँडि[११] नि ओक[११] तेवि आपटे[११], चित्राव[१२] अन् रानडे[११] ।
दाते त्यांतील एक थोर ऋषिसे येतात दृष्टीपुढे ॥
ज्ञाते, पंडित ग्रंथसूचि बघुनि येतील ती मागुती ।
यावच्चंद्रदिवाकरी कृति अशी राहील सारस्वती ॥ ४ ॥

**टीपा** : १ सारस्वतकार, २ समर्थ वाङ्मय संशोधक, ३ व्यायाम ज्ञानकोशकार, ४ इतिहास संशोधक, ५ व्यावहारिक ज्ञानकोशकार, ६ विज्ञानबोध, महाराष्ट्र सांवत्सरिक, अस्पृष्टांचा प्रश्नकार, ७ व्याकरणवेत्ते, ८ ज्ञानकोशकार, ९ संगीत शोधक, १० आयुर्वेदाचार्य, ११ शब्दकोशकार, १२ चरित्रकोशकार.

*–ग्रंथालयविहारी*

वर्ष चौथे : अंक दहावा

★

१ जानेवारी १९६५ : बावन्न पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

दूरध्वनी : ५७३५९




## स्वरूप-दर्शन

कथा :

- नवे नाते
  - लछमन हर्दवाणी
- आंबेगावची आवा
  - राधाबाई आपटे

कविता :

- कै. शं. ग. दाते
  - ग्रंथालयविहारी

ललित लेख :

- 'मामां'च्या नव्हे 'माझ्या' आठवणी
  - प्रा. भीमराव कुलकर्णी

चालू पुस्तकपरिचय :

- नाझी भस्मासुराचा उदयास्त
  - रा. म. शास्त्री

शास्त्रीय लेख :

- १९६५ साल कसे जाईल ?
  - श्री. के. केळकर

नेहमीची सदरे :

- जगाच्या पाठीवर, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, राजकीय घडामोडी

मुखपृष्ठ :

- अनंत सालकर

१. **वर्गणीदारांस सूचना :** दीपावली व सर्व खास अंकासह माणूसची वार्षिक वर्गणी दहा रुपये व परदेशी पंधरा रुपये आहे.

२. **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ पैसे वटणावळ पाठवावी.

३. **अंक न पोचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ व २० तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविले जातात.

४. **लेखकांसाठी :** स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

५. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

६. या पाक्षिकात व्यक्त झालेली मते 'माणूस' पाक्षिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

७. **जाहिरातींचा व्यवहार** हा परस्पर विश्वासाचा असतो. गिऱ्हाइकाच्या इच्छेनुसार जाहिरात छापण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. तरीही काही तांत्रिक अडचणीमुळे जाहिरातीत कमी जास्त फरक झाला तर त्याची जबाबदारी व्यवस्थापकांवर नाही.

# जगाच्या पाठीवर

## □ शुभेच्छापत्रे नि भारतीय चित्रकला

किरिस्तावांच्या पंचांगाप्रमाणं नव वर्ष सुरू होत आहे. पाश्चात्त्य जगात जानेवारीची एक तारीख उजाडणार ती भरल्या पोटी नि सार्वजनिक चुंबनालिंगनांच्या साक्षीनं. दुसरा प्रकार सार्वजनिक स्वरूपात भारताला निषिद्ध आहे. पण 'नवे वर्ष आनंदाचे जावो,' असं तुम्ही आम्ही एकमेकाला म्हणायला तशी काहीच हरकत नसावी; पण अर्धपोटी हा उसना आनंद व्यक्त करणं खरंच किती कठीण आहे नाही? परदेशांशी मोठ्या प्रमाणात व्यापार करणाऱ्या मुंबईच्या एका पेढीनं दरसालच्या रिवाजानुसार यंदा असली शुभेच्छापत्रं युरोप-अमेरिकेला पाठविली नाहीत! व्यवस्थापक म्हणाले, "अहो, आमच्या अन्नान्नदशेची इतकी जाहिरात तिकडे झाली आहे की आम्ही अशा पत्रिका धाडणं शुद्ध ढोंगीपणाचं ठरेल! एका अमेरिकन व्यापाऱ्यानं मला असली पत्रिका धाडली आहे नि तिच्यावर हस्ताक्षरात एक ओळ लिहिली आहे, "नवे वर्ष तुम्हाला भरल्यापोटी जावो!"

शुभेच्छापत्रिकाचा विषय निघाला आहे, म्हणून एका गोष्टीकडे वाचकांचं लक्ष वेधावसं वाटतं. जर्मनीतल्या एकदोन चित्रकलासंग्रहात जुन्या भारतीय चित्रकलेचे काही उत्कृष्ट नमुने आहेत. या चित्रावरून बनविण्यात आलेली लक्षावधी कार्डे दरसाल युरोपात खपतात. मला माझे जर्मन मित्र विचारतात, "असल्या सुंदर चित्राचं आगरच तर भारतात आहे. तुम्ही त्यांची कार्डे छापून इकडे युरोप-अमेरिकेत विकली तर कोट्यवधी रुपयाच परकीय चलन मिळवू शकाल!"

आतापासूनच कुणी या विषयाकडे लक्ष पुरविलं तर निदान १९६५ च्या नाताळची चित्रकार्डे तरी सहज परदेशात खपविता येतील. मात्र तिकडच्या जनतेच्या कलाभिरुचीची कल्पना असणाऱ्यानीच या क्षेत्रात उतरावं. आधुनिक परदेशी चित्रकलेची भ्रष्ट नक्कल करणाऱ्या तथाकथित भारतीय चित्रकारांना तिकडे बिलकुल मान मिळत नाही, हीही गोष्ट सहज ध्यानी धरावी!

नवं वर्ष तुम्हाआम्हाला ढेकरमय ठरो!

## □ पराक्रमी दमयंती जोशी!

परदेशात पराक्रम गाजविणाऱ्या तरुण–तरुणींचं किती म्हणून कौतुक करावं, असं मला होऊन जातं. मला बहिणीप्रमाणं झालेल्या कलकत्त्याच्या उषानं एकेकाळी पॅरिसनगरीला मोहून टाकल, ते स्वत:च्या नृत्यकलेच्या जोरावरच! आता ती एका संपन्न फ्रेंच उद्योगपतीची घरधनीण झाली आहे नि सुखाचा संसार करत आहे.

अलीकडेच दमयंती जोशी या महाराष्ट्रीय सुकन्येनं युरोपातल्या काही देशाना भेटी दिल्या नि तिथल्या रसिकांना स्वत:च्या पदन्यासानं गुंगवून टाकलं. मूर्ती छोटी पण कीर्ती मोठी, असा प्रकार आहे दमयंती जोशीचा. "परवाच्या तुमच्या दौऱ्यात तुमचं सर्वांत जास्त कौतुक कुठं झालं?" असा माझा प्रश्न ऐकताच त्या पटकन बोलून गेल्या, "अर्थात पॅरिसला!"

नृत्यकलेच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कीर्ती कमावलेल्या दमयंती जोशी स्वत:विषयी अभिमानानं एक शब्द बोलतील तर शपथ. दहावेळा तुम्ही एखादी गोष्ट विचाराल तेव्हा कुठं चारदोन शब्द त्या स्वत:विषयी बोलतील. फार मोठी तपश्चर्या गाठीशी बांधून राहिलेली ही कमनीय नृत्यांगना इतकी शालीन, इतकी मृदुभाषिणी आहे की विचारू नका! आजच्या जाहिरातीच्या जगात स्वत:चे ढोल सतत वाजवत राहणाऱ्या नामधारी कृत्रिम कलाकारांनी त्यांच्यापासून थोडातरी बोध घ्यावा!

इंग्लड, फ्रान्स आणि जर्मनी या देशांतल्या त्यांच्या नृत्यप्रयोगांची तिकडे फार वाखाणणी झाली. त्यांच्या कलेचं मूल्य किती मोठं ठरू शकतं, याची कल्पना आमच्या रिझर्व बँकेला तरी नक्की असेल. भारतीय नृत्यकला युरोप–अमेरिकेतली परदेशी गंगाजळी भारताला खेचून आणू शकते! दमयंती जोशीच्या पदकमलात लक्ष्मी आहे!

परंपरागत नृत्यकलेचा अभ्यास दमयंती जोशीनी कसून केलेला आहे हे तर झालंच. पण कोणतीही कला वर्धिष्णू असावी लागते, याची त्याना जाणीव असल्यानं प्राचीन नृत्यकलेला कोणते नवे आविष्कार चढविता येतील याचा त्या नेहमी विचार करत असतात; त्याचे नवनवे प्रयोग त्या सतत करत असतात. कथ्थक धर्तीचे कितीतरी नवे नृत्यप्रकार त्यानी बसविले आहेत, हे जाणकाराना काही सांगायला नको.

दमयंती जोशीच्या प्रतिभेचे काही नवे उन्मेष, काही लोभनीय अलंकार लवकरच रसिकांच्या दृष्टीला पडणार आहेत, असा माझा अंदाज आहे.

पण त्यासंबंधी इतक्यातच काही बोलणं त्यांना आवडणार नाही. आधी केले, मग सांगितले, या तत्त्वावर त्यांचा विश्वास आहे ना!

**नवे वर्ष ढेकरमय जावो!**



त्र्यं. न. कुलकर्णी

## □ गंगाफळे खायला शिका !

काळ बदलेल त्यानुसार माणसालाही बदलावं लागतं, नाही का ? पन्नास वर्षांपूर्वी वनस्पती तूप कुणी खाल्लं असतं का ? आज तर तेही परवडत नाही. नवरात्रात साध्या गोडयातेलाचा दिवाही उजळवणं अशक्य झालं आहे, तिथं तुपाच्या नंदादीपाची गोष्टच कशाला ?

जाडयाभरडया तांदळाचं दर्शन दुर्लभ झालंय् म्हणे. 'सर्वारं-भास्तंडुलप्रस्थमूला !' परवा एका विवाहसमारंभाला मी गेलो होतो, तर तिथं कसल्यातरी चपटया जोंधळयाच्या अक्षता वाटण्यात आल्या होत्या. बोला, 'शुभमंगल सावधान !'

ही प्रस्तावना अशासाठी केली आहे की, तुम्ही माझं पुढचं भविष्य शांत मनानं ऐकून घ्यावं. ऐकणार ? हं, ऐका तर !

"तुम्ही आम्ही आणखी दहावीस वर्षांत गंगाफळ खाऊ लागणार ! आमच्या मुलांच्या तोंडाला तर मत्स्याहाराचं नाव निघालं म्हणजे आताच पाणी सुटतं ! या पुढच्या पिढीच्या स्वयंपाक घरातच नव्हे तर त्यांच्या सुटाबुटांतही मत्स्यगंध दरवळणार !"

हे भविष्य ऐकून काहीजण नाकाला रुमाल लावतील हे खरं आहे, पण त्याच रुमालातून ते आणखी काही दिवसांनी गंगाजळांची मंडई करू लागतील ! माझा नाइलाज आहे. सारं जगच मत्स्याहाराच्या आधीन जाऊ लागलं आहे, तिथं तुम्हीआम्ही काय करणार ?

### हिंदी महासागरातलं अन्न

गेली दोन तीन वर्षं हिंदी महासागराचं संशोधन आंतरराष्ट्रीय पातळीवर चालू आहे, हे पुष्कळांना माहीत असेल. त्याचा एक प्रमुख उद्देश असा आहे की या महासागरातली मत्स्यसंपत्ती भारतातल्या पन्नास कोटी मानवी जीवांना जगवू शकेल की काय, या प्रश्नाचं उत्तर शोधणं.

पोटात भुकेची आग भडकविणारा हा अन्नप्रश्न भारताला सध्या छळत आहे, त्याचप्रमाणं कधीतरी अवघ्या जगाला तो सतावणार आहे. म्हणून जगातले शास्त्रज्ञ मत्स्यधनाच्या संशोधनाकडे वळत आहेत. नाहीतरी गंमत अशी आहे की, या पृथ्वीतलाचा जवळजवळ तीन-चतुर्थांश भाग पाण्यानं व्यापला आहे. मानवसमाजाची वस्ती आहे अवघ्या एका चतकोरावर. त्या चतकोरावरच्या चतकोरावर तरी अन्न-धान्य पिकू शकत असेल की नाही याची शंकाच आहे. डोंगर-पर्वत, जंगले, उजाड माळरानं, रस्ते, नागरी वसाहती वगैरेंनी व्यापलेला भाग वजा केला तर शेतीसाठी उपयोगी येणारा प्रदेश किती अल्प आहे, याची सहज कल्पना येईल तुम्हाला.

उलट त्या विशाल जलप्रदेशाच्या पोटात मात्र मासेच मासे आहेत ! मोठा मासा लहान माशाला खातो, हे जीवनकलहाचं तत्त्वज्ञान या माशांनीच तर मानवाला शिकविलं. आपण त्यांना खायला काय हरकत आहे मग ? चला, गुरूची विद्या गुरूला फळली !

माणूस तसा भारी लबाड आहे हं ! काहीतरी गोंडस नावं देऊन स्वत:ची पापे लपविण्यात त्याचा हात कुणी धरू शकेल का ? मासे खाऊन पोट भरायचा स्वार्थी विचार सावतानादेखील दाखवायचे दात निराळे नि खायचे दात वेगळे. या दाखवायच्या दातांना माणसानं नाव दिलं आहे – जलसंस्कृती – Aquaculture !

माशांचं उत्पादन कुठं जास्त होतं, ते वाढविणं कोणत्या भागात अधिक शक्य होईल, कोणते मासे अधिक पौष्टिक नि चविष्ट इ. अनेक प्रश्नांचा विचार सध्या साऱ्या जगातले शास्त्रज्ञ करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाची एक शाखा, 'अन्न आणि शेतकी संघ' (Food and Agricultural Organisation) या नावानं सुविख्यात आहे. तिचे तज्ज्ञ तर रात्रंदिवस या गोष्टीचा विचार करत आहेत. शिवाय प्रत्येक देशानं आपलं एक मत्स्यमारीचं खास खातं ठेवलं आहेच.

एका फ्रेंच शास्त्रज्ञानं मात्र कमाल केलीय् हं. तो म्हणतो, समुद्राच्या पोटात माणसांच्या वसाहतीच स्थापन केल्या तर काय बहार होईल ! फ्रेंच लोकांचा वसाहतवाद आता जलप्रदेशाकडे वळू लागलाय् म्हणायचा ! या शास्त्रज्ञाचं नाव Cousteau. त्याचे पाच शिष्य अलीकडेच एक महिनाभर सतत समुद्रात राहून आले ! या शास्त्रज्ञाचं म्हणणं असं, की सहाशे फूट खोल पाण्यात माणसं राहू शकतील, त्यांना प्राणवायू पुरविण्याची व्यवस्था पृथ्वीवरून यांत्रिक पद्धतीनं करतां येईल ! मासे तर आपोआपच तोंडात येऊन पडतील अन् आपला अन्नप्रश्न हा असा कायमचा मिटेल !

का, कशी आहे कल्पना ?

हसू नका ! आजची कल्पना हे उद्याचं सत्य ठरत असतं ! तुम्ही, नाहीतर उद्या तुमची नातवंडे समुद्राच्या पोटातून तुम्हांला खुशालीची पत्रं पाठविणारच नाहीत अशी खात्री नाही ! ● ● ●

# अन्न प्रश्न कायमचा मिटेल

# आंबेगावची आवा

राधाबाई आपटे

**हा बापूसाहेबांचा मृत्यू होता की आत्महत्या होती ते एक परमेश्वरच जाणे!**

मला आंबेगावला येऊन पाचसहा दिवस पक्के झाले. कुळांच्या मागे लागून त्यांनी दिला तो वसूल आणि वसूल झालं ते घरभाडं घेऊन परत जळगावला जायचं मी ठरविलं. रजा तशी दोन दिवसांची शिल्लक होती. या दिवसांत तसं पाहिलं तर हे दोन दिवस मला पुरलेसुद्धा नसते. कारण माझं सारं बालपण येथेच गेलेलं. गावातली नदी, पिंपळाचा पार, सांभाचं देऊळ, गावाबाहेरची उंच टेकडी, कितीतरी अशा गोष्टी मला प्रतिदिवशी डोळ्यांपुढे दिसत होत्या आणि कित्येक स्मृतिचित्रं डोळ्यांपुढून सरकत होती, पण ती रम्य होती यात काही शंका नाही.

संध्याकाळचे पाच-साडेपाच झाले असतील. उगीच गावात भटकावं, बाजारपेठेतून एक फेरी घालावी असं ठरवून मी घराच्या बाहेर पडलो, दोन वळणंही मी पायाने घेतली आणि नेमका बापूसाहेबांच्याच वाड्याशी आलो. बापूसाहेब म्हटल्याबरोबर कितीतरी गोष्टी माझ्या डोळ्यांपुढून धावत्या सरकल्या. माझ्या लहानपणी बापूसाहेब अगदी ऐन उमेदीत होते. तशी पाहिली तर साठीच्या जवळजवळ त्यांची उमर होती, पण त्यांचा रुबाब आणि रंगेलपणा सगळ्या गावाला पुरून उरला होता. त्यांची भीतीही सगळ्यांना वाटायची, तरीही त्यांच्याशी बोलायला आम्हा मुलांना आवडायचं. आम्हांला कळत नव्हतं ना! तोपर्यंत त्यांच्याशी बोलताना खरंच मजा वाटायची, पण जसं कळायला लागलं, त्यांचे गावातले कारभार कसे चालले होते, याची टोपी त्याच्या डोक्यावर, त्याची टोपी याच्या डोक्यावर, इतकंच नव्हे तर एखाद्याच्या घराला आपण आग लावून त्यावर आपली विडी पेटवून नामानिराळा गृहस्थ होता, हे कळल्यावर मग मात्र आम्हा तरुणांना त्याची किळसच यायची. आम्ही सातआठ मुलांनी त्याला एकदा बडविण्याचाही बेत केला होता, पण बेत सिद्धीस गेला नाही. तो बेत माझ्या आईला कळला, तेव्हा तिने गळ्याची शपथ घालून मला या कृत्यापासून परावृत्त केले. वडिलांना कळलं असतं तर वडील फारच घाबरले असते. आमचे बाबा शांत आणि सरळ. बाबांचं तत्त्वज्ञान एक – अशा नाठाळ माणसांच्या कृपेतसुद्धा जाऊ नये, मग दोषास पात्र तर कधीच होऊ नाही. ते कुणाच्या पाठीस लागले की राक्षस–त्यांना दयामाया नाही, अशा कितीतरी बापूसाहेबांच्या गोष्टी माझ्या डोळ्यांपुढनं गेल्या, पण मला त्यांचा मोह आजही वाटल्याबाचून राहिला नाही. मी मनात विचार केला. दात पाडलेला साप आणि गलित झालेला बुड्ढा आता काय माझं करणार? म्हणून मी त्या बापूसाहेबांच्या जुन्या वाड्यात शिरलो. बापूसाहेब हयात आहेत, हे मला माहीत होतं. भेटावं तरी एकदा. बापूसाहेबांचा वाडा बहुतेक पडल्यासारखाच झाला होता. मधेच उंच अशा दोन माड्या दिसत होत्या. त्याही दुसऱ्यांनी खरेदी केल्या होत्या आणि मग मला कळलं, आता एकटेच बापूसाहेब आहेत आणि ते मळ्यात टेकडीच्या पलीकडे एका झोपडीत राहतात. बापूसाहेबांची माहिती सांगणारांनी हलकेच सांगितलं, 'बापूसाहेब आवडीसकट मळ्यात राहतात. आम्ही केव्हाच त्यांना गावातून पळवून लावलं. म्हातारा आम्ही हद्दपार केला, पण टुणटुणीत आहे–वय जरी झालं आहे तरी धम नाही त्याला. देवाच नाव नाही आणि पुण्याच काम नाही. आवडी, पानतमाखू, पाहिजे तर कधीमधी बाटली यांत पडलेला असतो शोकीन प्राणी.'

मलाही विशेष काम नव्हतं आणि टेकडीवर जायचं हा बेतही माझा शिल्लकच होता. टेकडीवर जाऊ या. जवळ असलेल्या मळ्यात बापूसाहेबांनाही गाठू या आणि आवडी, तिला पाहण्याचा तर मोह मला आवरेनाच– माझी पावले सरसर टेकडीकडे पडू लागली. आवडी तेलिणीला आम्ही आवा तेलीणच म्हणत असू. इतकेच नव्हे तर आम्ही मुलांनीच पाडलेले नाव गावात सगळी म्हणू लागली.

आवा तेलीण म्हणजे आमच्या घरात तरी आम्हा मुलांना फार मोठी करमणूक होती. तेल घालायला आवा आली म्हणजे किती तरी वेळ आमच्या आईशी––आजीशी बोलत बसायची. तेलाबरोबर आम्हा मुलांना काही तरी खाऊ म्हणून रेवड्या, साखरफुटाणे, गुडदाणी, नाहीतर काकड्या, जांभळेहीसुद्धा घेऊन यायची. आमच्या वाड्यातल्या मुलांना सगळ्यांना थोडा थोडा खाऊ देऊन, गोष्टी सांगून, कधी गावातल्या काही लोकांच्या नकला करून पोटभर हसवायची. पाहिलं तर आमच्या आईपेक्षा ती बरीच लहान होती, पण ती म्हणायची, 'तुझी आई माझी सोबतीण आहे. मला मावशी म्हणत जा!' ही आवा तेलीण––आम्ही ब्राह्मण–आम्ही तिला मावशी म्हणतो आहे! कधी कधी आवा आईशी मजघरात कुचकुच हळूहळू गोष्टी करत बसायची–काय बोलायच्या कुणाला ठाऊक! या आवाजवळ माया बरीच होती म्हणे. नवरा जरी नव्हता तरी सोन्याचे दागिने तिच्या अंगावर भरपूर होते. तिची शरीरयष्टी, तिचे पाणीदार डोळे आणि मोकळं हसणं सहज कुणाला मोह घाली. माझी आई तर आवाला नेहमी बजवायची. 'अग, तुम-



च्यात मोहोतूर होतो, मग करत का नाहीस!' आम्हाला या शब्दांचा अर्थमुद्धा त्या वेळेला कळत नसे, पण एक दिवस जे आम्हांला कळलं, ते मात्र वाईट होतं. माझी आई आजीला काहीतरी सांगून सारा दिवस रडत होती आणि रागात म्हणाली--'आवा मेली'. मेली असती तर काय जग ओस पडलं असतं?' त्या बापूसाहेबाच्या घरात आवा डांबली गेली. मात्र त्या दिवसापासून आवा बापूसाहेबांच्या घरी राहू लागली आणि तेल विकण्याचा धंदा तिनं बंद केला. अर्थात आमच्या घरी ती येईनाशी झाली. काही दिवस ते दुःख मात्र आम्हा मुलांना फार वाटलं. नंतर काही दिवसांनी असेल, आम्ही मुलांनी आवा तेलिणीकडे जाण्याचा हट्टच घेतला–जाणं राहिलं बाजूलाच, पण आईने आम्हा मुलांना चांगलंच मारलं आणि म्हणाली, "आवाच्या घरी तुम्हांला नाही जायचं." काही वेळेला मी धिटाई करून विचारलं, 'आवा आपल्या घरी आली तर बोलायचं की नाही.' आईने पदराने डोळे पुसले आणि मला हलकेच म्हणाली 'बोलायचं.'

पुढे पुढे आई-बाबा असेपर्यंत आवडी हक्कानं आमच्या घरी यायची. आईला छान छान खणांची चोळी शिवायची. आम्हालाही पेढे–बर्फी आणून द्यायची, पण आमच्या आईने आवाला कधी ओसरीच्या आत घेतलं नाही. तरी पण एक कपभर चहा आई स्वतः हातानी करून आवाला द्यायची आणि आपणही तिच्याबरोबर चहा पीत तिच्या मनात दबलेल्या भावना लक्ष देऊन ऐकायची.

टेकडीचा चढ चढता चढता बापूसाहेब आणि आवा या दोन व्यक्ती कशा एकत्र आल्या आणि आयुष्यभर त्यांचं जमलं तरी कसं, हे कोडं मला सुटेना. टेकडीच्या खाली उतरलो. बापूसाहेबांचा मळा माझ्या नजरेत आला आणि अचूक बराच लांब गेलो. माणसाची साचल तर मला कुठं लागेना. काळोख पडायला सुरवात झाली होती. मी एका जागी उभा राहून चहूकडे टेहळलं तेव्हा काही तरी विस्तवाचा जाळ मला दिसला–ती मळ्यातली बापूसाहेबांची झोपडी असावी. तिकडे जायचं आणि आवा तेलणीला जमल्यास भेटायचं आणि बापूसाहेबांशीही चार गोष्टी करून परतायचा असा मी विचार केला. तसं महत्त्वाचं काम मला आता नव्हतंच.

दबकत दबकत पायवाटेने मी पुढे चालू लागलो. मधेच मला एक मनुष्य भेटला. उंचापुरा, जवान होता. त्याने मला हटकून विचारलं, "राव, एवढ्या संध्याकाळचे इकडे कोणीकडे आला." "बापूसाहेबांना भेटायचं आहे," मी सांगताच "कशापायी आता भेट–गाठ घेता– आवा आणि बापूसाव वसत्याती एकापुढे एक–दोघांना बोलवतबी नाही. आवा तर चार महिने अंथरुणातच पडून हाय. इतकं लांब आलात, एक कपभर चहाबी नाही मिळनार,'

मी सांगितलं, 'मला एकदा बापूसाहेबांना भेटायचं आहे. जुन्या ओळखी, भेटावं वाटलं. भाऊ, याच गावचा मी आहे. उद्या

मला नोकरीच्या गावी जायचं आहे ?' त्या गड्याने मला दिसणाऱ्या उजेडापर्यंत मला नेऊन घातलं आणि तो झटकलाच जाता जाता म्हणाला, 'तात्या, मळ्याच्या बाहेर मी सोडीन तुम्हाला हूं. लवकर परता बापूसाहेबाना भेटून.'

ओसरीवर एक कंदील जळत होता. मधल्या घरात एक कंदील असावा आणि चुलीच्या भडकत्या ज्वाळांपुढे प्रकाशाला ओसरीवर तरी कमतरताच नव्हती. मी ओसरीच्या पायऱ्या चढल्या. हवे असलेले बापूसाहेब माझ्यापुढेच दिसले. हातामध्ये कपबशी डुगडुग करीत होती आणि बापूसाहेबांची मानही कपबशीशी जणू ताल धरत होती हात थरथरत होते. पाय मात्र उचलत नव्हता. माझी चाहूल लागताच बापूसाहेबानी दरडावून विचारले, 'कोण रे तू ? या वेळी तुझं काम काय ? चालता हो–' असं म्हणून बापूसाहेबांनी जेव्हा– माझ्याकडे पाहिलं तेव्हा त्यांची करडी नजर आणि ओरडायचा आवाज मागची ओळख पटवून देऊ लागला – मी चट्दिशी उत्तर दिले, 'मी नारायण शिधये. मला आपण ओळखणार नाही. मी जळगावला असतो. बापूसाहेब, मी आपल्याला ओळखतो. आवा आजारी कळली, म्हणून आलो भेटायला. येऊ का घरात ?'

बापूसाहेब माझ्या प्रश्नाला उत्तर द्यायला तेथे नव्हते. उत्तराची वाट न पाहताच मलाच बापूसाहेबांच्या सहाय्याला धावाव लागलं. बशीतला कढत चहा बापूसाहेबांच्या पायावर पडताच बापूसाहेबानी बशी सोडून दिली. दोन्ही हातानी कपच धरून ठेवून ते उभेच राहिले. मी पटदिशी पुढे झालो आणि हातरुमालाने बापूसाहेबांचे पाय पुसून त्यांना हाताला धरून उंबऱ्याच्या आत सोडले. सहजच मीही आत गेलो. कंदील माजघरात जळत होता आणि अतिशय कृश बाई जवळच कण्हत पडलेली दिसत होती. तीच आमची आवा. मी झटपट बापूसाहेबाना सोडलं आणि 'आवा-मावशी – आवा-मावशी' म्हणून त्या म्हातारीच्या बिछान्यापाशी गेलो. बिछान्यापाशी जाताच मी नमस्कार केला. खरं पाहिलं तर ओळख कोणाचीच कोणाला तिघांना अद्याप पटली नव्हती – पण आम्ही तिघेही गहिवरलो. हलक्या आवाजात आवा म्हणाली, 'मावशी म्हणणारा कोण रे तू ?' नारायण शिधये म्हणताच तिला ओळख तावडतोब पटली. एक हात माझे हातात देऊन दुसऱ्या हातानी माझ्या पाठीवरून ममतेने हात फिरवू लागली. आवानी डोळे मिटलेलेच होते. डोळ्यातून पाणी घळघळ वाहत होते आणि तोंडाने म्हणाली, 'माझी गोदूताई'.

बापूसाहेबांनी पहिली हजेरी माझी पायरीवरच घेतली होती, पण पाहता पाहता तोच आवाज सौम्य झाला आणि आवाला म्हणाले, 'चहा घेना थोडा.' चहाचा कप बापूसाहेबानी आवाच्या तोंडापाशी नेला आणि चमच्याने घोट घोट चहा आवाला बापूसाहेब पाजू लागले.

थरथरत्या हातानी पाजीत असलेला चहा आवाच्या तोंडात न जाता कुठेतरीच जात होता. मी म्हटलं, 'मी पाजतो चहा. कप माझ्या हातात द्या–' आवाला मी चहा पाजला. खरोखरच तिला हुशारी वाटली आणि ती मोठ्याने म्हणाली, 'तुझ्या हातची गंगाच मी आता प्यायले. आता मला काहीही इच्छा नाही. तुझी घरधनीण आणि पोरबाळं खुशाल ना ?' बापूसाहेब आवाच्या पायापाशी बसून तिचे पाय रगडीत होते. निदान पाय चेपण्याचा त्यांचा भाव तरी होता. हातावर त्यांचा अमल चालत नव्हता, ही गोष्ट वेगळी.

पायावरून हात फिरवता फिरवता बापूसाहेब हसले आणि म्हणाले, "नारायणा, हा तुझ्या गावचा वाघ कुणाशी कधी नमला नाही. बायकापोराकरिताही श्रमला नाही, पण आवा......' हसण्याच स्थित्यंतर रडण्यात झालं. "अरे नारायणा, मी वेडा माणूस नाही. या बाईने माझ्याकरता जनाची, मनाची लाज सोडून धनाची खैरातसुद्धा तिनं माझ्या संकटकाळी केली–लग्नाच्या बायकोनेसुद्धा अंगावरचे दागिने देत नाही, साफ सांगितले. घराचा लिलाव झाला, मळ्याचा लिलाव पुकारला– या माझ्या आवाने अंगावरचे दागिने पटापट काढून दिले. इतकेच नव्हे तर जवळ असलेला सर्व पैसा माझ्यापायी खर्ची घातला–मी मनाचा निडर, हृदयाचा घट्ट, पण या प्रेमाच्या पायी अगदी मऊ झालो आणि माणसासारखा हिच्याशी तरी मी वागू लागलो–मी पैसा मिळवला–मी घालवला–मी रगढंग केले. मी ते पाहून घेईन, पण बिचाऱ्या आवाचे हाल मी होऊ देणार नाही." बापूसाहेबांच्या तोंडातून पुढे शब्द उमटेना–डोळ्यातून पाणी वाहू लागले. आवाची उशी तर अश्रूंनी ओलीचिंब झाली आणि माझेसुद्धा डोळे पाणावू लागले.

आमच्या गावचा दुष्टातला दुष्ट मनुष्य, कर्तबगार, पराक्रमी काही नाव द्या. साऱ्या गावाला भेडसावणारा खवीस आवापुढे बिल्ली झालेला पाहून मी चकितच झालो. बापूसाहेबानी डोळे पुसले आणि घाईघाईने म्हणाले, 'तो बाटलीतला औषधाचा डोस आवाच्या तोंडात ओत पाहू–तोपर्यंत मी पान तयार करतो.' थरथरत्या हातानी विडा खलबत्यात घालून बापूसाहेबांनी बारीक केला आणि डाव्या हातावर घेऊन थोडा आवाच्या तोंडात घातला व उरलेला आपल्या तोंडात टाकून हात झाडून म्हणाले, 'नारायणा, जन्मभर आवाने विडा करावा, कुटून माझ्या हातावर द्यावा, पण आज चार महिने तसा विडा मिळतही नाही आणि ती चव येतही नाही. गेले ते दिवस.'

पाहता पाहता आवाला झोप लागली अथवा अशक्तपणाने ती निचेष्ट पडली असावी. हळूच मी मागं मागं सरलो. बापूसाहेबांना नमस्कार करून 'उद्या सकाळी येईन बर का' असं सागून मी पायरी उतरू लागलो–बापूसाहेबांनी थरथरत्या हातानी कंदील धरला आणि धाव म्हणून 'धोंड्या', मोठ्याने आरोळी दिली. मघा भेटलेला तोच धोंडू धावत आला– त्यांनी बापूसाहेबांच्या हातातला कंदील घेतला आणि त्यांनी मळ्याबाहेर मला सोडले.

सकाळी बरोबर आठ वाजता लगबग करून मळ्याकडे मी आलो. तसं पाहिलं तर कारण काहीच नव्हतं, पण आवा आणि बापूसाहेब या जोडीने काल रात्रभर माझ्या डोक्यात थैमान घातलं होतं. त्या नाटकाचा उत्तर रंग पाहण्याकरिताच मी आपोआप मळ्याकडं वळलो. मळ्यात गेल्यावर मला काय दिसले! आणि मी काय ऐकले ते सागण्यासारखेच आहे–धोंडूनं मला हलकेच येऊन सांगितले, 'आवा रात्री दोनलाच गेली. मग मला बापूसाहेब घरी जा म्हणाले, साऱ्या रात मी येथेच होतो–सकाळी मी आलो तो बापूसाहेबही असेच इथे पडलेले दिसले. काय झाल कुणास ठाऊक––हा बापूसाहेबांचा मृत्यू होता की आत्महत्या होती, ते परमेश्वरच जाणे–' ●

# दांत पडले म्हणून भूक का लागत नाहीं?

द्रव्यार्जनाचा काळ संपल्यानंतरहि पुष्कळ आयुष्य जावयाचे असते आणि ते समाधानांत जावें अशी सहाजिकच प्रत्येकाची इच्छा असते. तथापि त्याची तरतूद फारच थोड्या लोकांनी केलेली असते आणि मग स्वतंत्रपणे राहाण्याची सवय असलेल्यांना आपल्या मुलाच्या राज्यांत ओशाळेपणानें राहावें लागते. मुलें सुस्वभावी असली तरीहि अनेक वेळा कुचंबणेचे प्रसंग येतातच. यावेळीं स्वत:चे जर थोडेसें निश्चित उत्पन्न असेल तर कुणालाहि आपला भार वाटणार नाहीं. असे उत्पन्न नियमितपणे येईल अशी तरतूद करायचा निश्चित व सोपा मार्ग म्हणजे आयुर्विमा. आजच तुमच्या विमा एजंटाचा सल्ला घ्या.

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं.



Pratibha 65i

# नवे नाते

**काकाजी रोज बाहेरून तृप्त पोटाने घरी येत होते. नवे नाते त्यांच्या पथ्यावर पडले होते. रुकमा मात्र संतापत होती. हे नवे नातेच तिचा जीव खात होते.**

मे महिन्याची एक भकास रात्र ! गुदमरून टाकणारं कोंदटलेलं वातावरण. मोवताली नीरव शांतता पसरली होती. तारकादेखील सुतकी भासत होत्या. रस्त्यावरची झाडांची पानंही स्तब्धपणे पडून राहिली होती.

घराच्या गच्चीवर मळकट अंथरुणं रांगेत लावली होती व त्यावर हरीशची पाच मुलं झोपली होती. चौदा वर्षांची इंदू, बारा वर्षांची गोपी, आठ वर्षांचा कुंदन, सहा वर्षांची राणी व तीन वर्षांचा राजू. तीन अंथरुणं अद्यापही रिकामी होती. दोन एकमेकांशेजारी व तिसरं सर्वांपासून दूर, गच्चीच्या एका कोपऱ्यात काका नेमनदासकरिता.

हरीश उशीला टेकून अर्थशून्य नजरेने अंधाराकडे अनिमिष पाहात होता. भकास चेहरा, विस्कटलेले केस, थकलेले व उदास डोळे. कसल्यातरी विचारात तो गुंग होता. इतक्यात अकरा महिन्यांच्या कौशीला घेऊन रुकमा गच्चीवर आली. त्रासलेल्या स्वरात हरीशनं विचारलं–"काय ग, काकाजी वर नाही का येत ? "

"नाही, खालीच झोपणार म्हणताहेत." तिच्या आवाजात रुक्षपणा व निष्काळजीपणा होता.

"अशा उकाड्यातही खालीच झोपणार?"

"त्यांचं काय जातंय् ? आजारी पडले म्हणजे डॉक्टरांची बिलं त्यांना थोडीच भरावी लागणार आहेत ? "

"रुकमा, पुरे आता–" हरीश किंचित कठोरपणानं म्हणाला––

"काकाजी विनाकारण तुझ्याबद्दल तक्रार करीत नव्हते तर. तू त्यांच्याशी नीट वागत नाहीस. दुसरं जाऊ दे, पण त्यांच्या ह्या वृद्धावस्थेचा तरी विचार करायला हवा तुला."

रुकमा खोचक स्वरात म्हणाली, "ते नुसते तुमचे काकाजी नाहीत, माझे सासरेदेखील आहेत म्हटलं."

"पण त्या अर्थानं तरी तू वागतेस काय ? "

"मग मी त्यांची कोणती इच्छा पूर्ण करू? प्रत्येक वस्तू........"

"अग, म्हातारी माणसं म्हणजे लहान मुलांप्रमाणे असतात."

"मग मी त्यांच्यापासून काही लपवून ठेवते, असं का वाटतं तुम्हाला ?"

"तसं नाही ग रुकमा, थोडासा तरी विचार कर. त्यांनी आपलं सबंध आयुष्य आमच्यासाठी खर्च केलं. जिवाचे रान केलेत त्यांनी आमच्यासाठी."

"आम्ही काहीच केलं नाही त्यांच्यासाठी, असंच ना ?"

हरीश जास्त काही बोलला नाही. रुकमेच्या म्हणण्यात थोडंफार तथ्य होतं. हरीश एक साधारण कारकून होता. महागाईच्या काळात अडीचशे रुपयांत नऊजणांचं पोषण म्हणजे काही चेष्टा नव्हती.

रुकमा लहान कौशीला उराशी धरून झोपी गेली. हरीश मात्र विचार करीत होता...

...आज काका नेमनदास म्हातारे झालेले आहेत, पण ते तरुण होते तेव्हा ?...तेव्हा काकाजींचे वैभव काही औरच होते. सिंघमध्ये ते एका डिव्हिजनला फॉरेस्ट ऑफिसात हेडक्लार्क होते. लहान–मोठे सर्व ऑफिसर्स त्यांच्या हुकमाखाली असत. देवानं त्यांना तीव्र बुद्धी व चातुर्य दिलं होतं. मोठमोठाल्या ऑफिसर्सनाही जेव्हा काही समस्या सुटत नसत, तेव्हा ते काकाजींकडे धाव घेत असत. त्यावेळी काकाजींचा पगार फारसा नव्हता, परंतु पगारापेक्षा त्यांना 'भेट' म्हणून खूप मिळत असे–फळांच्या टोपल्या, मधाच्या बाटल्या, शुद्ध गावरानी तुपाचे डबे, तांदळाची पोती आणि कधीकधी विदेशी दारूच्या बाटल्यादेखील !

काकाजी वैवाहिक जीवनाचा उपभोग घेऊ शकले नाहीत. लग्नाच्या एका महिन्या-



कथा :

**गोवर्धन महबूबाणी**

अनुवाद :

**लछमन हर्दवाणी**

नंतर त्यांच्या पत्नीनं अंथरूण धरलं ते कायमचंच. तीन महिन्यांच्या आजारानंतर तिनं इहलोक सोडला. काकाजींनी दुसरं लग्न केलं नाही. आपल्या थोरल्या भावाच्या (हरीशच्या वडिलांच्या) मुलांवर त्यांची खूप माया होती. काकाजींना तीन पुतणे व चार पुतण्या होत्या. हरीश सगळ्यांत थोरला होता. हरीशचे वडील साधारण पगारावर एक सिंधी शिक्षक होते. आर्थिक परिस्थिती बरी नसल्यामुळे काकाजी आपलं सर्व उत्पन्न त्यांच्या स्वाधीन करीत असत. खरं म्हणजे काकाजीचा त्याग, मोठेपणा व उदारपणा यांमुळेच तिन्ही पुतणे मॅट्रिक होऊन नोकरीला लागले. शिवाय चारही पुतण्या लग्न करून चांगल्या घरात जाऊन सुखी झाल्या.

हरीशच्या आईवडिलांच्या मृत्यूनंतर जेव्हा त्यांच्या एकत्र कुटुंबात दुही निर्माण झाली, तेव्हा काकाजींनी हरीशबरोबर राहण्याचा निर्णय घेतला, कारण हरीश त्यांचा आवडता होता. हरीशदेखील त्यांची फार काळजी घेत असे......... या सर्व गतकालच्या गोष्टी होत्या, पण आता ?... आज काकाजींचे पूर्वीसारखे वैभव राहिलेले नव्हते. ते आता वृद्ध झाले होते. पूर्वीसारखा उल्हास, आनंद आता उरला नव्हता.

सकाळी रुकमा आणि मुलांसह हरीश खाली आल्यावर त्याला काकाजींचा चेहरा कालच्या रात्रीसारखा भकास दिसला. आंघोळ वगैरे झाल्यावर मुलं शाळेत जाण्याच्या तयारीस लागली. रुकमा सकाळची न्याहारी करण्यात मग्न झाली. काकजीही भाजीपाला आणण्याकरिता नेहमीप्रमाणे बाजारात निघून गेले आणि आज नेहमीपेक्षा ते थोडा उशिराच परतले. अद्यापही त्यांच्या चेहऱ्यावर भकासपणा कायम होता.

" काकाजी, नाश्ता करायला या. " —स्वयंपाकघरातून आवाज आला.

"आज नको सूनबाई—" —काकाजी म्हणाले.

" का ? बरं वाटतं ना आज ? "—हरीशने विचारले.

"तसं नाही रे, पण मी नाश्ता करून आलो आहे. "

" पण घरी नाश्ता तयार असताना बाहेरून नाश्ता करून येण्याची आवश्यकता काय ? " —हरीशने रुक्षपणे विचारले.

" अरे, पण बाजारातून कोणी केलाय् नाश्ता ?"— काकाजींच्या पांढऱ्या मिशाखाली स्मितहास्य झळकले.

" मग इथं दुसरा कोण नातेवाईक आहे आपला ? "

" अरे बाबा, तू विनाकारण राईचा पर्वत करून घेतो आहेस. "—काकाजी हसले—" अरे, तो दिवान हुकूमतराय नाही काय ? डोळ्यांचे ऑपरेशन झालंय् त्याचं. त्याला भेटायला म्हणून गेलो होतो त्याच्या घरी. ती त्याची सून नाही का ? ... काय बरं नाव तिचं...

... राधा, राधा ... ती म्हणाली– 'काकाजी, बाजारातच जाताहात, मग आमच्याकरिताही भाजीपाला घेऊन या की.' आता हुकूमतराय पडला माझा जुना मित्र. भाजीपाला विकत आणून राधाजवळ दिला. ती म्हणाली, 'काकाजी, आता आलाच आहात, नाश्ता तयार आहे. नाश्ता करूनच जा.' हरीश, मी खूप नको नको म्हटलं, पण ती ... राधा सोडेनाच."

"अस्स, मग आज तर खूप पक्वान्नं खाऊन आला असाल, नाही का ?" रुकमा आतून कुचेष्टेने म्हणाली.

"छे : ग, पक्वान्नं कसली ? बस्, गावरानी तुपातून तळलेल्या पुऱ्या, शिरा, तळलेले पापड, आंब्याचे लोणचे..." रुकमानं जणू काय विषाचा घोट घेतला होता. तिच्या तोंडातून एक शब्ददेखील बाहेर फुटला नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी दोनतीन घास खाऊनच काकाजी उठले. रुकमेचा राग अनावर झाला— "का ? आजदेखील त्या राधाकडून नाश्ता करून आलेला दिसता."

"छे : छे :, नाश्ता कसला. तिच्याकडून थोडी मिठाई खाऊन आलोय्. तिच्या आईनं पाठवली होती. राधानं अगदी हट्टच धरला. वा वा, किती स्नेह, किती माया. मी नको नको म्हणता दोनतीन वड्या, मेसूरपाक, तीनचार पेढे खायला घातले तिने...हूँ...हूँ... हूँ...पोट भरून गेलं."—काकाजी मिस्किलपणानं हसत म्हणाले. रुकमेच्या मस्तकात एकदम तिडीक उठली. तिन सहज विचारल्यासारखं विचारलं—"कुठ राहतात हो ही मंडळी ?"

"कोण ? राधा होय ? अग ती शेजारीच राहते. न्यू कॉलनीच्या सतरा नंबर घरात."

निमिषमात्र रुकमाला वाटलं—धावत जावं त्या न्यू कॉलनीत आणि राधेचे केस धरून तिला बाहेर आणावी अन् विचारावं, "काय ग सटवे, काकाजी तुझे कोण ? दररोज त्यांची खुशामत करायला काय झालंय् ?"

पण ती काहीच करू शकली नाही. मनातली आग मनातच राहिली. परंतु सहनशीलतेला काही मर्यादा असते. काकाजी दररोज राधेकडून काही ना काही तरी खाऊन येत आणि रुकमेजवळ राधेची स्तुती करीत असत.

मत्सर व ईर्षा स्त्रियांची मैत्रीण असते, असं म्हणतात. राधेसमोर रुकमा मान तुकवायला मुळीच तयार नव्हती. रुकमानं विचार केला, 'काचेला हिरकणीनच कापलं पाहिजे.'

दुसऱ्या दिवसापासून रुकमाने काकाजीची काळजी घ्यायला सुरवात केली. आता नाश्त्याच्या वेळेला काकाजीना ताक व ज्वारीच्या भाकरीऐवजी पुऱ्या व शिरा मिळायला लागला.

हरीश स्तंभित झाला – "हे काय ग ?"

रुकमा म्हणाली, – "त्याच्या खुराकाची काळजी घ्यायला नको का ? काकाजी खगले आहेत आता."

"अग पण खर्च कसा भागेल ?"

"त्याची काळजी तुम्ही नको करायला. कौशी आता मोठी झाली आहे. दूध कमी करून तिला आता अन्नाची सवय लावली पाहिजे."

हरीशला काहीच उमगलं नाही.

पावसाळा सुरू झाला. इंदूला नवीन रेनकोट मिळू शकला नाही. जुनी छत्री घेऊनच गोपीला शाळेला जावं लागलं, पण काकाजीच्या भोजनात मात्र काहीच कमी झालं नाही. फळं, दूध, लोणी, मटन यामुळे काकाजीच्या चेहऱ्यावर नवीन तेज झळकू लागलं. शेतातील वाळलेल्या पिकाला पाणी मिळाल्यानंतर ते जसं टवटवीत दिसू लागतं, तद्वत काकाजी दिसायला लागले. त्याच्या वजनातही कमालीची वाढ होऊ लागली.

परंतु रुकमाचा उदारपणा, चांगुलपणा व माया यामुळे इतके असूनही काकाजीच्या जिभेवरून राधेचं नाव काही पुसलं गेलं नाही. एकदा रुकमा संतापून म्हणालीदेखील – "अजूनही 'राधा, राधा' चा जप चाललेला आहे. काय जरूर आहे तिच्याकडे जाण्याची ?"

"तू उगीच रागावतेस सूनबाई,"– काकाजी गोड शब्दांत म्हणाले, "अग, कधीही तिच्या घरासमोरून गेलो म्हणजे ती प्रेमाने बोलावून इकडच्या तिकडच्या गप्पा मारते. वा, वा, वा. काय उदार आहे. आज माझा शर्ट थोडासा फाटलेला दिसला तिला. म्हणाली, 'काका, एकदोन मिनिट शर्ट काढून द्या. शिवून देते झटकन्,' बापरे, मला तर मेल्याहून मेल्यासारखं झालं."

रुकमाच्या रोमारोमात आग पेटली. राधेनं थोडासा फाटलेला भाग शिवला होता, पण रुकमान त्याच दिवशी काकाजीना एक नवीन शर्ट शिवला. मनातल्या मनात चडफडत ती राधेला म्हणाली, 'कार्टे, मी तुला माझ्या पुढं जाऊ देणार नाही. ते सासरे माझे आहेत. तू कोण आलीस त्यांची काळजी घ्यायला.'

हिवाळा सुरू होतात काकाजीसाठी ब्रँडी, मध आणि अंडी घरात येऊ लागली. राणी व राजूला कुरतडलेले जुने स्वेटर्स घालावे लागले, पण काकाजीना गरम कापडाचं एक जाकीट तयार करण्यात आलं. कुंदनला मोज्याशिवाय बूट घालावा लागला, पण काकाजीसाठी वुलनची टोपी तयार करण्यात आली, पण राधेच्या स्नेहात रुकमाच्या ह्या खुशामतीपेक्षा अधिक आकर्षण होतं.

एके दिवशी खोकला व पडसं असूनही दुपारच्या वेळेला काकाजी घरातून बाहेर निघून गेले आणि दिवेलागणीच्या सुमारास ते घरी परतले. त्यांच्या कपाळावरून अमृताजनचा तीव्र वास येत होता. रुकमा म्हणाली, "तुमचे घरात पायच टिकत नाही. पडसं व खोकल्यात घरी विश्रांती घ्यायला हवी. भर उन्हात भटकू नये."

"अग, भटकतो कोण ? डोकं भयंकर दुखत होत, म्हटल ॲनासिन घेऊन यावं—"

"अस्स..." तोंड वेडवाकडं करीत रुकमा म्हणाली—"आणि ॲनासिन आणायला चार तास लागतात !"—

"काय करणार ?...रस्त्यात राधा भेटली." इच्छा नसतानाही काकाजीना खरं बोलाव लागलं—"तिनंच हट्ट धरला, घरी चला म्हणून. घरी नेऊन तिनं ॲनासिन दिलं. पलंगावर निजवून तिनं माझ्या कपाळावर अमृतांजन चोळलं. क्षणार्धात मला झोप लागली, आता मी तरी काय करणार ?"

रुकमा रागावली व तणतणू लागली, "दुसऱ्याच्या घरी झोपताना काही वाटतं की नाही ? थोड काही झालं की चला राधेकडे. मी म्हणते, मी काही मेले नव्हते."—तिच्या डोळ्यांमधून जणू काय ठिणग्या उडत होत्या. काकाजी आ वासून उभे होते.

झाल ! दुसऱ्या दिवसापासून काकाजींच्या सेवा–शुश्रूषेत 'बढती' झाली. इंदू दररोज त्याच्या डोक्याला ब्राह्मी तेलानं मालिश करू लागली. कुंदन दररोज सध्याकाळी त्याचे पाय चेपायला लागला. काकाजीच्या सेवा–शुश्रूषेमुळे रुकमा आणि हरीश याच्या कपड्यांतही काटकसर होऊ लागली. त्याच्या आरामासाठी इंदू व कुंदन अहोरात्र खपत होते, पण तरीदेखील राधा ही राधाच होती

आणि रुकमा ही रुकमा !

हरीशला बावचळल्यासारखे झाले होते. रुकमा त्रस्त आणि व्याकुळ होती. तिच्या अंतःचक्षूंसमोर नेहमी राधा उभी असे. जणू काय ती आव्हान करीत होती.

डिसेंबरच्या एका संध्याकाळी रुकमा आणि हरीश बाजारातून खरेदी करण्यासाठी बाहेर पडले. पुढच्या महिन्यात रुकमाच्या धाकट्या बहिणीचं लग्न होतं. तिला स्वतःला व मुलांकरिताहि कपडे घ्यावयाचे होते. तिनं खरेदी केली, पण अर्धवट. हरीश म्हणाला– " काय ग, अजून थोडे पैसे शिल्लक आहेत की. तुला सँडल हवी होती ना ?"

" सध्या नको. एक सँडल आहे माझ्याजवळ. उरलेल्या पैशांचे बदाम, अक्रोड, किशमिश व काजू घेणार आहे. थंडीचे दिवस आहेत, काकाजींना ' माजून ' (एक शक्तिवर्धक पदार्थ) करणार आहे. " आश्चर्याने तिच्याकडे पाहात हरीशनं दीर्घ निःश्वास सोडला. कपड्यांचं बंडल व सुक्या मेव्याचा पुडका घेऊन दोघे घराकडे निघाले. अचानक रुकमा म्हणाली,–

" ऐकलंत काय ? जरा न्यू कॉलनीतून जाऊन यायचं होतं. थोडसं काम आहे. "

दोघे न्यू कॉलनीकडे जायला निघाले. सतरा नंबरच्या घराजवळ येताच रुकमाची छाती धडधडू लागली. राधेची अनेक काल्पनिक चित्रे तिच्या डोळ्यांसमोर तरळू लागली. तिच्या मनाला नाना तऱ्हेच्या प्रश्नांनी वेढलं–' कशी असेल राधा ? माझ्याएवढीच असणार का ? माझ्यापेक्षा लहान की मोठी ? शरीरयष्टी कशी असेल ? आणि तिचं रूप ? पण काही का असेना, तिच्यात काही तरी वैशिष्टच असणार हे खास. उगीचच काकाजी—' रुकमाचं शरीर ताठ झालं. ईर्षेनं तिचं अंतरंग जळत होतं. 'त्या चेटकीला आज मी जरूर पाहणार. पाहू दे खरं तिच्यात काय जादू आहे. ' दातओठ खात ती मनात म्हणाली.

समोर सतरा नंबर घराचं दार होतं. हरीशनं हळूच दार ठोठावलं. रुकमा श्वास रोखून डोळे विस्फारून प्रतिक्षा करू लागली. प्रथम कुणाच्या तरी पावलांची चाहूल ऐकू आली व नंतर दार उघडलं गेलं –

समोर एक सुंदर स्त्री उभी होती. रुकमा मंत्रमुग्ध होऊन तिच्याकडे पाहू लागली. जणू काय तिच्यावर त्या स्त्रीनं जादू केली होती.

" बोला, काय काम आहे आपलं ?"– त्या स्त्रीनं अत्यंत गोड शब्दांत विचारलं.

पराकाष्ठेच्या प्रयत्नानंतर रुकमानं तोंड उघडलं–

" दिवान हुकूमतरायचं घर हेच आहे ना? आणि...तुमचं नाव राधाच ना ?"

" दिवान हुकूमतराय ? राधा ?... " ती स्त्री आश्चर्याने म्हणाली–" छेः छेः, तुमचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतोय्. "

रुकमा दचकली. तिची घाबरलेली दृष्टी बाहेरच्या भिंतीकडे वळली. घराचा नंबर तर सतराच होता, पण खाली एका पाटीवर लिहिलेलं होतं–' डॉ. निर्मला आडवाणी ' अडखळत रुकमानं विचारलं–" पण येथे हुकूमतराव...म्हणजे राधा ! ..." ती स्त्री हसून म्हणाली,–" तुमचा काहीतरी गैरसमच झालेला दिसतोय् खास. अहो, या घरात तर काय, पण या सबंध न्यू कॉलनीत कुणीही दिवाण राहात नाही नि राधा नावाची स्त्री राहात नाही. मी डॉक्टर आहे, सगळ्यांना ओळखते मी."

रुकमेला पाचावर धारण बसल्यासारखं झालं. सभोवतालचं विश्व गरगरा फिरत असल्याचं वाटलं तिला. चोहोंकडे जणू काय अंधार पसरला होता, पण त्या अंधारातही एखादी वीज चमकून गेल्याचा भास झाला तिला आणि त्या प्रकाशात तिला सर्व वस्तू मूळच्या स्वरूपात दिसू लागल्या. ती भानावर आली. तिच्या अंगाचा तिळपापड झाला होता.

आपल्या घरात शिरताच रुकमानं काकाजींवर क्रोधाग्नीचा एक दृष्टिक्षेप टाकला. क्रोधाच्या तांबड्या ज्वाला धगधगल्या. काकाजी अगदी आरामात पलंगावर लोळत होते. इंदू त्यांच्या डोक्याला मालिश करीत होती. कुंदन त्यांचे पाय चेपीत होता. पावलांचा आवाज ऐकून काकाजी मान वळवून म्हणाले–

" सूनबाई का ?...फार उशीर केलात्. कुठं गेला होता ?"

" राधाकडे गेले होते काकाजी ! त्या न्यू कॉलनीच्या सतरा नंबर घरात." –रुकमा शांतपणे म्हणाली.

काकाजी खडबडून उठून बसले. अगदी भूकंप झाल्यासारखा वाटला त्यांना. तुटपुंज्या भाषेत त्यांनी सांगण्याचा प्रयत्न सुरू केला–

" काय?...रा...राधाकडे ?...ती...ती ना ...अग ती दुसरीकडे राहायला गेली परवाच !"

" अस्सं. ती इतक्यात दुसरीकडे गेली काय ?"–काकाजींच्या अगदी जवळ येऊन रुकमा चेकाळून म्हणाली–" बोला, कुठं गेली ती ?"

" ती...ती ना..." काकाजींनी धोतराचं एक टोक हातात घेऊन चघळीत म्हटले, लहान मुलांसारखं, भावडेपणाने–

" ती आता याच घरात राहते."

" काय म्हणालात ? याच घरात ?"

" होय, याच घरात."–काकाजी स्मित करीत गोड आवाजात म्हणाले–

" अग, तूच माझी राधा आहेस !"

–रुकमा आश्चर्याने पाहात राहिली. पान्याप्रमाणे तिचा राग भुर्रकन् घरंगळला. अलौकिक आनंदानं तिचं शरीर पुलकित झालं. तिचे ओठ थरथरले, हात कापू लागले... आणि तिच्या हातातील सुक्या मेव्याचा पुडका निसटून खाली जमिनीवर पडला...

• • •



THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRAR
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

## लेखांक दहावा




**इंग्लंडमध्ये सैन्यभरती विधेयक संमत झाले. मॉस्कोमध्ये ब्रिटन-फ्रान्सशी, जर्मनविरोधी आघाडी निर्माण करण्याचे धोरण पुरस्कारणाऱ्या रशियन परराष्ट्रमंत्री लिटविनॉव्ह याला अधिकारावरून गचांडी मिळाली आणि त्याच्या जागी मोलोटोव्ह आला! रशियाचे धोरण बदलणार होते— बदलू लागले होते—**

२८ एप्रिल १९३९ला हिटलरने जे ओजस्वी भाषण केले व ज्यात त्याने प्रे. रुझवेल्ट यांना चपराका दिल्या, त्या भाषणात त्याने रशियाबद्दल किंवा कम्युनिझमविरुद्ध मात्र चकार शब्दही उच्चारला नाही. याचे कारण असे होते की आपल्याला अखेर युद्ध करावे लागणार, याबाबतीत हिटलर व दोस्त राष्ट्रे यांची जसजशी खात्री पटत चालली, तसतशी या अटळ युद्धात रशियाला आपल्या बाजूला खेचण्याची स्पर्धा, मांडणाऱ्याच्या स्वभावानुरूप नियमानुसार सुरू झाली होती. बर्लिन–मॉस्को, लंडन–मॉस्को, पॅरिस–मॉस्को, अशी परराष्ट्र वकिलांची धावपळ आता उघडपणे सुरू होणार होती व या प्रयत्नांना यश येण्याच्या दृष्टीने दोन्ही गटांची साखरपेरणी सुरू झाली होती. या मुत्सद्दी डावपेचात अखेर रशियाशी वीस वर्षांचा अनाक्रमणाचा करार साधून हिटलरनेच इंग्लिश व फ्रेंच मुत्सद्यांना कसे चारी मुंड्या चीत केले, त्याची विलक्षण आणि गुंतागुंतीची कथा आता सुरू होणार आहे.

या वेळी जर्मनीचा मॉस्को येथे जो वकील होता त्याचे नाव शूलेनबर्ग (Schulenburg). १० मार्च १९३९ ला रशियाचा लाल हुकूमशहा मार्शल स्टॅलिन याचे अठराव्या कॉंग्रेसपुढे भाषण झाले, त्यात स्टॅलिनने युरोपात आक्रमक ठरू पाहणाऱ्या जर्मनीला धारेवर न धरता–इंग्लंडच्या कातडी बचावू परराष्ट्र धोरणाचा खरपूस समाचार घेतला. आपल्या भाषणात मार्शल स्टॅलिन म्हणाला—

"The western allies are pushing the Germans further eastward, promising them an easy pray & saying : 'Just start a war with the Bolsheviks.' It looks as if the purpose was to engender the fury of the Soviet Union against Germany & to provoke conflict with Germany."

[ पश्चिमेकडील दोस्त हे जर्मनीला जास्त जास्त पूर्वेकडे ढकलत आहेत. काही होत नाही—कर आक्रमण––असे सांगत त्यांनी जर्मनीला आता सांगितलेले दिसते की......" काही करून बोल्शेव्हिकांशी युद्ध सुरू कर." असे करण्यात मला तर एकच हेतू स्पष्ट दिसतो, की सोविएट युनियन अशारीतीने एकदा चिथावली की रूसो–जर्मन संघर्ष सुरूच होईल ! ]

इंग्लंडची ही परंपरागत राजनीतीच होती, की युरोपात दोन बलाढ्य शक्तींना परस्परांशी झुंजत ठेवून–युरोपात आपला वरचष्मा कायम ठेवावयाचा. या नीतीविरुद्ध स्टॅलिनने हा हल्ला चढवला होता. एवढेच करून स्टॅलिन थांबला नाही, तर आपल्या पुढल्या धोरणाची दोन प्रमुख मार्गदर्शक सूत्रे त्याने मांडली––

(१) सर्व राष्ट्रांशी शांततेचे धोरण ठेवून सर्व देशांशी आर्थिक संबंध अधिक दृढ करावयाचे.

(२) आपला देश युद्धखोरांच्या कारवायांना बळी पडून युद्धात गुंतवला जाणार नाही, याची काळजी घ्यावयाची. कारण युद्धखोरांचा (दोस्तांचा) हा नेहमीचाच धंदा आहे की युरोपात कोंबडी झुंजत ठेवावयाची.

### स्टॅलिनचा नवा पवित्रा

रशियन हुकूमशहाच्या भाषणाचे प्रतिवृत्त इंग्लंड–फ्रान्सच्या वकिलांनी आपापल्या सरकारला कळवले. म्युनिच करारात खुर्ची न दिल्याने रशियाच्या मनात ब्रिटन-फ्रान्सविरुद्ध संशय निर्माण झालेला असल्यामुळे व रशियन कम्युनिझमच्या भुताची भीतीही दोस्तांच्या मनात दृढ असल्यामुळे, या प्रतिवृत्ताचा फारसा विचार करण्याची निकड लंडन व पॅरिसला वाटली नाही. परंतु या भाषणाचा वृत्तांत जर्मन-वकील शूलेनबर्ग याने बर्लिनला पाठवताच, बर्लिनला हिटलर व

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री



रिबेन्ट्रॉप यांनी त्याची तावडतोब दखल घेऊन...वारे कसे वाहात आहेत, याचा अचूक अंदाज बांधला व आपल्या परराष्ट्र राजकारणाची प्यादी विचारपूर्वक हलवण्यास सुरवात केली.

१० मार्चला स्टॅलिनने हे भाषण केले, तरी संबंध फारसे बिघडलेले नव्हते. कारण १५ मार्चला जर्मन फौजा जेव्हा प्रागमध्ये शिरल्या, तेव्हा हिटलरला पायबंद घालण्यासाठी रशिया धरून सहा राष्ट्रांची परिषद घ्या, अशी सूचना स्टॅलिनने केली. १८ मार्चला चेंबर्लेन यांनी... एवढी धावपळ करण्याची जरूर नाही, असे म्हणून या सूचनेला वाटाण्याच्या अक्षता लावल्या, हे आपण पूर्वी पाहिले आहेच.

३१ मार्चला चेंबर्लेन यांनी जेव्हा पोलंडला, स्वतःच्या एकट्याच्या जबाबदारीवर संपूर्ण अभय दिले, तेव्हा स्टॅलिन व रशियन गोटात जुना संशयच बळावला, की इंग्लंडला पोलंडशी करार करतानादेखील रशियाशी बोलणे करण्याची इच्छा नाही, कारण युरोपच्या राजकारणात अजून फक्त इंग्लंडलाच आपला मोठेपणा हवा आहे.

स्टॅलिनच्या मनाचा थांग लागताच हिटलरने १६ एप्रिलला गोअरिंगला रोम येथे मुसोलिनीच्या भेटीसाठी पाठवले. मॉस्कोतील इटालिअन वकिलाने स्टॅलिनच्या भाषणाचा जो वृत्तांत मुसोलिनीला पाठवला होता, त्यांत स्टॅलिनच्या तोंडी खालील वाक्य होते. स्टॅलिनने इशारा दिलेला होता—

" The Russions would not allow themselves to be used as cannon fodder for the Capitalist Powers. "

[ भांडवलशाही राष्ट्रांना तोफेच्या तोंडी देण्यासाठी म्हणून रशियन्स आपला उपयोग करू देणार नाहीत. ]

स्टॅलिनच्या भाषणाने हिटलरची जी प्रतिक्रिया झाली, तीच मुसोलिनीची झाली होती. यामुळे गोअरिंगच्या या भेटीत Axis राष्ट्रांनी



नवा परराष्ट्रमंत्री – नवे धोरण

रशियाबाबत नवे धोरण आखण्याची वेळ आली आहे, याबद्दल त्या दोघांचे एकमत झाले.

रोम येथे १६ एप्रिल या दिवशी गोअरिंग व मुसोलिनी यांचे वरीलप्रमाणे एकमत होत असतानाच, तिकडे मॉस्कोमध्ये सोविएट परराष्ट्रमंत्री लिटविनॉव्ह याने मॉस्कोमधील इंग्लंड व फ्रान्सच्या वकिलांना बोलावून जर्मनीविरुद्ध इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांनी पोलंडला संरक्षणाची हमी देण्याची योजना त्यांचेपुढे मांडली. इंग्लंड–फ्रान्सशी जर्मनविरोधी करार करावा, या धोरणाचा पुरस्कार लिटविनॉव्ह करीत असे. या दृष्टीने त्याने केलेला हा अखेरचा प्रयत्न ठरणार होता. रशियन राजकारणाचा हा ठोक सिद्धांत दिसतो, की विवक्षित धोरणाचा पुरस्कार केल्यानंतर जर त्या दृष्टीने यश मिळाले नाही, तर अधिकारावरून त्या माणसाची उचलबांगडी होते. लिटविनॉव्हच्या या सूचनेबाबत इंग्लिश व फ्रेंच वकिलांनी फारसा उत्साह दाखवला नाही. त्यांच्या सरकारचा त्यांना या बाबतीत काही आदेशच नव्हता–मार्गदर्शन नव्हते. 'तुम्ही म्हणाल ते आमच्या सरकारला कळवू, तिकडून उत्तर आले की तुम्हाला कळवू.' अशा जुजबी चर्चेवरच हा प्रयत्न विसावला.

## लिटविनॉव्हची हकालपट्टी

स्टॅलिनने मात्र आता लिटविनॉव्हचे धोरण फसले आहे, याचा अंदाज घेऊन बर्लिनमधील रशियन वकील मेरेकॉव्ह (Merekalov) याला जर्मन परराष्ट्रखात्याशी आर्थिक संबंधाविषयी बोलणी सुरू करण्यास आदेश दिला. १७ एप्रिलला मेरेकॉव्ह याने जर्मनीच्या परराष्ट्रखात्याच्या अधिकाऱ्यांना बोलताना सांगितले—

"जरी तात्त्विक मतभेद असले (Ideological differences) तरी आमचे व इटालीचे संबंध सलोख्याचे आहेतच. हीच गोष्ट जर्मनीबाबतहि का असू नये ? तुमचे पश्चिमेकडील दोस्तांशी जे भांडण आहे, त्यात तेल ओतण्याची आमची इच्छा नाही. रशियापुरते बोलावयाचे तर रूसोजर्मन संबंध हे अधिक स्थिर पायावर उभे असावेत, अशी आमची इच्छा आहे. या दृष्टीने काय करता येईल हे पाहण्याकरता मी स्वत: एक-दोन दिवसांत मॉस्कोला जात आहे."

मेरेकॉव्ह मॉस्कोला आला. क्रेमलीन खलबते सुरू झाली. ३ मे १९३९ ला रशियन वृत्तपत्रांतून संक्षिप्त बातम्या (News in brief) या सदराखाली वृत्त आले—

"M. Litvinov has been released from the office of the Foreign Commissar at his own request" हे रशियन्स बेटे मोठे प्रामाणिक असतात! आपले गुन्हे, आपले अत्याचार, आपल्या चुका धाडधाड कबूल करतात ! असे निदान सगळीकडे छापून तरी येते. आता ही बातमीच पाहा—

"लिटविनॉव्ह यांनी परराष्ट्रखात्याच्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावे असे विनवल्यामुळे, त्यांना या पदातून मुक्त करण्यात येत आहे."

याच बातमीचा उत्तरार्ध होता—

"He is replaced by Vyacheslav Molotov, Chairman of the Council of the Peoples Commissars"

[त्याचे जागी मोलोटॉव्ह यांची नियुक्ती झाली आहे.]

लिटविनॉव्ह गेला ! १ मे १९३९ ला जी क्रांतिदिनाची संचलने झाली, त्या दिवशी हा स्टॅलिनच्या शेजारी की हो उभा होता ! अहो, २ मे १९३९ ला तर तो ब्रिटिश वकिलाशी बोलणी करत असल्याची बातमी आली होती आणि ३ मेला हा गेला ! ! याचा अर्थ शूलेनबर्गने बरोबर लावला. मॉस्कोतील या जर्मन वकिलाने बर्लिनला कळवले—

"The sudden change has caused greatest surprise here, as Litvinov was in the midst of negotiations with the British delegation, had appeared in close proximity of Stalin at the parade of May–1. It seems that his dismissal must be due to a sudden sponteneous decision by Stalin. Molotove's appointment is obviously intended to provide guarrantee that foreign policy will be conducted strictly on lines laid down by Stalin."

[अकस्मात झालेल्या या बदलाने येथे बरेच आश्चर्य निर्माण झाले आहे. कारण लिटविनॉव्ह हा ब्रिटिश प्रतिनिधी मंडळाशी वाटाघाटीत गर्क होता. १ मे ला क्रांतिदिनाचे जे संचलन झाले, त्या दिवशी स्टॅलिनच्या अगदी जवळ हा उभा होता. लिटविनॉव्हची हकालपट्टी झाली याला एकच कारण संभवते, की स्टॅलिनने काहीतरी तातडीने अकस्मात निर्णय घेतलेला असावा. मोलोटोव्ह त्याचे जागी आला याचा अर्थ यापुढे रशियाचे परराष्ट्र राजकारण हे स्टॅलिनने आखून दिलेल्या रेषेबाहेर जाणार नाही.]

शूलेनबर्गचा हा अंदाज तंतोतंत खरा होता. लिटविनॉव्हचे धोरण फसले आहे असा स्टॅलिनचा पक्का ग्रह झाला होता. इतकेच नव्हे तर लिटविनॉव्हच्या धोरणाने गेल्यास लवकरच युरोपात रूसोजर्मन संघर्ष

सुरू होऊन, त्यातून ब्रिटन, फ्रान्स मात्र नामानिराळे राहतील, अशी भीती स्टॅलिनला वाटू लागली होती. बरे, लिटविनॉव्ह हे धोरणच का पत्करतो...... याचे सोपे उत्तर स्टॅलिनला मिळाले. लिटविनॉव्ह हा ज्यू होता व ज्यूद्वेष्टया जर्मनीविरुद्ध तो सततच असणार. लिटविनॉव्हची दैनंदिनी आता प्रसिद्ध झाली आहे. या दैनंदिनीत जानेवारी १९३९ मध्येच लिटविनॉव्हने लिहिले आहे–

"It would appear that they have dicided to remove me."

[असे दिसते की मला लवकरच अधिकारावरून काढण्याचे ठरले आहे.]

म्हणजे जानेवारी १९३९ पासूनच आपल्याला गचांडी मिळणार, याचा अंदाज लिटविनॉव्हला आला होता. जानेवारी १९३९ ते ३ मे १९३९ एवढा काळ त्याने जर्मनीविरुद्ध ब्रिटिश, फ्रेंच व रशिया यांची आघाडी निर्माण करण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला. अखेर ३ मे १९३९ ला स्टॅलिनने लिटविनॉव्हची हकालपट्टी केली. कारण १६ एप्रिलला त्याने जी सूचना ब्रिटिश व फ्रेंच वकिलांना केली होती, त्याला साधे उत्तरही लंडन–पॅरिसहून आले नव्हते. म्हणजे एका अर्थाने लिटविनॉव्हचा बळी हा लंडन–पॅरिस येथील गलथान धोरणाने घेतला, यात शंका नाही.

**चर्चिल यांची स्पष्टोक्ती**

लिटविनॉव्ह गेला. ही गोष्ट ब्रिटनला भोवणार, याचा अचूक वेध विन्स्टन चर्चिल यांनीच घेतला. ४ मे १९३९ ला म्हणजे दुसऱ्याच दिवशी केलेल्या भाषणात चर्चिल यांनी परराष्ट्रधोरणाचे सूत्र सरकारला सांगितले–

" There is no means of maintaining an eastern front against Nazi aggression without the active aid of Russia. "

[नाझी आक्रमणाविरुद्ध पूर्वेकडे आघाडी टिकवायची असेल तर त्यासाठी रशियाचे प्रत्यक्ष सहकार्य मिळवल्याखेरीज अन्य मार्ग नाही.]

८ मे १९३९ ला चेंबर्लेन यांनी रशियाच्या वतीने १५ एप्रिलला लिटविनॉव्ह यांनी जी सूचना केली, त्याला किती विचित्र उत्तर दिले पाहा. चेंबर्लेन यांनी कळविले–

"पोलंड व रुमानिया या देशांना रशियाने संरक्षणाची हमी द्यावी व तसे जाहीर करावे. आधी आताच जर तुमच्याशी तुम्ही म्हणता तसा लष्करी करार केला तर त्यामुळे इतर देशांशी वाटाघाटींना बाध येतो. "

या उत्तरात रशियाला ब्रिटन, फरान्स काय मदत देतील, याचा उल्लेख तरी आहे का ? अशा या चमत्कारिक धोरणामुळे स्टॅलिनच्या मनातील ब्रिटन, फ्रान्सविषयीचा संशय अधिकच बळावला व उलट त्याची खात्रीच झाली की पोलंडबाबत म्हणा, रुमानियाबाबत म्हणा, रशियाचे जर्मनीशी युद्ध पेटावे व आपण दुरून मजा पाहावी, असाच या भांडवलशाही राष्ट्रांचा डाव दिसतो. इंग्लंड–फ्रान्सचा हा डाव यांच्यावरच उलटवता येणार नाही इतके हे भांडवलदारगट आम्हाला मूर्ख मानतात की काय ? आता हा डाव मी उलटवतो कसा ते पाहा युद्ध होईलच, पण ते जर्मनी व इंग्लिश–फरेंचांचे होईल. मजा आम्ही पाहू.

१९ मे १९३९ ला कॉमन्स सभागृहात रशियन सरकारच्या सूचनेबाबत जे आत्मघातकी धोरण चेंबर्लेन यांनी पत्करले, याबद्दल


कॅल्शियमयुक्त

बिटको

ग्राइप

नेहमी दिल्याने

लहान मुले सशक्त बांधेसूद

व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

बिटको

काळी टूथ पावडर

नेहमी वापरल्याने

दात मोत्यासारखे स्वच्छ

व चकचकीत होतात.

बिटको केमिकल इंडस्ट्रीज, नाशिक रोड.

चर्चिल यानी सरकारला धारेवर धरले. चर्चिल यांनी स्पष्ट सांगितले-

Moscow had made a fair offer...more simple, more direct, more effective, than Chemberlain's own proposal. His Majesty's Government must take some brutal truths in to their heads; without an effective eastern front there can be no satisfactory defense in the west & without Russia there can be no effective eastern front."

[ मॉस्कोने केलेला प्रस्ताव हा चेंबर्लेन याच्या सूचनेपेक्षा समाधानकारक होता – सोपा होता– स्पष्ट होता– परिणामकारक होता ! कृपा करून सरकारने काही नागडी सत्यें आपल्या डोक्यात ठसवून घ्यावीत. पूर्वेकडे परिणामकारक अशी आघाडी निर्माण केल्याखेरीज पश्चिमेकडे तुम्हाला सरक्षण उभे करण्यात यश येणार नाही. रशियाच्या मदतीखेरीज पूर्वेकडे परिणामकारक अशी आघाडी निर्माण होणार नाही ! ]

लॉईड जॉर्ज यांनी चर्चिल याच्या म्हणण्याला दुजोरा दिला. सरकारतर्फे उत्तर देताना चेंबर्लेन यांनी आपण गोंधळात पडलो असल्याची कबुली या शब्दात दिली—

" There is a sort of veil, a sort of wall between the two Governments, which it is extremely difficult to penetrate."

[ या दोन्ही सरकारच्या दरम्यान एक असा पडदा– अशी भिंतच निर्माण झाली आहे– की जी बाजूला सारून मार्ग काढणे फार कठीण झाले आहे. ]

## जर्मनी-इटाली पोलादी करार

लंडनमध्ये अशा अंतरपटाच्या आड हा गोंधळलेला नवरदेव विचारात पडलेला असताना, तिकडे बर्लिनमध्ये एका नव्या लग्नाची तयारी सुरू होती इटालीशी लष्करी करार करण्यासाठी हिटलरने जनरल कायटेलच्या मागे एप्रिलच्या सुरवातीपासून लकडा लावलेला होता. जनरल कायटेल याने आपले मत दिले होते, की इटालीची तूर्त युद्धाची अजीबात तयारी दिसत नाही. त्याचे सामर्थ्य अगदीच लंगडे आहे.

रिबेन्ट्रॉप याने काउंट सियानो या इटालीच्या परराष्ट्रमंत्र्याची भेट या संबंधात मागितली होती. मिलानं येथे ६ मेला ही भेट झाली. सियानो याने हे स्पष्ट केले, की कमीतकमी तीन वर्षे इटालीला युद्धाचा विचार करता येणार नाही. परंतु मुसोलिनीला या भेटीचा वृत्तात कळताच ही कमीपणाची भूमिका त्याला सहन झाली नाही. त्याने निर्णय घेतला की– जर्मनीशी लष्करी करार तावडतोब केला पाहिजे ! मुसोलिनीने हा निर्णय अशा अपेक्षेने घेतला असावा की करार आता करून ठेवावा– प्रत्यक्ष युद्ध सुरू होईपर्यंत २–३ वर्षे जातातच आहेत. या कराराच्या मसुद्यात एक वाक्य असे आहे– "

" United by the inner affinity of their ideologies– Germany & Italy have resolved to act side by side & with united forces to secure their living space–

[ दोघांच्या राजकीय तत्त्वज्ञानात जे एक खोल साम्य आहे, त्यामुळे एकजीव झालेली जर्मनी व इटाली ही दोन राष्ट्रे असा निर्धार करीत आहेत, की जीवनगरजेएवढा भूभाग मिळवण्याच्या प्रयत्नात दोघे खांद्याला खांदा भिडवून संयुक्तरीत्या प्रयत्न करतील. ]

या कराराचे नामकरण ठरले —" Pact of Steel " ( पोलादी करार ) या करारावर सह्या करण्याच्या समारंभासाठी काउंट सियानो हा या वेळी बर्लिनला आला होता. गोअरिंग व हिटलर याच्या उपस्थितीत हा करार करण्याचा थाटामाटाचा समारंभ २२ मे १९३९ ला बर्लिनमध्ये झाला. या कराराने इटालीचे नाझी जर्मनीच्या भवितव्याशी लग्न लागले......या करारातील मुख्य कलमे अशी होती–

१. जर जर्मनीचे किंवा इटालीचे दुसऱ्या एखाद्या राष्ट्रगटाशी युद्ध पेटले, तर एकमेकांनी तावडतोब एकमेकाच्या सहाय्यासाठी ते युद्ध आपले मानले पाहिजे.

२. अशा सुरू झालेल्या युद्धात–दोघांपैकी कुणीही परस्पर समतीशिवाय शस्त्रसंधी वा तह करावयाचा नाही.

जेव्हा प्रत्यक्ष युद्ध पेटले तेव्हा मुसोलिनीने यातली पहिली अट पाळली नाही आणि जेव्हा इटालीत दोस्त सैन्ये उतरली तेव्हा दुसरीही अट पाळली नाही......हे पुढील निवेदनात ओघाने येईलच

## 'आता युद्धावाचून गत्यंतर नाही'

२२ मे ला पोलादी कराराचा समारंभ उरकताच २३ मे १९३९ ला हिटलरने आपल्या लष्करी अधिकाऱ्याची बैठक घेतली व सर्वांना उघडपणेच सागून टाकले–

" यापुढील वाटचाल रक्त साडल्याखेरीज करता येणार नाही, अशी माझी खात्री झाली आहे. आता युद्धावाचून गत्यतर नाही. "

या बैठकीला फील्ड मार्शल गोअरिंग, ग्रँड अॅडमिरल रीडर, जनरल ब्राऊश, जनरल हाल्डर, जनरल कायटेल, हिटलरचा लष्करी चिटणीस लेफ्टनंट कर्नल रुडोल्फ स्मद (Schmundt) आदि एकंदर १४ अधिकारी हजर होते. स्मद यानेच या बैठकीतील निर्णयाचे टाचण तयार केले व जर्मनीच्या पराभवानतर हाती आलेल्या कागदपत्रात हे इतिहासकाराना उपलब्ध झाले. ही सर्व बैठक त्या वेळी गुप्त स्वरूपाची होती.

हिटलरने या भाषणात युद्धाच्या पहिल्या वर्षात काय काय घडेल याचा बिनचूक अदाज व्यक्त केलेला आढळतो. परतु ब्रिटिश लोक हे आपल्याला गोंधळात टाकणारे लोक आहेत, या त्याच्या अनुभवाचे प्रत्यंतर भाषणातही जागोजाग येते. ब्रिटिश लोकाच्या सदगुणाचे आणि दुर्गुणाचे यथातथ्य निर्देशन हिटलरने यामुळेच केलेले आढळते.

आता युद्धाविना मार्ग नाही, हे स्पष्ट करून हिटलरने बैठकीत सांगितले–

" डॅझिग हे भांडणाचे कारण अजीबात नाही. आपल्या देशाची सरहद्द पूर्वेकडे वाढवून जीवनावश्यक भूभाग उपलब्ध करण्याकरता, आपला अन्नधान्याचा प्रश्न सुकर व्हावा म्हणून आणि बाल्टिक राष्ट्राचा प्रश्न सोडविण्यासाठी, हे युद्ध होणार आहे. यासाठी योग्य संधी साधून लवकरात लवकर पोलडवर हल्ला करावा लागेल. या वेळी झेक प्रकरणाची पुनरावृत्ती होईल, अशी अपेक्षा आपण ठेवू नये. यावेळी युद्ध भडकणारच. आपले मुख्य काम पोलंडला एकाकी पाडण्याचे आहे. पोलडला एकाकी पाडण्यात आपण यश मिळवले तर ते निर्णायक महत्त्वाचे ठरेल–"

रशियाकडे वळून हिटलर उद्‌गारला—

" आपण पोलंडचा काटा काढीत असताना अशीही शक्यता आहे की रशिया काहीही करणार नाही; परंतु रशियाने ब्रिटन-फ्रान्सच्या नादाने युद्धात भाग घेतलाच, तर प्रथम आपल्याला ब्रिटन-फ्रान्सला काही प्राणांतिक टोले हाणून मग पूर्वेकडे वळता येईल–"

ब्रिटन, फ्रान्स व रशिया या तिघांशी लढण्याचे जे घातक आव्हान पहिल्या महायुद्धात कैसरने स्वीकारले, हेच आव्हान आपण स्वीकारू असे हिटलर सांगत होता.

इंग्लंड-फ्रान्सचे युद्ध कसे खेळावे लागेल, याचे स्पष्टीकरण करताना हिटलरने अधिकाऱ्यांना सूचना दिल्या—

" हॉलंड व बेल्जियमचे विमानतळ आपल्याला कबजात घ्यावे लागतील. याकरता त्यांच्या तटस्थपणाकडे दुर्लक्ष करावे लागेल. जर इंग्लंडशी युद्धच करावे लागले, तर ते डच भूमीवर लढावे लागेल. इंग्लंड-फ्रान्सशी होणारे हे युद्ध जीवन-मरणाचे युद्ध ठरणार आहे." (The war with England & France will be a war of life & death)

हे जीवनमरणाचे युद्ध लढताना जर्मनीचे काय अपेक्षावे, हे हिटलरने निःसंदिग्ध शब्दात सांगितले—

" The idea that we can get off cheaply is dangerous. There is no such possibility. We must then burn our boats & it will no longer be a question of right or wrong but of to be or not to be for eighty million people—"

[ फार किंमत न देता सर्व काही उरकता येईल, असे समजणे धोक्याचे ठरेल, *अशी शक्यता अजीबात नाही. सर्वस्व पणाला लावून* जिवाची तमा न बाळगता आपल्याला लढावे लागेल. मग केवळ, हे बरोबर की चूक असा प्रश्नच न उरता, जगावे की मरावे हाच एक प्रश्न आठ कोटी जर्मनांपुढे शिल्लक उरेल. ]

## हिटलरला इंग्लंड कसे दिसले ?

आपला शत्रू नेमका कसा आहे याविषयी हिटलरने इशारा दिला–

The British himself is proud, brave, tough, dogged & a gifted organiger. He knows how to exploit every new development. He has the love of adventure & the courage of the Nordic race..."

" England is a world power in herself, constant for three hundred years. Increased by alliances this power is not only some thing concrete but must be also considered as psychological force embracing the entire world......"

[ हा ब्रिटिश माणूस स्वतः मोठा मानी, शूर, कणखर, खंदा आणि चतुर असा संघटक आहे. प्रत्येक प्राप्त परिस्थितीत स्वतःचा फायदा कसा करावा, हे उपजत ज्ञान त्याचेपाशी आहे. साहसाची त्याला आवड आहे आणि नॉर्डिक वंशाचे धैर्य त्याचेपाशी आहे. ]

इंग्लंड ही स्वतःच केवळ एक जागतिक शक्ती आहे. तीनशे वर्षांचे सातत्य तिच्यात आहे. दोस्तीच्या करारांनी ही शक्ती अधिकच वाढलेली आहे. ही शक्ती केवळ एक खंबीर सामर्थ्य आहे, एवढेच नव्हे तर सर्व जगाला व्यापणारी इंग्लंड ही एक मानसिक शक्ती आहे. ]

अशा या इंग्लंडचे आजचे मरण नेमके कुठे आहे, त्याच्यावरही हिटलरने बोट ठेवलेले आढळते—

" In former times to conquer England it was necessary to invade her. England could feed herself. Today she no longer can. Imports of food & fuel oil are dependent on naval protection. Luftwaffe attacks on England will not force her to capitulate. But if the fleet is annihilated, instant capitutation results."

[ पूर्वीच्या काळात इंग्लंडवर विजय मिळवण्यासाठी इंग्लंडवर प्रत्यक्ष स्वारी करावी लागत असे. त्यावेळी इंग्लंडजवळ पुरेसे अन्न-धान्य होते. आज ती परिस्थिती नाही. अन्न व जळणाचे तेल याची आयात करावयाची तर आरमारी संरक्षण हवे. लुफ्तवाफने कितीही बॉम्बहल्ले केले, तरी इंग्लंड शरण येणार नाही. परंतु जर त्याचे आरमार नष्ट केले तर तत्क्षणी शरणागती ठेवलेली असेल. ]

या युद्धात आपली पहिली पावले कशी टाकावयाची याचे मार्गदर्शनही हिटलरने यानंतर केले.

The army must occupy the positions important for the fleet & Luftwaffe. If we succeed in occupying & securing Holland, Belgium, as well as defeating France the basis for a successful war against England has been created."

[ आपल्या आरमारी दलाला आणि लुफ्तवाफला महत्त्वाची ठरणारी सर्व ठिकाणे सैन्याने व्यापली पाहिजेत. जर हॉलंड व बेल्जियम *याचा कबजा करण्यात व फ्रान्सचा पराभव करण्यात आपल्याला यश* मिळाले तर इंग्लंडविरुद्धच्या लढाईत विजय मिळावा या दृष्टीने पाया तयार झाला असे म्हणता येईल. ]

आपण या गोष्टी फार उघडपणे बोलण्यात काही धोका पत्करीत आहोत, अशी शंका यावेळी हिटलरच्या मनाला चाटून गेली असावी, कारण भाषणाची अखेर करताना यासंबंधी त्याने महत्त्वाची सूचना केली.

" The aim will always be to force England to her knees. Secrecy is the decisive pre-requisite for success. Our objective must be kept secret from both Italy & Japan."

[ आपले उद्दिष्ट एकच राहील की इंग्लंडला गुडघे टेकण्यास भाग पाडावयाचे. यश मिळवावयाचे असेल तर आपल्या उद्दिष्टाबाबत संपूर्ण गुप्तता यासाठी पाळली जावयास हवी. आपल्या उद्दिष्टांबाबत इटाली व जपान यानाहि विश्वासात घेतले जाऊ नये. ]

भाषणाच्या या अखेरच्या दोन वाक्यांत, हिटलरने दोन महत्त्वाची सूत्रे ग्रथित केली आहेत. युद्ध करून देशाला बेचिराख करण्यापेक्षा देशाला शरण आणणे फायद्याचे ठरते व दुसरे म्हणजे शांततेच्या काळात किंवा युद्धप्रसंगातही दोन देश हे अखेर सोयीची शय्यासोबत करीत असल्यामुळे आपल्या व्यवहारात फार खोलवर मित्रानाही शिरू देता कामा नये.

जर्मनीच्या व हिटलरच्या दुर्दैवाने ज्या देशाला शरण आणण्याचा

भंग हिटलरने बांधला होता, तो इंग्लंड देश केवळ चेंबर्लेन याचा नव्हता. यामुळें कॉमन्स सभागृह उध्वस्त झाले तरी इंग्लिश पार्लमेंट संपली नाही आणि लंडन राजधानी होरपळून निघाली तरी राजा पळाला नाही. इंग्लंडची मैत्री हिटलरला भाडेपट्टीने देण्याची भाषा काढणारे अडले नारायण सुदैवाने तेथे औषधाला नव्हते.

५ नोव्हेंबर १९३७ ला हिटलरने जेव्हा आक्रमणाचा पवित्रा विषद करण्याकरता अशीच सेनाधिकाऱ्याची गुप्त बैठक घेतली, तेव्हा ब्लोमबर्ग, फ्रिट्श, बेक् आदि सेनाधिकाऱ्यांनी या धोरणाला विरोध केला होता, हे वाचकाना आठवत असेल. परंतु या दुसऱ्या तशाच बैठकीत–हिटलरने युद्धाचा पवित्रा घेतला तरी एकही सेनाधिकारी या धोरणाला विरोध करण्यासाठी उभा राहिला नाही.

### तयारीचा गुप्त अंदाज

दुसऱ्याच दिवशी २४ मे १९३९ ला O. K. W. (जर्मनीची सर्वोच्च लष्करी अधिकारी संघटना) चा आर्थिक व उत्पादन अधिकारी जनरल जॉर्ज थोमास याने परराष्ट्रखात्याच्या अधिकाऱ्यापुढे एक गुप्त अहवाल सादर केला. या अहवालात तो म्हणाला—

"गेल्या चार वर्षांत आपले सैन्यदल सात डिव्हिजन्सपासून सुरवात करून एकावन्न डिव्हिजन्स झाले आहे. यात पाच डिव्हिजन्स या हेव्ही आर्म्ड डिव्हिजन्स असून, चार या 'लाईट आर्म्ड' आहेत. अशातऱ्हेचे अद्ययावत सुसज्ज सैन्यदल असण्याची शक्यता इतर कोणत्याही देशाबाबत नाही. २६००० टनाची दोन आरमारी जहाजे, दोन क्रूझर्स, १७ विनाशिका आणि ४७ पाणबुड्या एवढे आरमारी दल आपल्यापाशी चार वर्षांपूर्वी होते. यात ३५००० टनाच्या आणखी दोन आरमारी बोटी, एक विमान वाहतूक करू शकणारी बोट (Air Craft Carrier), चार मोठ्या क्रूशर्स, पाच विनाशिका व सात पाणबुड्या यांची भर चार वर्षांत पडलेली आहे. विमानदल असे जर्मनीपाशी नव्हतेच. लुफ्तवाफ या आपल्या वैमानिक दलात २६०००० प्रशिक्षित माणसे असून.. विमानदलाच्या २१ स्क्वॅड्रन्स आपल्यापाशी आहेत. जर्मनीच्या या शस्त्रास्त्र उत्पादनाला जगात तोड राहिलेली नाही."

एवढ्या सर्व शस्त्रदलासहदेखील जर्मनीला इंग्लंड, फ्रान्स व रशिया या तिघांशी एकाचवेळी लढणे केवळ अशक्य होते. यामुळे १९३९ चा उन्हाळा जसजसा सपत येऊ लागला, तसतशी हिटलर...या तिघांपैकी कुणाला फोडू शकतो यावर पुढल्या लढाईचे भवितव्य निश्चित झालेले होते. हे खरोखर एक उघड सत्य होते, की दोन आघाडीवर जर्मनी कितीही बलाढ्य झाला तरी फार काळ लढू शकणार नाही. म्हणूनच १९ मे ला विन्स्टन चर्चिल यानी सरकारला पोटतिडिकेने सागितले—'मेहेरबान, महत्त्वपूर्ण सत्ये आपल्या टाळक्यात ठसवून व्यवहार करा. आपल्या अहमन्य बुद्धीच्या तोऱ्यात वावरू नका. रशियाने केलेली सूचना समाधानकारक आहे. सोपी आहे. स्पष्ट आहे.'

### अखेर चेंबर्लेन नमले

ज्यावेळी या टीकास्त्रापुढे नमून चेंबर्लेन यांनी या दृष्टीने खटपट करण्याची सूचना मॉस्कोमधील ब्रिटिश वकिलाला धाडली, तेव्हा २७ मे उजाडला होता. हिटलरमुळे ज्या युरोपियन राष्ट्राना धोका आहे त्यांना ब्रिटन–फ्रान्स–रशिया यानी संरक्षण करारान्वये मदत देण्याची सूचना परराष्ट्रखात्याने अनिच्छेनेच धाडली...

"The British Govt. has taken the step with the greated reluctance."

(अत्यत अनिच्छेने ब्रिटिश सरकारने हे पाऊल उचलेले आहे...) हे वाक्य लंडनमधील जर्मन वकील डर्कसेन (Dirksen) याने जर्मन परराष्ट्रखात्याकडे वृतान्त धाडला त्यातील आहे. हा वृत्तात धाडताना या जर्मन वकिलाने पुढे म्हटले की–

"ब्रिटिश परराष्ट्रखात्याला जर्मनीने रशियाशी काही प्राथमिक बोलणी केली असल्याचा सशय आलेला आहे. रशियाला तटस्थ ठेवण्याची ही खटपट यशस्वी झाली तर जर्मनीला सर्व बाजूने घेरणाऱ्या ब्रिटिश नीतीचेच तीनतेरा होतील, या भीतीपोटी ही सूचना करण्यात आलेली आहे."

जर्मन वकिलाचा हा अन्वय तंतोतंत खरा होता. रशियाचा नवा परराष्ट्रमंत्री मोलोटोव्ह हे जाणून होता, की आतापर्यंत लिटविनॉव्हच्या प्रयत्नांना नकार देणारे ब्रिटिश सरकार आता एकाएकी मॉस्कोच्या प्रेमात पडणार आहे, ते केवळ आज त्याची बोटे दगडाखाली आहेत म्हणूनच. आता जो करारमदार होईल तो सपूर्णतया रशियाच्या अटीवरच होईल. ३१ मे १९३९ ला मोलोटोव्ह याने यु. एस्. एस्. आर्. च्या सुप्रीम कौन्सिलपुढे परराष्ट्रव्यवहारावर जे भाषण केले, त्यात त्याने असा पवित्रा घेतला –

(१) या दोस्तांशी होणाऱ्या कराराचे स्वरूप फक्त संरक्षणात्मक राहील.

(२) ही जी संरक्षणाची हमी द्यावयाची ती केवळ पोलंडपुरती मर्यादित न ठेवता रशियाच्या सरहद्दीवरील सर्वच लहानसहान देशांना ती लागू असावी.

(३) असा करार रशियाने केला तरी इटाली व जर्मनीशी आर्थिक सहकार्याचे करार करण्याचा रशियाचा जो अधिकार, त्याला त्यामुळे बाध येता कामा नये.

यातील पहिल्या अटीचा अर्थ असा होता, की उद्या ब्रिटन, फ्रान्सने, हिटलरने आतापर्यंत घशात घातलेल्या मुलुखावर आक्रमण करून तो प्रदेश पुन्हा मिळवण्याचे ठरवले, तर अशा आक्रमक लढाईत रशिया सहभागी होणार नाही. मात्र आहे या परिस्थितीच्या पुढे जर हिटलरने नवे आक्रमण केले तरच रशिया–ब्रिटन, फ्रान्सबरोबर युद्धात उतरेल. दुसरी गोष्ट रशियाच्या सरहद्दीवर पोलडव्यतिरिक्त जे देश आहेत, त्या बाबतीत ब्रिटन-फ्रान्स कानाडोळा करू म्हणतील, तर ते जमणार नाही. हा करार सर्वच राष्ट्राबाबत लागू करा. रशियन नेत्याच्या मनात ब्रिटनविषयी जो अतोनात अविश्वास होता, त्यातूनच या पवित्र्याचा जन्म झालेला होता.

शूलेनबर्ग याने या भाषणाचा वृत्तात बर्लिनला कळवताना म्हणूनच स्पष्टपणे कळवले–

(१) रशियाच्या एकूण एक अटी मान्य झाल्या, तरच मैत्री करार होईल, अशी मोलोटोव्हची भूमिका असल्यामुळे–प्रत्यक्ष करार–हा वाटाघाटीच्या घोळात बराच काळ लोंबकळत राहील, यात शका नाही.

(२) जर्मनीविरुद्ध मोलोटोव्हने काहीही उच्चार केला नाही. उलट जर्मनीशी आर्थिक व्यवहार करण्याचा आपला मनोदयच सागितला.

### हिटलरने गळ टाकला

शूलेनबर्गच्या या वृतातामुळे, हिटलरने रशियाला नेमके काय हवे आहे ते देऊ करून, स्टॅलिनचा मासा आपल्या गळाला लावण्याचाच निर्णय पक्का केला.

२६ मे ला रिबेन्ट्रॉप याने शूलेनबर्गला पत्र तयार केले. मोलोटोव्ह याची भेट घेऊन जर्मन सरकारचे म्हणणे त्याच्या कानावर घालण्याची सूचना या पत्रात होती. या पत्रात रशियाला पोलंडच्या लुटीत काही वाटा देण्याची अप्रत्यक्ष सूचना आढळते या पत्रात रिबेन्ट्रॉपने लिहिले आहे—

–"The time has come for normalization of German-Soviet foreign relations. The Italo–German alliance is *not directed against the Soviet Union*. It is exclusively directed against the Anglo–French combination

If against our wishes it should come to hostilities. with Poland, we are firmly convinced that even this need not in any way lead to a clash to interests with Soviet Russia. While settling the German Polish question–in whatever way this is done–we would take Russian interest into account as far as possible."

[ जर्मनी–रशिया याचे परराष्ट्रसंबंध सलोख्याच्या नैसर्गिक स्थितीत आणण्याची वेळ आली आहे. इटाली–जर्मन संधी हा सोविएट युनियन-विरुद्ध नसून त्याचा एकमेव रोख अँग्लो–फ्रेंच युतीविरुद्ध आहे.

जर आमची इच्छा नसताना पोलंडशी आमचा झगडा उडाला–तरीसुद्धा आम्हाला असे पक्के वाटते, की यामुळेदेखील रूसो–जर्मन संबंधात अंतराय उत्पन्न होण्याचे कारण नाही. कारण जर्मन–पोलिश प्रश्नाचा अखेरचा निर्णय घेताना–मग ही वेळ कोणत्याही मार्गाने आणली गेलेली असो–आम्ही रशियाच्या हिताचा शक्य तेवढा विचार अवश्य करू. ]

हे पत्र २६ मे ला तयार झाले, परतु हिटलरने ते लगेच धाडले नाही. पत्र धाडावे की धाडू नये या विचारात त्याने चार दिवस घालवले व अखेर ३० मे ला पत्र रवाना झाले. या चार दिवसांत त्याला एक महत्त्वाचे वृत्त निश्चित कळले होते आणि ते म्हणजे—

'पोलंड हा रशियाचे सरक्षण घेण्यास तयार नाही. आपल्या सरहद्दीत रशियन फौजा येऊ देण्यास त्याचा सतत विरोध आहे.'

हे वृत्त सर्वस्वी खरे होते. पोलंडने हे आत्मघातकी धोरण स्वीकारले होते. पोलंडने हे का करावे ? याचे कारण म्हणजे १९२० च्या सुमारास रशियाचा १५० मैलाचा जो भूपट्टा पोलंडने लाटला होता, त्या भागात एकदा रशियन फौजा आल्या की परत जाणार नाहीत ही भीती पोलंडला वाटत होती. यामुळेच ब्रिटन–फ्रान्सच्या रशियन–संपर्क व्यवहारात पोलंडनेच कोलदांडा घातला होता.

### इंग्लंड–फ्रान्सचे वेळकाढू धोरण

जूनच्या सुरवातीला मोलोटोव्ह यांनी ब्रिटन सरकारला आपल्या परराष्ट्रमंत्र्यास मॉस्को भेटीचे निमंत्रण दिले. लॉर्ड हॅलिफॅक्स यांनी मॉस्कोला स्वत: जाण्यास नकार दिला. आपल्याऐवजी विल्यम स्ट्रँग (Strang) या रशियन भाषा येणाऱ्या व पूर्वी मॉस्को वकिलातीत काम केलेल्या परराष्ट्रखात्यातील कनिष्ट अधिकाऱ्यास मॉस्कोला जाणाऱ्या ब्रिटिश शिष्टमंडळाचे नेतृत्व दिले. म्युनिचला स्वत: चेंबर्लेन येतात आणि मॉस्को–भेटीला मात्र त्याचा परराष्ट्रचिटणीसही येऊ इच्छित नाही...ही गोष्ट क्रेमलिनला झोंबली.

१४ जूनला विल्यम स्ट्रँग ब्रिटिश शिष्टमंडळासह मॉस्कोला पोचला यानंतर ब्रिटिश–फ्रेंच प्रतिनिधीच्या मोलोटोव्हबरोबर, जवळजवळ ११ बैठकी झाल्या. परतु वाटाघाटींना यश येईना. २९ जूनला 'प्रवदा' पत्रात झाडनॉव्ह या पॉलिटब्यूरोच्या सभासदाने "ब्रिटिश व फ्रेंच सरकारना रशियाबरोबर बरोबरीच्या नात्याने मैत्री करार करण्याची इच्छा दिसत नाही–" असे प्रतिपादन करणारा खरमरीत टीकालेख प्रसिद्ध केला. झाडनॉव्ह हा स्टॅलिनच्या विश्वासातील असल्यामुळे, हा लेख स्टॅलिनच्या इशाऱ्याप्रमाणे लिहिला गेला आहे, असे आपले मत शूलेनबर्ग याने बर्लिनला कळवले. उद्या वाटाघाटी फिसकटल्या तर दोषाचे खापर ब्रिटिश–फ्रेंचावर फुटावे, अशी तरतूद झाडनॉव्ह याने करून ठेवली होती.

ब्रिटिश–फ्रेंच प्रतिनिधी व रशियन प्रतिनिधीच्या या वाटाघाटी आणखी वीस दिवस रेंगाळत चालू राहिल्या. जर्मनीचे 'अप्रत्यक्ष आक्रमण' झाले तरी या करारान्वये हिटलरविरुद्ध कारवाई करावी, असे रशियन प्रतिनिधी म्हणत होते. अप्रत्यक्ष आक्रमण म्हणजे नेमके काय ? या सवलतीचा फायदा घेऊन फिन्लंड, रुमानिया या देशावर रशियन फौजांनी कबजा केला तर तोंड बाधून मार खावा लागेल, अशी भीती ब्रिटिश–फ्रेंचाना वाटत होती. वाटाघाटी फिसकटवून टाकण्यापेक्षा .....या करारान्वये जे लष्करी सहकार्य करावे लागेल, त्याचा विचार करण्याकरता ब्रिटिश–फ्रेंच लष्करी मंडळे मॉस्कोत यावीत, असा निर्णय २३ जुलैला घेतला गेला.

आता लष्करी सहकार्य करण्याचा विचार करताना, ब्रिटिशांना भीती वाटत होती, की आपले शिष्टमंडळ गुप्त स्वरूपाची माहिती रशियाला देईल. तेव्हा त्याला सर्व अधिकार न देता–मर्यादित अधिकारच द्यावे. ब्रिटिश व फ्रेंच लष्करी मंडळे मॉस्कोला निघाली, ती कनिष्ठ दर्जाचे लष्करी अधिकारी घेऊन व पुरेसे अधिकार न घेता !

याउलट रशियन लष्करी मंडळाचे नेतृत्व मार्शल व्होराशिलोव्ह हे रशियाचे संरक्षणमंत्री स्वत: करणार होते. ब्रिटिश–फ्रेंच शिष्टमंडळे विमानाने न येता पॅसेंजर बोटीने निघाली ! लेलिनग्राडला जाण्यासाठी ५ ऑगस्टला निघालेली ही मंडळी ११ऑगस्टला मॉस्कोला पोचली.

हे जे सात–आठ दिवस या मंडळींनी प्रवासात घालवले, तेवढ्या वेळात हिटलरने रूसो–जर्मन संबधाना वेगळे वळण देऊन ब्रिटिश–फ्रेंचाच्या रशियन धोरणाला पुरता सुरुंग लावला !!

### रिबेन्ट्रॉपचा झपाटा

३ ऑगस्टला रिबेन्ट्रॉप याने शूलेनबर्ग याला महत्त्वाची गुप्त तार पाठविली—

"कालच माझे व रशियन वकिलातीतील अधिकारी अॅस्टॅकोव्ह (Astakhov) यांचे बोलणे झाले. यासंबधी निराळ्या तारेने सूचना पाठवण्यात येतील."

"रूसो–जर्मन संबंध सुधारावे या दृष्टीने बाल्टिकपासून काळ्या समुद्रापर्यंत असा एकही प्रश्न नाही की जो दोघांना समाधानकारकरीतीने सोडवता येणार नाही. जर रशियन सरकारची अशीच

इच्छा असल्याचे, अॅस्टॅकोव्हमार्फत मला कळले, तर अशी बोलणी करण्यास मी तयार आहे."

वरील तार १२.५८ला मध्यरात्री गेली. पाठोपाठ पहाटे ४ वाजता अॅस्टॅकोव्हशी जे बोलणे झाले, त्याचा वृत्तात गेला. या वृत्तातात पोलंडच्या भवितव्यावाबत रशियाशी बोलणी करण्यास आपण तयार आहोत, असे रिबेन्ट्रॉपने अॅस्टॅकोव्हमार्फत रशियन सरकारला कळवले आहे, असा स्पष्ट निरोप शूलेनबर्गला मिळाला.

शूलेनबर्गला नव्या प्रयत्नांची निश्चित दिशा समजताच, त्याने त्याच दिवशी मोलोटोव्हची भेट घेतली व पोलंडबाबत समझोता करण्याची बोलणी उघडली. मोलोटोव्हने सांगितले–

"आतापर्यंत राईश सरकारने रशियाविरोधी ज्या गोष्टी केल्या त्याचे काय ? अँटी कोमिर्टन पॅक्ट, जपानला रशियाविरोधी दिलासा आणि म्युनिच कराराच्या वेळी रशियाला निमंत्रण न देण्याचे धोरण या सर्व वागणुकीशी तुमची आताची सूचना याचा कसा मेळ घालायचा ?"

शूलेनबर्ग मोलोटोव्ह यांच्या या पवित्र्याने निराश झाला. त्याची समजूत झाली की ब्रिटिश–फ्रेंच व रशिया यांची बोलणी होऊन जर्मनविरोधी संधी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याने तर मोलोटोव्ह असे बोलत नसेल? शूलेनबर्गची ही भीती खोटी होती.

रूसो–जर्मन वाटाघाटीचे राजकारण पुढे कोणत्या वळणाने गेले ते पाहण्यापूर्वी मुसोलिनीच्या धांदलीकडे थोडे लक्ष देण्यास हवे.

### "आम्हाला आता युद्धच हवे आहे"

जून १९३९ पासून मुसोलिनीला हे स्पष्ट दिसू लागले होते की हिटलर आता युरोपात युद्ध पेटवणार. इटालीची तर युद्धाला तयारी नव्हती! यातून मार्ग काढावयाचा तर पोलंडच्या प्रश्नावर म्युनिचप्रमाणे एखादी आंतरराष्ट्रीय परिषद घ्यावी, हे उत्तम या दृष्टीने ७ ऑगस्ट दिवशी आपला परराष्ट्रमंत्री व जावई–काऊंट सियानो याला रिबेन्ट्रॉपला भेटण्याचा आदेश मुसोलिनीने दिला. पत्रव्यवहार झाला व ११-१२-१३ ऑगस्टला साल्झबर्ग येथे भेट निश्चित झाली.

११ ऑगस्टला साल्झबर्गजवळील रिबेन्ट्रॉपच्या निवासात ही भेट झाली. जेवण्यापूर्वीच सियानोने विचारले–

"Well Ribentrop, what do you want? The corridor or Danzig?"

"Not that any more"–Rebentrop replied gazing at him with his cold mettalic eyes–

"We want war."

("काय रिबेन्ट्रॉप...... तुम्हाला काय हवे आहे ? कॉरिडॉर की डॅन्झिग ?" सियानोने विचारले.

"तेवढयाने आता मागणार नाही–" रिबेन्ट्रॉपने आपली थंड–धातूदेखली नजर त्याच्यावर रोखीत म्हटले– "आम्हाला युद्ध हवे आहे.")

सियोनोला वाटत होते की जर्मनीने दोन मागण्या अशासाठी केल्या आहेत की निदान डॅन्झिग नक्की मिळेल व समझोता म्हणून कॉरिडॉरचा हट्ट मागे घेण्यात येईल. या हिशेबाने त्याने प्रश्न विचारला होता. रिबेन्ट्रॉपचे उत्तर ऐकताच सियानोने सागितले की पोलंडशीच फक्त युद्ध होईल, या भ्रमात जर्मनीने राहू नये. यावेळी इंग्लंड व फ्रान्स युद्धात पडतील व जागतिक युद्ध पेटेल. रिबेन्ट्रॉपने पैज मारली की यावेळीदेखील इग्लंड–फ्रान्स हात चोळीत राहतील! पुढे चार वर्षांनी २३ डिसेंबर१९४३ ला व्हेरोना तुरुंगात फासावर लटकण्यापूर्वी या पैजेची सियानोला आठवण झाली. आपल्या अखेरच्या दैनंदिनीत त्याने लिहिले आहे– "रिबेन्ट्रॉप ही पैज हरला, परंतु माझे बक्षीस काही त्याने मला दिले नाही–"

रिबेन्ट्रॉपशी मुलाखत संपवून फ्यूररला भेटण्यासाठी सियानो ऑबर साल्झबर्ग येथे गेला. १२ व १३ ऑगस्टला अशी दोनदा ही भेट झाली. आपल्या भेटीत सियानोने आतरराष्ट्रीय परिषद घेण्याचा प्रस्ताव मांडला. तावडतोब हिटलर म्हणाला–

### इटालीची फरफट

"परिषद घ्यावयास माझी ना नाही. परंतु यावेळी परिषदेला रशियालाही निमंत्रण द्यावे लागेल."

पुढे संभाषणाच्या ओघात हिटलरने सागितले—

"मला व्यक्तिश: असे वाटते, की पोलंडच्या प्रश्नावर युद्ध पेटवण्याचा विचार अखेरच्या क्षणी पाश्चिमात्य राष्ट्रे सोडून देतील."

यावर सियानोने सागितले—

"तुमची अपेक्षा खरी ठरावी, अशी माझी इच्छा आहे, परंतु ती खरी ठरेलसे वाटत नाही."

पुढे सियानोने ही गोष्ट स्पष्टपणे सागितली, की नजीकच्या काळात इटालीला युद्ध नको आहे. १९४२ पर्यंत युद्धाचा विचार इटाली करू शकत नाही.

हिटलरने जेव्हा सागितले की लवकरात लवकर पोलंडने आमच्या मागण्याबाबत काय ते ठरवले पाहिजे, तेव्हा सियानोने विचारले,

"लवकारात लवकर म्हणजे कोठपर्यंत ?" हिटलरने सांगितले —

"By the end of Aug. at the latest. It will take only fortnight to defeat Poland. Final liquidation would require further two or four weeks."

[ऑगस्ट सपण्यापूर्वी याचा निर्णय झाला पाहिजे. पोलंडचा पराभव करायला पंधरा दिवस लागतील व पुरती विल्हेवाट लागेपर्यंत आणखी दोन ते चार आठवडे लागतील.]

हिटलरने युद्धाची तारीख १ सप्टेंबर जी एकदा ठरवली होती, त्याच दृष्टीने त्याचे सारे डावपेच पडत होते. पोलंडच्या पराभवाचा त्याचा अदाजही ततोतंत खरा ठरला.

१२ ऑगस्टला सियानोची ही हिटलरबरोबरची दुसरी भेट चालू असतानाच, मॉस्कोहून आलेली महत्त्वाची तार हिटलरला मिळाली. हिटलरने तार वाचून रिबेन्ट्रॉपकडे दिली......व नतर तो सियानोला म्हणाला––

"The Russions have agreed to a German political negotiater being sent to Moscow."

[जर्मनीने वाटाघाटी करण्यासाठी मॉस्कोला राजकीय प्रतिनिधी पाठवावा, याबाबत रशियाने संमती कळवली आहे.]

१३ ऑगस्टला रोमला परतताना सियानोने आपल्या दैनंदिनीत लिहिले––

"I return to Rome completely disgusted with the Germans, with their leader, with their way of doing

things. They have betrayed us & lied to us. Now they are dragging us into an adventure which we have not wanted–"

[ " रोमला मी परतत आहे. या जर्मनांचा, त्यांच्या नेत्याचा, त्यांच्या वागण्याच्या पद्धतीचा मला उबग आला आहे. त्यांनी आमचा विश्वासघात केलेला असून...आम्हाला त्यांनी अंधारात ठेवलेले होते. आता ते आम्हाला अशा एका साहसात फरफटवीत नेत आहेत की जे करण्याची आमची इच्छा नाही–– ]

हिटलरने पोलंडवर १ सप्टेंबरच्या सुमारास हल्ला करण्याचा निर्णय घेतलेला आहे व याबाबत रशियाशी त्याने काहीतरी संधान बांधले आहे, या दोन्ही गोष्टी सियानोच्या लक्षात आल्या होत्या. या युद्धात इटालीला पडावे लागणार नाही......कारण बहुधा पोलंडसाठी जागतिक युद्ध पेटवण्याचे धाडस ब्रिटन–फ्रान्स करणार नाही, असा जर्मनीचा समज होता. तो चुकीचा आहे, असे सियानोला वाटत होते. या जागतिक युद्धात पोलादी करारानुसार पडावे लागले, तर इटालीची आज काहीच तयारी नाही. असे सर्व असल्यामुळे, आपले निर्णय मित्रांना विश्वासात न घेता हिटलर घेत आहे, याचा विषाद सियानोला वाटणे साहजिकच होते.

## रिबेन्ट्रॉप मॉस्कोच्या वाटेवर

सियानोला १२ ऑगस्टला जी तार मॉस्कोहून आल्याची म्हणून दाखवण्यात आली, ती तार जर्मन कागदपत्रांत उपलब्ध झालेली नाही. यावरून ती खोटी व बनावट असण्याची शक्यता आहे. परंतु कदाचित ती खरीही असेल, कारण १२ ऑगस्टला अॅस्टॅकोव्ह याचेमार्फत बर्लिनला निरोप आला होता, की जर्मनीबरोबर राजकीय प्रश्नांची चर्चा करण्यास मोलोटोव्हची तयारी आहे. बोलणी मात्र मॉस्कोत होतील......व घाईघाईने उरकण्यात येणार नाहीत.

१ सप्टेंबर ही पोलंडच्या हल्ल्याची तारीख मनोमन निश्चित करताच १४ ऑगस्टला रशियाबरोबरची बोलणी यथावकाश हळूहळू करून पुरी करणे हिटलरला परवडणारे नव्हते. अँग्लो-फ्रेंचांशी सुरू झालेल्या रशियाच्या बोलण्याला सुरुंग लावावयाचा तर स्टॅलिनबरोबर तावडतोब संधी उरकणे भाग होते.

१४ ऑगस्टला हिटलरने रिबेन्ट्रॉपशी महत्त्वाचे बोलणे केले व तावडतोब रिबेन्ट्रॉपने शूलेनबर्गला तार करून खालील मजकूर मोलोटोव्हला वाचून दाखवण्यास सांगितले. शूलेनबर्गने मोलोटोव्हची भेट घेऊन जे पत्र वाचून दाखवले ते असे होते––

" रशियन सरकार आमच्याशी बोलणी करण्यास तयार असल्याचा निरोप मिळाला. रूसो–जर्मन संबंधाचे निराकरण नेहमीच्या खाते पद्धतीने, वकिलातीमार्फत करावयाचे तर फारच काळ जातो, असा अनुभव असल्यामुळे मी मॉस्कोला धावती भेट देण्यास तयार आहे. ही भेट मी फ्यूररच्या वतीने मागत असून, फ्यूररचे याविषयक विचार मी स्वतः स्टॅलिनपुढे प्रत्यक्ष मांडू इच्छितो. अशा भेटसंबंधामुळे रूसो-जर्मन संबंधाचा पाया घातला जाऊन, त्यात योग्य ते बदल घडविणे सोपे जाईल, असे मला वाटते. "



**युद्धनेता ......मार्शल स्टॅलिन**

मॉस्कोला जाण्यास लॉर्ड हॅलीफॅक्स यांना कमीपणा वाटत होता... परंतु तिथे जाण्यास रिबेन्ट्रॉप मात्र आपण होऊन तयार होतो, याचा परिणाम स्टॅलिन व मोलोटोव्ह यांचेवर झाल्याशिवाय कसा राहील ? या भेटीत रशिया व जर्मनी या दोघांचे समाधान होईल, अशारीतीने बाल्टिकपासून काळ्या समुद्रापर्यंतच्या प्रदेशाचे प्रश्न सोडवण्याची जर्मनीची इच्छा पूर्वीच कळवलेली होती. याचा अर्थ ज्या भूभागावर रशियाला वर्चस्व हवे आहे, तो रशियाला देऊन, जर्मनीला ज्यावर तूर्ततरी वर्चस्व हवे आहे, तो पोलंडचा पश्चिम भाग मिळवण्याचा प्रयत्न आता हिटलर करणार आहे, याचा अंदाज क्रेमलिनला आला. पोलंडची फाळणी ! युद्धाची सर्व जबाबदारी जर्मनीवर टाकून पोलंडने लाटलेला प्रदेश पुन्हा मिळवण्याची संधी !! हे सर्व साधून शिवाय जर्मनीला आपल्या अफाट सामर्थ्यानिशी भांडवलशाही इंग्लंड-फ्रान्सवर छूः करण्याचे समाधान !!! स्टॅलिन खूष होता आणि हिटलरही. कारण स्टॅलिन गळाला लागणार ही हिटलरची बालंबाल खात्री होती...आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणे स्टॅलिनचा मासा हिटलरच्या गळाला आठवडाभरात लागलाहि–– [अपूर्ण]



माणसांची, गप्पागोष्टींची अतोनात हौस असलेला मामांसारखा दर्दी व उद्योगी साहित्यिक आता पुन्हा भेटणे नाही.–

# मामांच्या नव्हे, माझ्या आठवणी

प्रा. भीमराव कुलकर्णी

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात एकदा फोन आला. ' मामा वरेरकरांची अमकी अमकी पुस्तके हवी आहेत. काढून ठेवा !' मी नावे टिपून घेऊन पुस्तके काढून तयार ठेवली. संध्याकाळी ती पुस्तके घेऊन जाण्याचा प्रसंग माझ्यावरच आला.

' कुठे पोचवायची ?'

' मामांकडे !

' कोण मामा ?'

' वरेरकर.'

' म्हणजे मामांचीच पुस्तके मामांकडेच पोचवायची ?'

' होय !'

मुकाटचाने ती पुस्तके घेऊन मी हाजीकासमवाडी शोधीत गेलो.

' कोण आहे ?' आतून आवाज आला.

' मी !'

' म्हणजे कोण? हरी नारायण आपटचांच्या का आपला मालवणच्या मामाचा रामजोशी?'

त्यावेळी मी वेडचासारखा तसाच दरवाज्यात उभा राहिलो, कारण आतल्या व्यक्तीला बरोबर काय म्हणावयाचे आहे, हे काही माझ्या टाळक्यात शिरले नाही.

मग मामाच बाहेर आले. माझ्या हातातील पुस्तके पाहून, ' मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातून आलास वाटतं ? मग असा उभा का दरवाज्यात देणेकऱ्यासारखा ? अरे, दरवाजा सताड उघडा आहे, आपलं सरळ आत यावं !'

मग मी हातातील सगळी पुस्तके खाली ठेवली. रग लागलेल्या हातांना बरे वाटले. मग मामांनी ती पुस्तके चाळली. ' अरे पण, मला हवी होती ती सगळी पुस्तके नाही आणलीस ?'

' जेवढी मिळाली तेवढी सगळी आणली!'

' छान, म्हणजे माझ्या पुस्तकाकरता मलाच संशोधक व्हावे लागेल. हं, कोणती राहिली. तू यादी कर...'

मामांनी त्यांच्या न मिळालेल्या पुस्तकांची यादी देऊन परत दुसऱ्या दिवशी ती पुस्तके आणावयास सांगितली. यादी खूपच लांबलचक होती. मामांनाच त्यांनी लिहिलेल्या कित्येक पुस्तकांची नावे आठवत नव्हती. दुसऱ्या दिवशी खूप शोधाशोध करूनही मामांना हवी असलेली सर्व पुस्तके मिळू शकली नाहीत.

मला वाटते ते वर्ष १९५३चे किंवा ५४चे असावे. मामांची त्यावेळची आर्थिक स्थिती

फारच ओढघस्तीची होती. मामा त्यावेळी रहस्यकथा लिहिण्याचा उद्योग करीत आणि त्यासाठी त्याना वारंवार लेखक म्हणून कोणाची तरी मदत लागे. त्यावेळी कॉलेज-मध्ये माझ्यापुढे असलेल्या अहिल्या सामत-सारख्या विद्यार्थिनी त्यासाठी त्याच्याकडे वारवार जात. अधूनमधून केव्हातरी मीही मामाकडे जाऊ लागलो.

मामांच्या स्वभावाचे वैशिष्टय असे की, ते तावडतोब नानातऱ्हेच्या गप्पागोष्टीत आलेल्या–गेलेल्याना गुंतवून टाकीत. समोर आलेल्या–बशीतील अर्धा बटाटावडा त्याच्या-पुढे करीत किंवा अर्धा कप चहा घ्यावयास आग्रह करीत. त्यामुळे अगदी नवख्या माण-साचा बुजरेपणा किंवा परकेपणा नाहीसा होई कोणीही असो, मामा त्याच्याशी इतक्या मोकळेपणाने व ऐसपैस बोलत राहात की, प्रत्येकाचा सकोच तात्काळ नाहीसा होऊन तो अगदी फार दिवसाची ओळख असल्यासारखा वागू लागे. आणि मामाही त्याला अगदी बरोबरीच्या नात्याने वागवीत.

माझा व मामाचा परिचय झाल्यानंतर मामानी माझी संपूर्ण चौकशी केली. मी मुब-ईत एका सारस्वत कुटुबाकडे राहतो, असे म्हटल्यानंतर मामांना माझ्याबद्दल तात्काळ जिव्हाळा वाटू लागला. एकदा रविवारी सकाळी त्याच्याकडे गेलो असता ते म्हणाले,

'काय रे कुलकर्णी, ग्रँटरोडजवळून 'बाजार' आणशील का ?'

मी होय म्हणालो, तेव्हा त्यानी मासळी-साठी असलेली पिशवी व एक रुपयाची नोट माझ्या हातात ठेवली. मी वेड्यासारखा पाहातच राहिलो. मामाच्या ते लक्षात आले.

'म्हणजे, अजून तू अंड्यातच आहेस म्हण की !' आणि त्यानी हातातून पिशवी काढून घेतली.

त्यावेळी मामाना काहीतरी सारखे खमंग खायला लागत असे. अमक्या हॉटेलातले दोन आण्याचे वडे आण, कुलकर्ण्याची भजी आण, फरसाण, खमणढोकळा आणि वरती घसा शेकण्याकरता चहा.

पैशाची चणचण तर नेहमीच असे. ते वारंवार खिशात हात घालून बोलून दाखवीत.

'आज, बिड्यांसाठी पैशाची कुठून तरी व्यवस्था केली पाहिजे !'

त्यावेळी ममाशी प्रकाशक या नात्याने निष्ठेने साथ केली, ती अभिनव प्रकाशन संस्थेचे श्री. वामन वि. भट यानी ! मामाच्याकडे ते वारवार येत. त्यांना काय हवे नको ते पाहत. पैशासाठी मग मामा रुपया, दीड रुपया पान या दराने काहीही लिहावयास घेत दिवाळी अकासाठी कोणी गोष्ट मागायला आला की, त्याला काही रक्कम (रुपये दहा) अगोदर मागत. शाळा-कॉलेजच्या स्नेहसमेलनातून त्यांची नाटके क्वचितच केली जात आणि सत्तेच्या गुलामासारख्या त्याच्या नाटकाचा एखाद-दुसरा प्रयोग होई, परतु त्याचे हक्क पेढार-कराकडे असल्याने मामा अक्षरश: अस्वस्थ होत आणि एखादा इरसाल शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडे. मला आठवते, त्याच्या एका नाटकाच्या प्रयोगाच्या परवानगीसाठी त्याच्याकडे पत्र आले होते, त्यावेळी मामा अगदी खुशीत होते. मानधन येण्याला अद्याप अवकाश होता, परतु मामानी कुठूनतरी पैसे आणून ते खर्चून टाकले होते. एकदोन दिवसाआड कुठल्यातरी प्रकाशकाकडे मामां-कडून पैशाचा तगादा होई.

आपली नाटके कॉलेजच्या स्नेहसमेलन-प्रसंगी होत नाहीत, आपल्याला वारंवार भाषणासाठी आमंत्रणे येत नाहीत, साहित्य-सघ आपली नाटके बसवावयास घेत नाही, आपली पुस्तके विद्यापीठ अभ्यासक्रमास नेमीत नाही. साला अत्र्या सगळीकडे मरतो आणि खटाववाडीत बसून तरुण पोरं वाट्टेल ते लिहितात, याबद्दल मामाना त्यावेळी अतिशय वाईट वाटे. १९५५ साली मामानी खटपट करून 'हाच मुलाचा बाप' व 'सत्तेचे गुलाम' ही नाटके मुबई विद्यापीठाच्या बी. ए. च्या परीक्षेला लावून घेतली. त्यावेळीसुद्धा 'सत्तेचे गुलाम'ऐवजी 'सोन्याचा कळस' का लावले नाही, म्हणून मामा कातावले होते. आपली पुस्तके बी. ए. ला लावूनही फारशी प्राप्ती झाली नाही, म्हणून ते वारवार सागत. एकदा ते मला म्हणाले,

'तुमच्या कॉलेजात 'हाच मुलाचा बाप'–वर माझे व्याख्यान ठेव ना !' मी म्हटले, 'हरकत नाही.' मग प्रा. काणेकर याच्या संमतीने सिद्धार्थ कॉलेजमध्ये आम्ही त्याचे व्याख्यान ठेवले. परंतु मामा दुसऱ्या दिवशी म्हणाले, 'अरे नुसते व्याख्यान नको. व्याख्या-त्याला मानधन काय द्यायचे ठरवले आहे ?'

'आम्ही तुम्हांला जाण्यायेण्याचा खर्च देऊ !'

'छाट ! हे बघ, काणेकरांना साग. व्याख्यानाचे दहा रुपये पाहिजेत म्हणावं आणि शक्य झाल्यास ते अगोदर पाठविल्यास मामाच्या उपयोगी पडतात म्हणाव !'

त्यावेळी निरनिराळ्या कॉलेजांतून मामाची व्याख्याने घडवून आणून त्याना काही मदत मिळाल्यास पाहावी, असा प्रयत्न आम्ही केला होता, परंतु फारसे यश मिळाले नाही.

मामानी आपल्या व्याख्यानात 'हाच मुलाचा बाप' नाटकाचे कथानक कादेवाडीच्या एका चाळीत घडल्याची हकीकतच विस्ताराने सागून वेळ मारून नेली आणि व्याख्यान सपल्यावर ते म्हणाले,

'आता सत्तेच्या गुलामावर व्याख्यान केव्हा ठेवतोस बोल ?'

मामांचे व्याख्यान आम्हाला हवे होते, परतु पैशाअभावी आम्ही त्याचे दुसरे व्याख्यान करण्याच्या भानगडीत पडलो नाही.

मामाच्या बरोबर गप्पा मारण्यात त्यावेळी मोठी गमत होती. मामा पुढे जसे फार मोठे झाले, तशी त्यातली गंमत बरीच कमी होत गेली, यात काही शका नाही. त्याच्या गप्पाचे विषय किती म्हणून सागावे. व्हाईसरॉय, गव्हर्नर, लो. टिळक, महात्मा गाधी, खाडिल-कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, वल्लभभाई पटेल, कनू मुन्शी ही सगळी मंडळी मामाच्या चागल्या परिचयाची असत आणि त्याच्या-सबधीच्या आपल्या जीवनात घडलेल्या हकी-कती मामा सागू लागले की, बऱ्याच वेळा त्याला अतिशयोक्तीचा रंग चढे आणि ऐक-णारा मोठ्या तन्मयतेने व भक्तिभावनेने ऐकण्याचे सोंग करी व बाहेर मात्र, 'म्हातारा काय इरसाल थापा देतोय् !' असे बिनदिक्कत म्हणे. अर्थात मामा थापा मारीत नसत, असे मात्र नव्हे. कारण मराठी वाङ्मयामध्ये व मराठी रगभूमीवर घडलेल्या प्रत्येक महत्त्वाच्या घटनेशी ते स्वतःचा काही ना काही सबध लावीत. प्रत्येक गोष्ट आपल्या प्रेरणेने, आपल्या साक्षीने घडली, असे ते ज्यावेळी सागत, त्या-वेळी ऐकणाऱ्याचा चटकन विश्वास बसत नसे, परंतु बऱ्याचवेळा ते म्हणतही, 'अरे, मराठी रंगभूमीच्या वैभवाचे ते दिवस आठवले की, अद्यापही आमच्या अगावर रोमाच उठतात.

त्यादृष्टीने आमची पिढी मोठी भाग्यवान. आम्ही त्यावेळी जे पाहिले आणि उपभोगले, त्याची तुमच्या आजच्या करंट्या पिढीला यत्किंचितही कल्पना येणार नाही. नाटकमंडळीच्या विन्हाडी नाटककार म्हणून या मामाने एखाद्या बादशहासारखे वैभव उपभोगले आहे!'

दिल्लीला गेल्यानंतर मामा प्रत्येक गोष्ट नेहरू आपल्याला विचारून करीत, असे सांगत, त्यावेळीही असेच वाटे, परंतु पुढे पुढे मामाची अतिशयोक्ती सोडली तरी त्या विधानात अर्थ आहे, याची जाणीव सबघितांना झाली होती.

अत्र्यांच्या नाटकाबद्दल बोलताना ती पोराच्या नाटकमंडळचासाठी व शाळाकॉलेजच्या रंगभूमीवर करण्यासाठी लिहिली गेलेली बेगडी नाटके, असा वारंवार उल्लेख करण्यात त्यांना गमत वाटे.

पुण्याबद्दलचे मामाचे ग्रह आणि मामांच्या जातीयतेबद्दल नेमका उल्लेख केला जातो, तो अगदीच खोटा आहे, असे नव्हे. परंतु मामा पुण्याबद्दल बोलताना नेहमी मिष्किलपणाने बोलत. एकदा ते म्हणाले, 'ज्ञानेश्वरांपासून लोकहितवादीपर्यंत मराठी वाङ्मयात तुम्हा देशस्थांची मिरासदारी होती. लोकहितवादीपासून मराठी वाङ्मयात कोकणस्थांनी आपली मिरासदारी सुरू केली नरसोपंत पुण्यास असेपर्यंत ही मिरासदारी पुणं मोठ्या ऐटीत मिरवीत असे, परंतु आम्ही ती पुण्याची पगडी फार काळ मिरवू दिली नाही. सध्या मराठी वाङ्मयाचा केंद्रबिंदू मुंबई आहे आणि त्यामध्ये या मामाचा फार मोठा वाटा आहे. अजूनही पुण हेच मराठी वाङ्मयाचे मध्यवर्ती स्थान आहे, असं समजणारे काही लोक पुण्यात आहेत; पण सारे एकजात आंधळे तरी आहेत किंवा लबाड आहेत.'

लबाड, लुच्चे, साले, मूर्ख आणि भिकारडे ही विशेषणे पुण्याबद्दल बोलताना मामाच्या तोंडात वारंवार आलीच म्हणून समजावे.

'आदिसाहित्यिक हा 'सारस्वत' होता, तो मामाच होता. मध्यंतरी सारस्वतांना त्याचे विस्मरण पडले होते, परंतु हळूहळू कित्येक सारस्वत मराठी वाङ्मयात मोलाची भर घालीत आहेत,' असे ते गंमतीने डोळे मिचकावन म्हणत.

सदू रेगे, पु. ल. देशपांडे व श्री. ना. पेंडसे (ते कोकणचे म्हणून) यांच्याबद्दल मामांना फार प्रेम. पुढेपुढे सदू रेगे कमी लिहायला लागले, त्यावेळी ते हसतहसत म्हणत,

'अरे, कोणीतरी त्याचे लग्न करून द्या, म्हणजे त्याला पुन्हा लिहायला जोर येईल!'

सरकारदरबारी मामाचे वजन वाढण्यापूर्वी मामांच्या भोवती गिरणगावातील कम्युनिस्ट विचारसरणीच्या मंडळीचा वावर नेहमी असे आणि मला असे वाटते की, मामांची ओढघस्त तशीच पुढे चालू राहिली असती तर ते कम्युनिस्टांच्या आहारी संपूर्णपणे गेले असते.

मामाचे व अत्र्याचे विळ्याभोपळ्याएवढे सरळ होते, असे नेहमी सागण्यात येते. मामा मात्र स्वतः तसे कधी मानत नसत. कधीमधी रंगात येऊन 'तो फतऱ्या' असा ते लाडिक उल्लेख करीत.

'अत्रे हा मनाचा दिलदार माणूस आहे, परंतु त्याला कोणीही कसल्या रीतीची त्याच्यावर केलेली टीका खपत नाही. पुण्यात राहिल्यामुळे खेळकरपणाचे इंद्रिय तो हरवून बसला आहे,' असे ते म्हणत.

एकदा मात्र मामांना अतिशय अस्वस्थ झालेले मी पाहिले आहे, ते अत्र्यानी मामाच्यावरती वेडेवाकडे लिहिताना त्याच्या बायकोचा उल्लेख केला होता त्यावेळी. मोठ्या व्यथित अंत करणाने ते म्हणाले,

'या फतऱ्याला आणि फडक्याला दुसऱ्याच्या बायकाबद्दल उल्लेख करण्याचा काय अधिकार आहे?' आणि संतापाने त्याना पुढे बोलवले नाही.

मामा बोलत असताना बऱ्याच वेळेला अर्वाच्य शब्दाची बेसुमार पेरणी करीत. त्यामुळे सुरवातीला काहीसे विचित्र वाटायचे, परतु पुढे पुढे सवय झाल्यानतर त्याचे काही वाटेनासे होई. कोणी बाळत झाल्याचे सांगताना मामा म्हणायचे, अमकी व्याली, तमकीला पिल्लू झाले. एकदा ऑपेरा हाऊसजवळ खांद्यावर एक किरकिरे पोर टाकलेल्या बाईनं मामाना थाबून नमस्कार केला.

'अग कोण? तूं का? लग्न केव्हा केलस?' ती एकदम लाजली.

'नाही, गळयात दावण बावलीस म्हणून विचारले!

मग तिने गेल्याच वर्षी लग्न झाल्याची हकीगत सांगून मामांना आमंत्रणत्रिका पाठविली नाही, याबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

'हे ठीक केलंस! अग, बिड्या फुकायला माझ्याकडे पैसे नाहीत, मग तुला प्रेझेंट कुठन देऊ?' आणि मग शेवटी मामानी मिष्किलपणाने डोळे मिचकावून विचारले,

'अग, तुझ हे पोरगं फारच अशक्त दिसतंय. काय अवतार झालाय् वधितलस! डोगर पोखरून असलं उदीर बाहेर पडलंय् म्हणायच!'

'इश्श!' म्हणून ती लाजली आणि मामा लहान मुलासारखे हसले.

मामाचा स्वभाव खरोखर लहान मुलासारखा होता. ते रागवायचे, वाटेल ते बोलायचे, परतु त्याच्या मनात काही नसायच! निव्वळ गमत करण्यासाठी ते कोटचाळ बोलत आणि चावट बोलण्यात त्याना रस वाटे. बोलताना इग्रजी शब्दाचा वापर करण्याचीही त्यांना अतोनात हौस असे. मामांचा स्वभाव अतिशय निरागस असल्यामुळे ते काहीही बोलले तरी ऐकणाऱ्याला लागायचे नाही.

मामाचे वाचन मात्र अद्ययावत असे. वृत्तपत्रे, मासिके ते नियमितपणे वाचीत. काही वृत्तपत्रे मुद्दाम ते निरोप धाडून मागवून घेत. कोठलीही गोष्ट मागवून घेण्याकडे त्याना फार हौस. त्याचबरोबर अनेकानी आपल्याकडे यावे, गप्पा माराव्या, आपला सल्ला घ्यावा, आपल्या साहित्यसेवेचे कौतुक करावे, याचा त्याना सारखा ध्यास लागलेला असे.

ही त्याची इच्छा लवकरच पुरी झाली. मामा आकाशवाणीचे सल्लागार झाले आणि बघता बघता मामांच्या घरचे स्वरूपच पालटले. मामाची ओढघस्त नाहीशी झाली. मामाकडे अनेक साहित्यिक हेलपाटे घालू लागले. मामाच्या सल्ल्याने आकाशवाणीची सूत्रे हालू लागली. मामा सांगतील त्याला रेडिओवर कॉंट्रॅक्ट मिळू लागले. वेळीअवेळी मामा आकाशवाणीवर फोन लावून बसताना दिसू लागले. आघाडीवर असलेल्या नवसाहित्यिकाना मग मामाचे प्रेम उफाळून आले. मामा दिल्लीला गेल्यानंतर तर ते मुंबईला आलेले कळताच अनेकजण आळीपाळीने त्याना भेटू लागले. मामा खरे सुखावले. त्याचे स्वप्न साकार झाले. ते सल्ला देत, गुणग्रहण करत, चांगले लिहिलेले वाचून अगत्याने त्याचे कौतुक करीत. काही आवडले नसल्यास, 'काय भिकार लिहितोस रे!' असं तोंडावर म्हणत आणि वेळप्रसगी लहान मुलासारखे रागावत.

मामा मुंबईला आल्यानंतर आपल्याकडे अमका अमका आला नाही, हे लक्षात ठेवीत. त्याला निरोपही पाठवीत. तो आला की मामाना बरे वाटे. मग त्याला त्याचे सारे गुन्हे माफ, पण तो आला नाही आणि रेडिओवर त्याला काही कार्यक्रम मिळाला की, मामा तावडतोब आकाशवाणीवरील अधिकाऱ्यांना जाब विचारीत.

मामा मोठे झाल्यानंतर साहजिकच मी त्यांच्याकडे जाण्याचे बंद केले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्ये देवल पुण्यतिथीनिमित्त मामाचे व्याख्यान होते, त्यावेळी मी त्याना तेथे भेटलो.

'काय, हल्ली कुठे असतोस?' त्यानी विचारले.

'इथेच!'

'उद्या घरी ये!' ते म्हणाले.

मी गेलो नाही. एम. ए. झाल्यावर आकाशवाणीवर काही जागा होत्या. त्यासाठी मी अर्ज केला. त्याअगोदर कल्याणला माझे भाषण झाले. 'आजकालच्या कादंबऱ्या' हा विषय. व्याख्यानामध्ये हरिभाऊनंतर एकमेव वास्तववादी कादंबरीकार म्हणजे मामाच, असे मी आग्रहाने सांगितले व ते भाषण नवशक्तीत मोठे शीर्षक देऊन छापून आणले. दुसऱ्या दिवशी आकाशवाणीवरची मुलाखत होती. मुलाखत घेणारे मामाच होते. मुलाखत झाल्यावर मी रात्री त्यांच्या घरी गेलो– मामा भलतेच उखडले. 'आता कोणी बोलावले तुला,' ते उसळून म्हणाले. 'आकाशवाणीवर नोकरी हवी, तेव्हा तुझ्या बापाची तुला आठवण झाली नव्हे का? खोटं भाषण देऊन ते छापून आणलस म्हणून मी फसेन असं वाटल होय तुला? मी साफ सांगतो, तुला नोकरी मिळणार नाही!

मी मुकाटयानं परत आलो. त्यानंतर पुण्याला दीड दोन वर्षांपूर्वी साहित्य परिषदेतर्फे त्याना ऐंशी वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी त्यांची माझी भेट झाली.

'मी हल्ली इथे स. प. कॉलेजात असतो!' मी म्हणालो.

'लुच्चा आहेस!' ते म्हणाले.

'कसे काय चालले आहे?'

'उत्तम!'

'जपून राहा हं, पुण्यात आहेस म्हणून म्हणतो!'

'नाही हो, इथले लोक फार चांगले आहेत!'

'मला नको सांगू! तू लिहून ठेव, पुण्यामध्ये तू फार दिवस राहणार नाहीस!'

त्या दिवशी सध्याकाळी मी लिहिलेल्या 'सौमद्र' नाटकाच्या प्रस्तावनेसबधी त्यानी माझी पाठ थोपटली व ते म्हणाले,

'पण गड्या, त्यामध्ये मामाला करटा म्हणून तू काय मिळविलंस?'

मी खाली मान घालून उभा राहिलो.

'अरे तू स्वामी विवेकानदाच चरित्र लिहिलस म्हणे! कुठेतरी त्याचे झकास परीक्षण वाचले!'

मी धावत जाऊन मामाना ते पुस्तक आणून दिले. नंतर बोलता बोलता मामा म्हणाले,

'अरे, मागे नवशक्तीमध्ये 'मूकनायक' नाटकासबंधी लेख लिहिला होतास नाही का?'

'मामा, अजून तुमच्या ते लक्षात आहे म्हणजे आश्चर्य आहे!'

'अरे मला काय झालय्! शरीर थकलय्, पण मन अजून जसंच्या तस आहे. अजून खूपच काम करण्याची उमेद आहे. बर ते राहू दे. मी 'मूकनायक' नाटकाला प्रस्तावना देण्याचं कबूल केलय्. मी बहुतेक ती लिहून देईनच. त्यापूर्वी मी मरणार नाही, पण मी मेलो तर मात्र 'सौमद्रा'सारखी त्याला प्रस्तावना लिही!'

मी फक्त हसलो. त्यानंतर तिसऱ्या का चौथ्या दिवशी त्याचे पत्र आले. 'गाडीत तुझे विवेकानद वाचले. फार चागले उतरले आहे. कुमारवयातील प्रत्येक मुलाने ते वाचले पाहिजे. या पुस्तकाचे अनेक भाषात भाषातर झाले पाहिजे. मी तशी शिफारस करीन.'– खाली मामानी स्वतःच्या हस्ताक्षरात सही केली होती.

ऐंशी वर्षे उलटली तरी मामाचा विनोदी स्वभाव, त्याची धारदार वाणी, शुद्ध, अस्खलिता, ब्राह्मणी उच्चार व मोत्यासारखे वळणदार अक्षर, सगळ्या गोष्टी जशाच्या तशा होत्या.

पुण्यामध्ये सत्कार झाल्यानतर लेडी रमाबाई हॉलमधून माझ्या खाद्याचा आधार घेऊन खाली उतरताना ते उद्गारले,

'हं, पुणे विद्यापीठाने मामाची दखल घेतली नाही!' आणि मामानी एक दीर्घ उसासा टाकला.

'पुणे विद्यापीठाला मामाचा विरोध होता. पुण्यातील लोकाना कसलीही मदत करू नका, असे मामाच म्हणत.' नतर एकाने मजजवळ खुलासा केला.

मामा दिल्लीला गेले, खासदार झाले. त्यामुळे अनेकाना त्याची गरज लागू लागली. मागच्या पिढीतील साहित्य आणि साहित्यिकाबद्दल बेफाम व अश्रद्ध लिहिणाऱ्या नव्या टीकाकाराना कारणपरत्वे मामाच्या घरचे उबरठे झिजवावे लागले आणि त्यामुळे फडके-खाडेकरावर जी वारवार बेछूट टीका झाली, ती वरेरकरावर झाली नाही, ही गोष्ट खरी आहे, परतु सरकारदरबारी वजन वाढण्यापूर्वीपासून मामा सारखी तक्रार करीत. त्याच्या कादबऱ्या आणि नाटके टीकाकारानी समजून घेतली नाहीत. त्यानी वास्तवतेच्या दृष्टीने जे प्रयोग केले, त्याचे मूल्य फार मोठे असताना टीकाकारानी त्याना अनुल्लेखाने मारले आणि प्रचारी कलावत म्हणून त्याची बोळवण केली.

स्तुतिप्रिय मामाच्या भोवती त्याची स्तुती करणाऱ्या साहित्यिकानी गर्दी केली, परतु मामांची वरील तक्रार शेवटपर्यंत कायमच राहिली. त्या तक्रारीची कारणे फार खोल होती आणि मामाच्या प्रफुल्लित चेहऱ्यावर त्याचे एक दुःख कायमचे कोरले होते.

मामा गेले. अगदी मूकनायकाची प्रस्तावना लिहूनच आणि त्याच्याबरोबरच त्याचा 'दरबार' नाहीसा झाला.

माणसाची, गप्पागोष्टीची अतोनात हौस असलेला मामासारखा दर्दी व उद्योगी साहित्यिक आता पुन्हा भेटणे नाही.

● ● ●

प्रादेशिक नाट्यस्पर्धांतील पुणे केंद्राच्या स्पर्धा झाल्या. त्याचे निकालही लागले. जे क्रमांक लागले त्यातील दुसरे आलेले नाटक 'कथा कुणाची व्यथा कुणा' आणि तिसरे नाटक 'तीनचोक तेरा' ही दोनही नाटके त्याच्या योग्यतेप्रमाणे आपापल्या जागांवर स्थानापन्न झाली असली तरी पहिल्या क्रमाकासाठी निवडलेल्या 'शारदा' ह्या नाटकाला प्रथम क्रमाक मिळावा, ही गोष्ट अपेक्षाभंग करणारी आहे. स्पर्धेत नंबर मिळणे न मिळणे ही गोष्ट एकवेळ गौण समजावी लागेल, इतकी दुसरी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट यातून व्यक्त झाली आणि ती म्हणजे हा असा क्रमाक देण्यामुळे एका अत्यत प्रामाणिक, समंजस, नेटक्या, सुवक आणि जिद्दीच्या प्रयोगावर फार मोठा अन्याय झाला.

हे नाटक म्हणजेच मेडिकल कॉलेजच्या कलामडळाने सादर केलेले "लोभ नसावा ही विनती!" खरोखर असा दर्जेदार प्रयोग या स्पर्धेत केव्हाही दिसला नाही आणि म्हणूनच त्याच्या परीक्षकाच्या लेखी मिळालेल्या अपयशावद्दल असमाधान वाटते. अशा या प्रयोगात वैशिष्ट्ये तरी काय होती, या गोष्टीचा विचार करण्यापूर्वी त्याची जागा मिळविणाऱ्या 'शारदे'च्या प्रयोगात किती वैगुण्ये होती, हा विचार करणे अत्यत महत्त्वाचे ठरेल.

## न रंगलेले 'शारदा'

कै. देवल यांनी लिहिलेल्या सगीत शारदेत त्यातील गद्याइतकेच संगीतही सहजपूर्ण आणि कथेला यत्किंचितही बाध न आणणारे आहे. इतकी भावमधुर आणि सुयोग्य पदे असलेली नाटके फारच थोडी आहेत. अशा या शारदेचा प्रयोग सादर करताना पी. डी. ए ने या पदांना साफ काट दिला होता. त्या पदाचे बोजड गद्यात रूपांतर केले होते. साहजिकच प्रयोगाने अपेक्षित परिणाम घडविला नाही. नाटकात रगत आली नाही. या नाटकात शारदेच्या रूपाने तत्कालीन बालकुमरिकांची करुण कहाणी उभी करण्याचा लेखकाचा हेतू आहे, पण प्रयोग सादर करण्यातील तोल बिघडल्याने नाटक शारदेचे न वाटता रंगेल, श्रीमंताचे वाटले. या मूलभूत गोष्टीवद्दलच संस्थेचे प्रयत्न अयशस्वी ठरले, ही गोष्ट परीक्षकानी विचारात घेतली नाही काय? दिग्दर्शन, अभिनय या गोष्टी चांगल्या होऊनही त्यांचे चीज झाले नाही.

या पार्श्वभूमीवर समजसपणे केलेला मेडिकलचा प्रयोग पाहून प्रेक्षक खरोखर मंत्रमुग्ध झाले. इतका जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न फारच क्वचित वेळा पाहायला मिळतो. असे हे नाटक आहे तरी काय? याच गोष्टीचा विचार करायचा! जॉन पेट्रीक याच्या 'हेस्टी हार्ट' या परदेशी नाटकावरून विजय तेंडुलकरांनी हे रूपातर केले आहे. या नाटकात युद्ध आघाडीवरील एका हॉस्पिटलमधील काही घटना चित्रित केलेल्या आहेत. या हॉस्पिटलच्या एका वॉर्डमध्ये विविध देशातील सैनिक असतात. एक ऑस्ट्रेलियाचा असतो, दुसरा अमेरिकन तर तिसरा ब्रिटिश, चौथा न्यूझिलंडचा आणि पाचवा आफ्रिकेचा! हे सर्वजण आपल्या व्याधी विसरून अगदी आनदात राहत असतात, मौज मजा करीत असतात. त्यांची नर्स मार्गरेट हीदेखील वरवर त्याना दटावत असली तरी सर्वांनाच सवलती देत असते. त्यांच्या आनदात अप्रत्यक्षपणे भाग घेत असते. एक दिवस त्या हॉस्पिटलचा अधिकारी या पाच लोकात एक स्कॉच सैनिक येणार असल्याची माहिती देतो आणि हा स्कॉच सैनिक काही दिवसच जगणार असल्याने त्याचे अखेरचे दिवस त्याला सुखात ठेवा, असे सर्वांना बजावून सागतो. वास्तविक स्कॉच माणसे यापैकी कोणालाच आवडत नसतात. त्याच्या आगळ्या स्वभाववैशिष्ट्यामुळे, पण केवळ अधिकाऱ्याचा हुकूम आणि काहीशी माणुसकी म्हणून सर्वजण त्या गोष्टीला तयार होतात. तो येताच त्याची खुशामत करू लागतात, पण हा तरुण लॅची अतिशय माणूसघाणा आहे. त्याच्यावर आजवर कोणीही प्रेम केलेले नसते आणि याचमुळे त्याच्या सहकाऱ्याचे ते वागणे त्याला असह्य होते, तो चिडतो, पण हळूहळू त्याला सर्वांबद्दल आपुलकी वाटू लागते. विशेषत: मार्गरेटबद्दल तर त्याला विशेष आकर्षण निर्माण होते. तिला तो चक्क लग्नाबद्दलच विचारतो आणि तीदेखील त्याच्या अखेरच्या दिवसांत त्याचे मन मोडायचे नाही या विचाराने त्याला होकार देते. लॅची फारच आनंदात असतो आणि अचानक त्याला वरिष्ठांकडून त्याच्या मृत्यूचे रहस्य समजते. त्याला त्या गोष्टीचे दु:ख होण्याऐवजी सर्वांनी त्याच्यावर केलेली माया ही खोटी होती, हे कळते आणि तो भडकतो. तो कॅम्प सोडून जाण्याची इच्छा व्यक्त करतो. कळत न कळत त्याच्याबद्दल प्रेम निर्माण झालेले सैनिकही हा निर्धार ऐकून अस्वस्थ होतात. लॅचीला खरी माया जाणवते व तो आपले मत बदलून टाकतो आणि अखेरचे दिवस त्याच्याच सहवासात घालविण्याचे ठरवितो.

नाटकाचे कथानक हे असे आहे. त्यात वेगाने आकार घेणारी कथा नाही, हाच त्यातील एकमेव दोष! नाटकात घटना फारच थोड्या घडतात. एरवी सर्व वेळ चर्चा चालते आणि हीच चर्चा काही वेळा प्रेक्षकांच्या मनाची पकड सैल करण्यास कारण ठरते. मूळ नाटकाचे तेंडुलकरानी केलेले हे भाषांतर शक्यतोवर शब्दश: करण्याचा प्रयत्न केला असावा. पात्रांची नावे मूळ नाटकाप्रमाणेच इग्रजी ठेवण्याचा उपक्रम अभिनदनीय वाटतो. अर्थात अशा तऱ्हेने प्रयोग सादर करणे अतिशय कष्टाचे आणि धाडसाचे ठरावे. कारण ही पाश्चात्त्य पात्रे आपल्या प्रेक्षकाच्या मनात ठसणे फार कठीण आहे. कारण त्यांचे विनोद, त्यांच्या लकबी, सारेच काही आपल्या प्रेक्षकामध्ये रस निर्माण करण्यास कठीण आहेत. म्हणूनच दिग्दर्शक मोठा धाडसी, मेहनती आणि कल्पक असणे अत्यंत जरूरीचे होते.

## महत्त्वाकांक्षी दिग्दर्शक

जब्बार पटेल यांच्याजवळ हे सारेच गुण आहेत आणि म्हणूनच प्रयोग अतिशय देखणा झाला. नाटकासाठी वापरलेला सेटही नावीन्यपूर्ण होता. स्टेजवर सहा खाटा मांडल्यामुळे हालचालींना या नाटकात फारच थोडा वाव होता. तरीदेखील त्या थोड्या जागेतही पात्रांच्या हालचाली मनमोकळ्या ठेवण्याचे कौशल्य साधण्यात पटेल फारच चांगल्या तऱ्हेने यशस्वी ठरले. दीपयोजनेच्या बाबतीतही त्याचा उपक्रम अभिनदनीय होता.

असा प्रयोग सादर करण्यात दिग्दर्शक जसा महत्त्वाकांक्षी आणि जिद्दीचा हवा, तसे कलाकारही समजूतदार आणि प्रामाणिक असणे अत्यंत जरूरीचे होते. याबाबतीतही कलामडळ भाग्यवान होते. सर्व पात्रे सुयोग्य होती. विशेष म्हणजे त्या त्या देशांतील व्यक्तिवैशिष्ट्ये थोड्याबहुत प्रमाणात तरी व्यक्त करणारी होती. विशेषत: निग्रो सैनिकाचे काम

## स्पर्धेत दुर्लक्षित झालेले उत्तम नाटक

# "लोभ नसावा ही विनंती"



**जब्बार पटेल**

करणारा सुरेश देशपांडे अगदी अस्सल आफ्रिकन वाटला. मार्गरेटचे काम करणाऱ्या शोभना जोशी प्रथमदर्शनी त्या भूमिकेला अनुकूल वाटत नव्हत्या, तरी कामाची समज आणि अभिनय या वैशिष्टयामुळे त्यांनी भूमिका स्मरणीय केली. यांकीचे काम करणारे वाटवे तर सर्वोत्कृष्ट वाटले. एखाद्या अमेरिकन तरुणाच्या हालचालीतील सहजता त्यांच्याजवळ दिसली. ते दिसलेही देखणे! याच जोडीला मुद्राभिनयही उत्तम होता. एकंदरीत त्यांच्या कामाला तोड नव्हती. जब्बार पटेल यांच्या लँचीच्या कामात त्यांच्या पूर्वीच्या कामांची थोडी छाप दिसून आली. ही गोष्ट त्यांना सहज दूर करता आली असती. तेवढे सामर्थ्य त्यांच्यात जरूर आहे, पण नाटक दिग्दर्शित करण्याच्या गर्दीत स्वतःच्या कामाविषयी विचार करायला त्यांना वेळ मिळाला नसावा. एकंदरीत दिग्दर्शन आणि अभिनय या दोनही दृष्टीने नाटकात उणीव काढावी, दोष दाखवावे अशा गोष्टी फारच थोडया होत्या.

प्रयोग सादर करण्यात जरूर ती लय आणि तोल साधण्यातही पटेल उत्तम तऱ्हेने यशस्वी ठरले. प्रयोगाच्या दृष्टीने जरूर ते सर्व घटक उत्तम तऱ्हेने वापरून त्यांची मांडणीही विचारपूर्वक केल्याने ह्या दोनही गोष्टी वैशिष्टयपूर्ण ठरतात.

स्पर्धेतील प्रयोगाचे वेळी तो सुरू केल्यानंतर दूरध्वनिक्षेपणव्यवस्थेत काही गोंधळ निर्माण झाल्याने चालू प्रयोग बंद करावा लागला आणि मग पुन्हा काही वेळाने सुरू झाला. ही गोष्ट स्पर्धेतील मनावरील ताण लक्षात घेता फारच परिणामकारक ठरली असती. एखादा गाधासुधा कच्चा दिग्दर्शक असता, कलाकारांना आत्मविश्वास नसता तर सर्वचजण गडबडले असते आणि मग प्रयोगाची अवस्था विलक्षण केविलवाणी झाली असती, पण पुन्हा सुरू झालेल्या प्रयोगात या आधीच्या गोष्टीचा यत्किंचितही परिणाम कोणावर दिसला नाही. तितक्याच सहजतेने आणि आत्मविश्वासाने प्रयोग सादर केला. खरोखर ही गोष्ट अनुकरणीय आणि अभिनंदनीय वाटते.

एकंदरीत हा असा समर्थ आणि सफाईदार प्रयोग पाहिल्यावर प्रत्येक प्रेक्षकाने मनोमन तरी याच प्रयोगाला प्रथम क्रमांक दिलेला आहे.

● ● ●

क्रीडा

# सिलोनी पाहुणे आणि निवड समिती

भारताच्या दौऱ्यावर असलेल्या सिलोनच्या क्रिकेट संघात, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, इंग्लंड व पाकिस्तान यांच्या संघाबरोबर खेळताना नाव मिळविलेले फक्त चारपाचच खेळाडू अंतर्भूत झालेले आहेत. मायकेल टिस्सेरा (२५) या तरुण खेळाडूने सिलोनी संघाचे नेतृत्व यापूर्वी पाकिस्तानविरुद्ध केलेले आहे. फलंदाज म्हणूनच केवळ नव्हे तर बदली गोलंदाज म्हणूनही तो गोलंदाजी करू शकत असल्यामुळे या सिलोनी संघात त्याच्याकडे नेतृत्व ओघानेच आलेले आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध शतक व ऑस्ट्रेलियाविरुद्ध अर्धशतक करणाऱ्या या संघनायकाचा खेळ हाच या दौऱ्याचे प्रमुख आकर्षण राहणार आहे. एडवर्ड (२६) व पोन्निआ (२२) हे दोघे आघाडीचे खंदे फलंदाज समजले जातात. यापैकी एडवर्ड हा यापूर्वी इंग्लंड, ऑस्ट्रेलिया व पाकिस्तान यांच्या वेगवान गोलंदाजांना यशस्वी तोंड दिलेला फलंदाज आहे व त्यामानाने पोन्निआ हा नवखा असला तरी पाकिस्तानी गोलंदाजांना त्याने नामोहरम केलेले असल्यामुळे सिलोनच्या संघाची सुरुवात तरी दमदारच राहील. कारण एकतर सध्या निवडसमितीने, राजणे, देसाई यांसारख्या काही अंशाने नव्यानेच कसोटी सामन्यात खेळणाऱ्या फलंदाजांचे काळ ठरणाऱ्या वेगवान गोलंदाजांची कसोटी सामन्यातून जवळजवळ हकालपट्टीच केलेली आहे व जयसिंहा किंवा सुरती हे नवा चेंडू... नियमाप्रमाणे सुरवातीला घ्यावा लागतो म्हणून केवळ हाती घेतात! वेगवान गोलंदाजांचे निवड समितीने चालवलेले दुर्लक्ष, भविष्यकाळात आत्मघातकी ठरल्याशिवाय राहणार नाही. या तिघांव्यतिरिक्त लीव्हर्स (२१) याने गोलंदाज म्हणून पाकिस्तानविरुद्ध चांगली कामगिरी बजावलेली आहे व पोलोनोव्हिटा (२६) हा डावखुरा फिरकी गोलंदाज म्हणून थोडेफार नाव मिळवून आहे. दौऱ्यात अगदी शेवटच्या क्षणी निवडला गेलेला जयसिंगे हा गोलंदाज व फलंदाजी डॉ. फर्नांडो (३१) हा यष्टिरक्षक, हे चौघे या संघातून बरी कामगिरी करतील अशी अपेक्षा होती.

पहिल्या दोन कसोटी सामन्यांच्या निकालांकडे दृष्टी टाकली तर वरील पाचसहाजणांनीच चांगली कामगिरी केल्याचे ध्यानात येते. दोन्ही सामन्यांत एडवर्ड व पोन्निआ यांनी आघाडीचे फलंदाज म्हणून चांगली कामगिरी केली आहे. टिस्सेरा व जयसिंगे यांनी एका सामन्यात शतकेच झळकावली व लिव्हर्स, पोलोनोव्हिटा यांची गोलंदाजी बरी पडली. भारतासारख्या तूर्त तरी बलाढ्य

# क्रिकेटच्या क्षेत्रात महाराष्ट्रीय कर्तृत्व मागे खेचले जात आहे !



१. टिस्सेरो. ४. लीव्हर्स.

२. पोन्निआ. ५. एडवर्ड.

३. पोलोनोव्हिरा. ६. फरनॅन्डो.

असणाऱ्या संघाने हे दोन्ही कसोटी सामने जिंकले यात काहीच आश्चर्य नाही. सिलोनविरुद्ध खेळले जाणारे तिन्ही कसोटी सामने एकतर्फी होणार असाच अंदाज होता. पहिला सामना एका डावाने जिंकल्यावर निवडसमिती पुढच्या दोन्ही सामन्यांतून पुष्कळच नवीन खेळाडूंना संधी देईल अशी अपेक्षा होती.

दुसऱ्या कसोटी सामन्यात इंद्रजितसिंगला वगळून पुनश्च इंजिनीअरला घेण्यात आले. सरदेसाई जाऊन त्याचे जागी पोद्दार, नाडकर्णीच्या जागी वेंकटराघवन् व दुराणीचे जागी सुब्रह्मण्यम् असे फेरबदल झाले. या बदलातील पहिला बदल हा खऱ्या अर्थाने बदलच नव्हे. कारण फरुक इंजिनीअरची जागा ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध निश्चित असताना त्याला का डावलण्यात आले, हे कुणालाच कळलेले नाही ! निवड समितीने पर्यायाने असे ठरवलेले दिसते की सिलोनसारख्या दुय्यम दर्जाच्या संघाविरुद्ध इंजिनीअरला घ्यावे व इंद्रजितसिंगची जागा प्रथमश्रेणीच्या संघाविरुद्ध राखीव ठेवावी ! हा फरुक इंजिनीअरवर अन्याय आहे. वस्तुतः फरुक इंजिनीअरला ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळण्याची संधी देऊन सिलोन संघाविरुद्ध इंद्रजितसिंगजीसारख्या तरुण यष्टिरक्षकाबरोबरच एखाद्या सामन्यात ज्ञानेश्वर आगाशे यासारख्या अगदी नवख्या यष्टिरक्षकाची चाचणी व्हावयास हवी होती. पोद्दार, वेंकटराघवन व सुब्रह्मण्यम् ही नावे ऑस्ट्रेलियन संघाविरुद्ध निवडलेल्या पंधरा नावांतही नव्हती. अशा या अगदी नवख्या होतकरू खेळाडूंची चाचणी सिलोनी संघाविरुद्ध करण्याचे जे निवड समितीने ठरवले ते अत्यंत योग्यच केले. आमची तक्रार एवढीच की या तिन्ही जागांत निदान एका तरी पश्चिम महाराष्ट्रातील फलंदाजाला किंवा फलंदाजी व गोलंदाजी करू शकणाऱ्या खेळाडूला अशी संधी द्यावयास हवी होती. अजित वाडेकर, शरद दिवाडकर, ज्ञानेश्वर आगाशे, हेमंत कानिटकर, सदानंद मोहोळ, कृष्णा हवालदार या खेळाडूंनी रणजी करंडक सामन्यात निदानपक्षी पोद्दार, सुब्रह्मण्यम्, वेंकटराघवन यांच्याइतकी कामगिरी निश्चितच केलेली आहे. पश्चिम विभाग रणजी करंडक सामन्यात मुंबई, महाराष्ट्र, बडोदे व गुजराथ या भागांतील जवळजवळ सर्वच आजीमाजी कसोटी खेळाडू खेळत असतात. या पश्चिम विभागातून पुढे येणाऱ्या खेळाडूंना विलक्षण स्पर्धा करावी लागते. बरोबर याच्या उलट स्थिती उत्तर व दक्षिण विभागात असल्यामुळे, पश्चिम विभागांतून रणजी करंडक सामन्यातून पुढे येणारे खेळाडू हे इतर खेळाडूंपेक्षा काकणभर सरसच असतात. या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्रातील खेळाडूंवरही निवड समितीने अन्याय केला आहे.

बारकाईने पाहणाऱ्याच्या हे लक्षात येईल, की प्रत्येक वेळी कसोटी सामन्यात नवा घेतला जाणारा खेळाडू हा कसोटी संघातून एकाएका पश्चिम महाराष्ट्रातील खेळाडूला ' उच्चू ' देत आहे. एकावेळी भारताच्या कसोटी संघात इंजिनीअर, कॉन्ट्रॅक्टर, उम्रीगर, सरदेसाई, मांजरेकर, बोर्डे, नाडकर्णी, देसाई, रांजणे अशी आठ-नऊ नावे पश्चिम विभागांतील अशी आढळत असत. आता अचानक या विभागाकडे निवड समितीने दुर्लक्ष केलेले दिसते.

याच कारणासाठी पतौडीला जेव्हा मागल्या दाराने कप्तानपदावर आणण्यात येऊन बोर्डे-नाडकर्णींवर अन्याय झाला, तेव्हा आम्ही त्याविरुद्ध टीका केली होती. (माणूस फेब्रु. १९६४) ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात पतौडीनेच नाडकर्णी-बोर्डेवर अन्याय करून दुराणीचे फाजील लाड केले अशी टीका आता सुरू झालीच आहे. जे घडते ते काही नियमांनुसार घडते. दोन महाराष्ट्रीय खेळाडूंच्या हातीतोंडी आलेला कप्तानपदाचा घास जेव्हा हिरावला गेला व तो पचला तेव्हाच हे निश्चित झाले की क्रिकेटच्या क्षेत्रातील महाराष्ट्रीयन कर्तृत्व आता मागेच खेचले जाणार. क्रिकेटच्या खेळातील कर्तृत्वाचा वारसा महाराष्ट्राकडे दैववशात आलेला असल्यामुळे, महाराष्ट्रीय खेळाडूंवरील अन्यायाबाबत अगदी प्रांतीय दृष्टीने टीका करणेही क्रमप्राप्तच होते. टीका केवळ प्रांतवादाच्या आहारी जाऊन करावयाचा इरादा नाही. तसे असते तर हॉकी संघातही एखादा ' गायकवाड ' किंवा 'गोखले' घ्यावा असा लाडिक आग्रह आम्ही धरला असता. आमचे म्हणणे इतकेच की जिथे या खेळातील कर्तृत्व अमाप पिकत आहे, त्या भूभागावर निवडसमितीने आकसाने अन्याय करू नये.

• • •



ऐन परीक्षेत मृत्यूचे बोलावणे

# उदात्त तत्त्व

## एक उत्कृष्ट झेकोस्लोव्हाकियन चित्रपट

दि. २८-११-१९६४ रोजी 'पुणे सिने क्लब' च्या वतीने पुणे इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात "Vyssi Princip" (Higher principal–उदात्त तत्त्व) हा झेकोस्लोव्हाकियन चित्रपट दाखवण्यात आला. 'लोकार्नो फिल्म फेस्टिव्हल १९६१' मध्ये या चित्रपटाला पारितोषिक मिळालेले आहे. या चित्रपटात प्रमुख भूमिका करणाऱ्या फ्रॅन्टिसेक् स्मोलिक् या अभिनेत्याला व्हेनिस येथील चित्रपटमहोत्सवात त्याच वर्षी अध्यक्षांचे सुवर्णपदक मिळालेले आहे.

झेकोस्लोव्हाकिया हा ज्या वेळी नाझींनी बळकाविलेला होता, त्यावेळच्या पार्श्वभूमीवर या चित्रपटातील घटना घडतात. एक माध्यमिक शाळेतील लॅटिन भाषा शिक्षकाची ही कहाणी पाहात असताना, नाझी राजवटीतील अमानुषता आणि सुसंस्कृत मानवता यांतील लढ्याचे विदारक चित्र प्रेक्षकांपुढे साकार होते.

**कथा —**

चित्रपटाची सुरवात होते तेव्हा 'प्राग' येथे नाझी पोलीस जनरल हायड्रीच (Heydriche) याचा खून पडलेला असतो. या नाझी अधिकाऱ्याच्या खुनामुळे देशभर सुतक जाहीर झालेले असते. झेकोस्लोव्हाकियातील एका शहरात माअिलेक् (Maelek) हा लॅटिन प्राध्यापक आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना पुनःपुन्हा हे सांगत असतो की "विद्यार्थ्यांची प्रत्येक कृती ही उदात्त तत्त्वानुसारच नेहमी घडली पाहिजे." त्याच्या या उपदेशाचा अतिरेक पाहून, त्याची थोडी गंमत करण्यासाठी विद्यार्थी माअिलेकची एक पुतळ्याची आकृती तयार करतात. त्यावर शीर्षक देतात, "केवळ उदात्त तत्त्वासाठी" आणि हे चित्र विद्यार्थी शाळेच्या दर्शनी भागातच काचेच्या कपाटात ठेवतात.

रस्त्यातून गस्त घालणाऱ्या गेस्टॅपो पोलिसांची नजर या शीर्षकाकडे जाते. त्याला संशय येतो की हायड्रिचचा खून हा 'उदात्त तत्त्वानुसार झाला,' असे सुचवण्याकरता जर्मनविरोधी विद्यार्थ्यांनी ऐन सुतकात हे घोषवाक्य शाळेच्या दर्शनी भागात ठेवलेले आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या केलेल्या गंमतीतून केवढी शोकांतिका निर्माण झाली पाहा! गेस्टॅपोची चक्रे फिरू लागतात.

गेस्टॅपोच्या हुकमानुसार विद्यार्थी ते चित्र मोडून तोडून टाकतात. परंतु ते करीत असताना वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या जनरल हायड्रिचच्या छायाचित्राला ते दाढीमिशा काढून विद्रूप करण्याचे कामही पोरकट रागाच्या भावनेने करतात. शाळेतील जर्मनधार्जिण्या विद्यार्थ्यांमार्फत हे वृत्तपत्राचे पान गेस्टॅपोच्या हाती जाते. ज्या विद्यार्थ्यांनी ही दाढीमिशा काढण्याची गंमत केलेली असते, ती मुलं सर्व विसरून, मॅट्रिकच्या परीक्षेच्या अभ्यासात दंग होऊन जातात.

मॅट्रिकची परीक्षा सुरू होते. पेपर वाटले जातात. माअिलेक् सर आपले विद्यार्थी लॅटिनमध्ये हमखास पास होणार, या आनंदात विद्यार्थ्यांमधून फिरत असतात. एवढ्यात शाळेबाहेर गेस्टॅपोची मोटार थांबते. ऐन परीक्षेतून रिसानेक (Rysanek), व्हलासिक् (Vlaslik) व आणखी एक निरापराध विद्यार्थ्याला त्यांनी हायड्रिचचे चित्र विद्रूप केले म्हणून नाझी गेस्टॅपो पकडून नेतात. माअिलेक् त्यांना विनवतो, "फक्त एवढी परीक्षा पुरी होऊ द्या. हे विद्यार्थी निरपराध आहेत," त्याच्या विनवण्याकडे कुणी लक्ष देत नाही.

रिसानेकची विधवा आई मिसेस रिसानेक ही लोकांचे कपडे धुऊन मुलाचे शिक्षण करीत असते. व्हलासिकचा बाप प्रेतवाहक पेट्या तयार करणारा गरीब सुतार असतो. अर्धपोटी राहून मुलांच्या शिक्षणासाठी राबणाऱ्या या पालकांना आपल्या मुलांना नाझींनी पकडून नेले, त्याचा एकच अर्थ माहीत झालेला असतो आणि तो म्हणजे पुन्हा या मुलांची नावनिशाणीदेखील हे नाझी मांग आपल्याला सांगणार नाहीत. रिसानेकची वर्गमैत्रीण जाना ही रिसानेकवर प्रेम करीत असते. तिचा बाप वकील असतो. शहरातील नाझी गेस्टॅपो प्रमुखाची व त्याची ओळख असते.

जाना व माईलेक् हे दोघेजण रिसानेक व त्याचे दोन मित्र यांचे प्राण वाचावे म्हणून मोठा धोका पत्करून गेस्टॅपो-प्रमुखाच्या भेटीला जातात. सुदैवाने हा गेस्टॅपो-प्रमुख एक उत्तम लॅटिनचा स्कॉलर असतो. त्यामुळे माईलेक् व तो एकदम मनाने जवळ येतात. परंतु गेस्टॅपो-प्रमुख हा अखेर नाझी संघटनेतील एक हुकमाचा ताबेदार असतो. त्याला हुकूम असतो की झेकोस्लोव्हाकियात नाझी अधिकाऱ्यांचे खून व्हावेत, या गोष्टीला आळा बसावा म्हणून रोज अमुक इतक्या लोकांना गोळ्या घातल्या गेल्या पाहिजेत. काही

व्यापारी, काही मजूर, काही विद्यार्थी यांना रोज गोळ्या घालण्याचे सत्र त्याने आरंभलेले असतेच. त्याप्रमाणे या तिघा विद्यार्थ्यांचा दिवसही नक्की झालेला असतो.

गेस्टॅपो-प्रमुख हा लॅटिन भाषा शिकलेला आहे, उदात्त तत्त्वांची त्याला ओळख आहे, हे पाहून माईलेकला आशा वाटू लागते. दुसऱ्या ओझरत्या भेटीच्या वेळी हा गेस्टॅपो-प्रमुख माईलेकला सांगतो, "निर्णय झाला आहे." (Decision has been taken) माईलेक् या बोलण्याचा अर्थ असा घेतो की रिसानेक आदि तीन विद्यार्थ्यांना गोळ्या घालण्याचा हुकूम फिरवण्याचा निर्णय झाला आहे.

जानासह माईलेक याच समजुतीने मोठ्या उत्साहाने परततो. रिसानेकच्या आईला व व्हलासिकच्या बापाला भेटायला जाऊन "मुल सुटणार" ही आनंदाची बातमी सांगण्याची कामगिरी तो जानावर सोपवतो व समाधानाने घरी जातो.

हे हत्याकांड सुरू झाल्यापासून व्हलासिकच्या बापाचे काम फार वाढलेले असते. रात्रंदिवस तो शवपेटिका तयार करत असतो. सध्या तयार करत असलेल्या पेट्यामध्येच आपल्या पोटचा गोळा व्हलासिक व त्याचा मित्र रिसानेक याच्याही पेट्या आपल्या हातूनच तयार होताहेत, याची त्याला काय कल्पना ?

तिघाही विद्यार्थ्यांना गोळ्या घालण्यात येतात. रिसानेक व व्हलासिक मोठ्या धीर वृत्तीने हात बांधून उभे राहतात. तीन उघड्या शवपेटिका त्यांच्या मृत देहाची वाट पाहात वधस्थानी ठेवलेल्या असतात. बाकीच्या बंद झालेल्या असतात. त्यांचा तिसरा मित्र मात्र भीतीने गर्भगळित झालेला असतो. बंदुकीच्या दस्त्यांनी ढकलीत त्या तिघांना वधस्थानाकडे नेत असताना हा तिसरा विद्यार्थी त्या पोलिसांची करुणा भाकू लागतो, "अहो, मी निरपराध आहे हो, मला मारू नका–" तेव्हा रिसानेक त्याला ओरडून सांगतो, "अरे, आपण सर्वच निरपराध आहोत. आता मरायचच आहे तर उगाच या डुकरांच्या (Swines) पाया पडण्याचे पाप तरी कशाला करतोस ?" मशिनगनच्या माऱ्याने या तिघाही विद्यार्थ्यांच्या शरीराच्या चाळणी होतात.

ध्वनिक्षेपकांवरून या तिघा विद्यार्थ्यांची नावे मारल्या गेलेल्या इतर नावांबरोबर जाहीर होतात, तेव्हा माईलेकच्या लक्षात येते की नाझींनी आपला विश्वासघात केला आहे. या विचारासरशी त्याच्या मनाचा तोलच सुटतो. रिसानेकची आई "Give back my child, '(माझा मुलगा द्या !)' असा आक्रोश करीत नाझी तुरुंगापुढे नाझी द्वाररक्षकावर दगड फेकीत असताना, रक्षकाच्या गोळीला बळी पडते. रिसानेकच्या आईचा हा भीषण मृत्यू, तिच्या मागोमाग तिला आवरण्यासाठी धावणारी जाना आपल्या डोळ्यांनी पाहते. मिसेस रिसानेकचे प्रेत ते द्वाररक्षक फराफरा ओढीत तुरुंगाच्या आवारात घेतात व दरवाजा बंद होतो.

माईलेक थिजलेल्या मनाने शाळेत येतो. शाळेच्या विद्यार्थ्यांनी जे देशविघातक (?) कृत्य केले, त्याचा सर्व शिक्षकांनी निषेध करावा असे फर्मान नाझीकडून शाळेला आलेले असते शाळेचे प्रिन्सिपॉल आणि इतर शिक्षक (जर्मन भाषेचे शिक्षक सोडून) 'आता काय करावे' या विचारात असताना माईलेक ही कामगिरी पत्करतो

शिक्षक वर्गावर येतात. सगळा वर्ग कसेबसे अश्रू आवरून माइलेककडे पाहात असतो. जाना तर दु:खावेगाने धड उभीसुद्धा राहू शकत नाही. माइलेकला सरकारी हुकूम असतो, "झालेली घटना योग्य त्या स्वरूपात विद्यार्थ्यांपुढे मांडा." (Put the deed in proper perspective) म्हणजे थोडक्यात सरकारला हवा तसा खोटा इतिहास सांगा. जे देशातले मांग आहेत, त्यांना देशभक्त म्हणा, जे देशभक्त होते, त्यांना नराधम म्हणा !! निरपराध्यांना अपराधी ठरवा !!!

जुन्या लॅटिन ग्रंथांतून माइलेक् याने अनेकदा विद्यार्थ्यांना ही गोष्ट शिकवलेली असते की, "हम करेसो कायदा म्हणणाऱ्याचा खून करून त्याला दूर करणे हा गुन्हा नाही." (Removal of a tyrant by murder is no crime.) सर्व विद्यार्थी आपल्या वृद्ध शिक्षकाकडे पाहात असतात की यावेळी माइलेक् काय सांगणार ? एका बाजूला नाझीच्या पाशवी शक्तींचा धाक आणि दुसऱ्या बाजूला उदात्त तत्त्वे आणि मानवता ! माइलेक् काय निवडणार ? माइलेक् बोलू लागतो, "your comrades have been executed. Let the blood of your comrades fall upon the heads of these murderers"

["तुमच्या मित्रांना गोळ्या घातल्या गेल्या आहेत. तुमच्या मित्रांचे हे सांडलेले रक्त या नराधमांना रक्ताचा अभिषेक ठरो !"]

सर्व विद्यार्थ्यांचे डोळ्यातले अश्रू डोळ्यातच थबकतात. खाली गेलेल्या माना निमिषार्धात ताठ होतात. नाझी अन्यायाशी कधीही तडजोड करणार नाही, या विचाराचा स्फुल्लिंग या सर्व तरुण अन्त:करणात एकाच क्षणी पुनश्च धगधगू लागतो.

चित्रपटाची ही अखेर. अत्यंत तेजस्वी !

**चित्रण**

चित्रपटातील ही कथा अगदी सरळ उलगडत जाते. हायड्रिच खुनामुळे देशभर पसरलेले दहशतीचे वातावरण, तिघा विद्यार्थ्यांच्या वधाचा प्रसंग हे इतक्या वास्तवपूर्णरीतीने चित्रित केले आहेत, की प्रेक्षकांना हे प्रसंग यावत्‌जन्म विसरता येणे कठीण. पोटच्या गोळ्याचा मृत्यू झाल्यानंतर वेडीपिशी झालेली आई पाहताना भावना आवरणे केवळ अशक्य होते. या सर्व शोककारक घटनांच्या पार्श्वभूमीवर वावरणारा तो प्रेमळ, ज्ञानदानात रमणारा लॅटिनचा शिक्षक मात्र सतत उदात्त तत्त्वाचा आधार शोधणारा ! जेव्हा त्याची खात्री पटते की नाझी राजवट ही जगात जे जे काही उदात्त ते ते पायाखाली तुडवणार आहे, तेव्हा त्या वयोवृद्ध शिक्षकाच्या तोंडून अखेरची शापवाणीच येते. जी शापवाणी पवित्र माणसे उच्चारतात, त्यांचे सामर्थ्यही कमी नसते.

**अभिनय**

Jan Drda या लेखकाच्या कथेवरील हा चित्रपट केवळ दीड तासच चालतो. नाचगाणी नसल्यामुळे एवढी लांबी पुरेशी होते. Jir Krigak याचे उत्कृष्ट दिग्दर्शन, स्मोलिक (माइलेक्), इव्हॅन मिस्ट्रीक (रिसानेक), जाना ब्रेजस्वेव्हा (जाना) यांचा उत्कृष्ट अभिनय यामुळे हा चित्रपट विलक्षण उंची गाठतो. कथालेखक व दिग्दर्शक या दोघांनीच पटकथा तयार केली आहे. यामुळेच चित्रपटातील एकही दृश्य अनावश्यक वाटत नाही.

ज्यांना संधी मिळेल त्यांनी हा चित्रपट पाहिल्याशिवाय राहू नये.

—महेश

• • •

● स्वातंत्र्योत्तर कालानंतर १९६४ चे मध्यास भारतात नवीन पर्वास सुरवात होईल हे प्रस्तुत लेखकाने मागील वर्षी केलेले भाकित पं. नेहरूंच्या निधनामुळे दुर्दैवाने खरे ठरले.

● " जास्तीत जास्त या (१९६४) वर्षाअखेरपर्यंत क्रुश्चेव्ह याचे राजकीय जगतात प्रभुत्व राहील. त्यानंतरच्या काळात मात्र अशुभ योगास सुर वात आहे, " या श्री. केळकर यानी आधीच एका वृत्तपत्रातून प्रसिद्ध केलेल्या भाकिताचीही प्रचीती आलेलीच आहे.

● श्री. केळकर याच्या मताने १९६४ साल हे सत्तांतराचे साल होते (इंग्लड, जपान ही आणखी दोन उदाहरणे).

● १९६५ साल कसे जाईल हे ते येथे सांगत आहेत.




# १९६५ साल कसे जाईल ?


लेखक :

श्री. के. केळकर

बी. ए.


१९६५ सालातील ग्रहस्थितीचा विचार करता नैसर्गिक सकटाचे तसेच आतरराष्ट्रीय राजकारणात खळबळजनक वर्ष जाणार असे दिसते.

**ग्रहणे** · १९६५ सालात एकंदर चार ग्रहणे आहेत. त्यापैकी दोन सूर्यग्रहणे व दोन चद्रग्रहणे आहेत. ती कोठे दिसतील व कोणकोणत्या राशीचक्रात होत आहेत त्याचा तपशील सोबतचे तक्त्यात दाखविला आहे. २३ नोव्हेंबरचे सूर्यग्रहण भारतीय नेत्याना, विशेषत: केंद्रीय मंत्रिमंडळातील व्यक्तीना अशुभ दर्शविते. मे ३१ चे सूर्यग्रहण अर्थ व गृहखात्यात बदल दाखविणारे ठरेल.

**रविसंक्रमणे :** मेदिनीय ज्योतिषात रविसंक्रमणांना विशेष महत्त्व आहे. सर्व संक्रमण पत्रिकेत रवी या राजकीय ग्रहाचे स्थान विशेष शुभ असल्याने भारत सरकार अनेक अडचणीतून यशस्वी तऱ्हेने मार्ग काढून वेळोवेळी निर्माण होणाऱ्या घटनास मुत्सद्देगिरीने तोंड देऊन आपले अस्तित्व अबाधित ठेवील.

**मकर संक्रमण :** ता. २२ डिसेंबर १९६४ रोजी रात्री १–५७ ला रवी (सायन) मकर राशीत गेला आहे. या पत्रिकेत मंगळ, हर्शल व प्ल्यूटो हे तिन्ही ग्रह ११ व्या स्थानात आहेत. त्यामुळे अचानक पेचप्रसग, मत्रिमंडळात आजारीपण, सत्ताधारी पक्षात फूट व कलह माजणे व त्यामुळे मत्रिमंडळात अचानक बदल घडण्याची शक्यता दिसते. सप्तमातील गुरूमुळे भारताच्या परराष्ट्रीय धोरणास मात्र आगळे महत्त्व येणार आहे.

**मेष संक्रमण :** ता. २२ मार्च १९६५ रोजी रवी मेष (सायन) राशीत १–३७ वा. रात्री येत आहे. या सक्रमण पत्रिकेत वक्री मंगळ, हर्शल, व प्ल्यूटो नवमस्थानानजीक आहेत. राजकीय मुत्सद्दी, लष्करी, नाविक, डॉक्टर्स तसेच लोखंड व पोलाद धंद्यातील श्रेष्ठीना अशुभ दर्शविणारे आहेत. चालू वर्षाचे अंदाजपत्रकांत शेतीविषयक वस्तूचे उत्पादनासाठी विशेष महत्त्व दिलेले आढळून येईल. सोशॅलिस्टिक करयोजना समाजवादाच्या चौकटीत बसणारी आढळून येईल.

**कर्क संक्रमण :** ता. २१ जूनला रवी कर्क (सायन) राशीत रात्री ८–२६ ला येत आहे. मंगळ, हर्शल व प्ल्यूटो हे तिन्ही ग्रह पुन्हा या







पत्रिकेत अष्टमात असून शनि-चंद्राचे प्रतियोगात आहेत. ते मेष-संक्रमणाप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांना, विशेषत: महाराष्ट्रातील पुढाऱ्यांना शुभ नाहीत. सप्तमातील बुध-शुक्रामुळे आणखी एक स्त्री-उमेदवाराची मंत्रिमंडळात भर होणार आहे. अन्नधान्य परिस्थिती चिघळण्याचा योग आहे.

**तूळ संक्रमण** : ता. २१ सप्टेंबरला रवी तुळेत सकाळी ११-३६ ला येईल. चतुर्थातील वक्री शनी दशमावरील प्ल्यूटो-हर्शल व चंद्राशी प्रतियोग करत आहे. भारत सरकारला अचानक निर्माण झालेल्या पेचप्रसंगांना तोंड द्यावे लागेल. अविश्वासाचा ठराव पुन्हा एकदा लोकसभेत गाजण्याची शक्यता आहे. परंतु रवी या ग्रहाची स्थिती फार जोरदार असल्याने अविश्वासाचा ठराव फेटाळला जाऊन सरकार आपले धोरण बरोबर असल्याचे आत्मविश्वासाने मांडण्यात यशस्वी होईल.

## महत्त्वाच्या अमावास्या व पौर्णिमा

जानेवारीची अमावास्या तृतीयात होत असल्यामुळे वाहतुकीचे साधनात, विशेषत: विमान अपघात ता. १५ पर्यंत होण्याची शक्यता आहे. १७ जानेवारीचे पौर्णिमेचे पत्रिकेत द्वितीय ग्रहाधिष्ठित असल्यामुळे भारताचे अर्थखात्यात महत्त्वाचे फेरबदल घडतील. तसेच ११ वे स्थानातील मंगळ-प्ल्यूटोमुळे केंद्रिय मंत्रिमंडळातील मतभेद चव्हाट्यावर येतील. फेब्रुवारीची अमावास्या पंचमात होत असल्याने मुलांचे साथीचे रोग महाराष्ट्र, मध्यप्रदेश व मद्रास यात फैलावण्याची शक्यता आहे. ३ मार्चचे अमावास्येच्या पत्रिकेत धनस्थान व अष्टमस्थाने बिघडली असल्याने सर्वच बाबतीत असंतोष आढळेल. आगी व स्फोट यामुळे मृत्युसंख्या मार्चच्या दुसऱ्या पंधरवड्यात विशेष दिसेल. २ एप्रिलची अमावास्या लग्नबिंदूवर होत असल्याने एप्रिलचे पहिल्या पंधरवड्यात दक्षिण भारत भूकंपाने हादरेल. मे महिन्याचे दुसऱ्या आठवड्यात मंत्रिमंडळात महत्त्वाचे फेरबदल होतील. मे चा पहिला आठवडा, जुलै व ऑगस्ट या महिन्यात चीन व पाकिस्तान यांनी सीमोल्लंघनाचे केलेले प्रकार उघडकीस येतील. २३ नोव्हेंबरची अमावास्या लाभात पडत असल्यामुळे मंत्रिमंडळातील व राजकीय पुढाऱ्यांना अत्यंत अनिष्ट आहे.

## हर्शल-प्ल्यूटो युती

शनिकक्षेपलीकडील या दोन ग्रहाचा शोध बराच काल खगोल शास्त्रज्ञांना लागलेला नव्हता. १७८१ साली हर्शलचा, तर १८३० साली प्ल्यूटोचा शोध लागला. आतापर्यंतच्या अभ्यासावरून क्रान्ती हा हर्शलाचा स्थायीभाव आहे. अणुशक्तीचा कारक म्हणून प्ल्यूटो ओळखला जातो. संहार, परिवर्तन व (संहारोत्तर) उभारणी हे त्याचे गुणधर्म आहेत.

**अण्वस्त्रे संवर्धनासाठी की नाशासाठी ?**: हर्शल आणि प्ल्यूटो या दोन ग्रहांत युतीसारखा अशुभ योग अलीकडील काळात झालेला नाही. ही युती प्रथम ऑक्टोबर १९६५ चे पहिल्या आठवड्यात होत असून पुढील वर्षी म्हणजे १९६६ साली मार्च व जुलैमध्ये होत आहे. राशिचक्रातील कुंभ राशीवर हर्शलाचा अमल असून प्ल्यूटोचा वृश्चिक राशीवर आहे. वृश्चिक ही गूढ, कपटी व विकारदायक, तर कुंभ ही शास्त्रीय, स्वतंत्र व क्रान्तिकारक रास आहे. अशा दोन मंदगती ग्रहांची युती सायन **कन्या व निरयन सिंहेत** होत आहे. त्यामुळे **अण्वस्त्रांचे संशोधन मानवी जीवनाच्या संवर्धनासाठी की नाशासाठी हा कूट आणि क्रूर प्रश्न** नजीकच्या काळात सुटणार आहे.

**इतर अशुभ योग** : हर्शल, प्ल्यूटोच्या संगतीत वक्री व भूमध्य सानिध्य असलेला युद्धप्रवर्तक मंगळ १९६५ चे पहिले तिमाहीत म्हणजे मार्चअखेर आहे. याच्या जोडीला निरयन कुंभ-सिंहेतून शनी-मंगळ प्रतियोग, ३० मार्च व २८ मे या दिवशी होणार आहे. तसेच रवी-शनी युती फेब्रुवारी १९६५ व रवी-शनी प्रतियोग जून, सप्टेंबर व नोव्हेंबरमध्ये होत आहे. तक्त्यात दाखविलेल्या ग्रहणाचा विचार करिता, जागतिक शांतता कितपत तग धरून राहील याची शंकाच आहे असे म्हणण्यापेक्षा जागतिक शांतता नांदणे अशक्यच आहे, असे




म्हणावेसे वाटते. यूनोसारखी जागतिक संघटनासुद्धा या अशुभ ग्रहांच्या तडाख्यात कितपत टिकून राहील हा प्रश्नच आहे.

**अशुभ काल :** फेब्रुवारी ते मे १९६५ आणि ऑक्टोबर १९६५ नंतरचा काल जागतिक शांततेचे दृष्टीने काळजी उत्पन्न करणारा आहे. अणुयुद्ध होऊन अखिल मानवजात नष्ट होईल, असे जरी दिसत नसले तरी अण्वस्त्राचा उपयोग स्वरक्षणाच्या नावाखाली का होईना काही राष्ट्रे करतील, असे वाटते. खालील शहरे व देश प्रामुख्याने अणुसहाराच्या तडाख्यात सापडण्याची शक्यता आहे.

**देश :** टर्की, वेस्ट इंडिज, तायग्रीस व युफ्राटिस नद्यांच्या खोऱ्यातील भाग, ग्रीस, ब्राझील, इजिप्त, पश्चिम इंग्लंड, अरेबिया, स्पेन, पोर्तुगाल, सहारा, आफ्रिका रशिया, अमेरिका.

**शहरे :** जेरुसलेम, पॅरिस, बोस्टन, लास् एंजल्स्, सॅन फ्रान्सिस्को इ.

**युतीची दुसरी बाजू :** परमेश्वरकृपेने अणुयुद्ध खरोखरीच न व्हावे असे कोणासही वाटणे स्वाभाविक आहे. तरीपण या अशुभयोगातून जग सर्वस्वी सुटेल असे वाटत नाही. आतापर्यंत झालेल्या चाचणी-अणुस्फोटाचे परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत. ही युती सायन कन्येत होत असल्यामुळे जागतिक आरोग्य व अन्नधान्यावर परिणाम होईल. तसेच मीनेतील अशुभ शनीमुळे भूपृष्ठावर व समुद्रात फार मोठ्या प्रमाणात विमान अपघात, मानवाच्या आवाक्याबाहेरील नैसर्गिक व भूकंपासारख्या आपत्ती येतील.

**भारतात नवीन पर्वास सुरवात**

राशिचक्रातील मकर या अमलाखाली भारताचा भाग येतो. सध्या शनी स्वतःच्या कुंभ राशीतून व भारताच्या द्वितीय स्थानातून १९६५ सालअखेर भ्रमण करीत आहे. भारताचे नाव अलिप्ततेचे धोरणाबद्दल आशिया, आफ्रिका व युरोपियन राष्ट्रात प्रख्यात आहे. कुंभेच्या शनीच्या उरलेल्या काळात म्हणजे १-१॥ वर्षात भारत शास्त्रीय संशोधनात प्रगती करून नवीन पर्वास सुरवात करील. आपल्या शेजारील राष्ट्रांनी दिलेल्या आव्हानाचा स्वीकार करून अण्वस्त्र तयार करण्याचे उद्योगात तो गढलेला राहील.

**अन्नधान्य स्थिती :** १९६३ साल भारताला कसे जाईल या लेखात १९६३ सालासापासूनच भारतात हळूहळू रेशनिंग सुरू होईल असे भाकीत केले होते. निरयन कृत्तिकेचा अन्न-धान्याशी संबंध आहे असा जुन्या ग्रंथात पुरावा सापडतो. या दृष्टीने विचार करता गुरू कृत्तिकेत आल्यापासून अन्नधान्याचा प्रश्न जास्त जिकिरीचा झाला असे दिसून येते. अद्याप कृत्तिका नक्षत्रातून गुरूला जाण्यास ७/८ महिने तरी अवकाश आहे. थोडक्यात ऑगस्ट-सप्टेंबरचे सुमारास अन्नधान्यात थोडीबहुत सुधारणा होईल. याहीपेक्षा वृषभेत गुरू असेपर्यंत तो शनीचे शुभ योगात येतो. १९६६ चे एप्रिलमध्ये संपूर्णतया सुधारणा झालेली आढळेल.

**महाराष्ट्र :** महाराष्ट्राची रास, माझे मते **निरयन धनु** आहे. महाराष्ट्रात वैचारिक वा शारीरिक संघर्ष चालू असला तरच त्याची प्रकृती ठीक राहते. लढा व सत्याग्रहाबाबत महाराष्ट्र भारतात प्रख्यात आहे, असे इतर प्रांतीय लोक म्हणतात. युद्धप्रवर्तक मंगळ हर्शल-प्ल्यूटोवर वक्रीस्थितीत निरयन सिंहेत जूनअखेर आहे. याही काळात म्हणजे एप्रिलअखेर गुरू मेषेत आहे. नंतर मात्र तो षष्ठात जाईल व महाराष्ट्रात काही कारणामुळे चळवळीस सुरवात होईल. ऑगस्टनंतर मात्र महाराष्ट्रात काहीतरी विशेष फायदा झालेला आढळून येईल. वरील जून-जुलैअखेर महाराष्ट्रास एक दोन नेत्यास मुकावे लागण्याची शक्यता आहे. मुंबई शहराची रास माझे मते सायन वृश्चिक आहे. सायन वृश्चिकेत मंगळ सप्टेंबरचे शेवटचे आठवड्यात येईल. त्यावेळी मुंबईच्या बातम्यांनी वृत्तपत्राचे रकाने भरतील असे दिसते. पुण्याची रास, माझे मते सायन कन्या १३ आहे. वक्री मंगळ मार्च ते एप्रिल पुण्याचे लग्न बिंदूवरून जाताना पुन्हा एकदा सनसनाटी बातमी निर्माण करणार नाहीना, असे वाटते. चालू वर्षी महाराष्ट्राला उन्हाळा विशेष जाणवण्याची शक्यता आहे.

**रशिया :** पंतप्रधान 'क्रुश्चेव्ह' यांना राजकीय जीवनातून ऑक्टोबर १९६४ मध्ये निवृत्त व्हावे लागेल, या माझ्या अचूक भाकितामुळे व तसेच अलीकडील काळात रशियात घडलेल्या घटनांमुळे रशिया निरयन कुंभ राशीखाली येतो, याची खात्री पटली आहे.

१९६५ सालात सिंह-कुंभेतून शनी-मंगळाचा प्रतियोग दोन वेळा होत आहे, तसेच सिंहेतील हर्शल-प्ल्यूटो युती पुन्हा एक दोनवेळा रशियात नाट्यपूर्ण घटना निर्माण करील, असे वाटते. हा काल फेब्रुवारी ते मे च्या दरम्यानचा असेल.

**चीन :** १९६४ चे भविष्यात चीन अण्वस्त्राचे तयारीत आहे, हे भाकीत केले होते. चीनने ऑक्टोबरमध्ये केलेल्या अणुस्फोटाने ते अक्षरशः खरे झाले आहे. त्यामुळे आशिया व सर्व जगातील राष्ट्रांना धक्काच बसला आहे. चीनचे पुढारी माओ यांना अण्वस्त्रयुद्धानंतर नवीन अशा "सांस्कृतिक" व "सुंदर" जगाची उभारणी करावयाची आहे. परंतु त्यांचे पत्रिकेतील शुभ योग दिवसेदिवस कमी होत असल्यामुळे चीनचे राजकारणात त्यांचा फारकाल प्रभाव राहीलसे दिसत नाही. या दृष्टीने डिसेंबर १९६४ व मे १९६५ हा काळ त्यांना विशेष काळजीचा आहे.

सध्या चीनच्या यूनोप्रवेशाबाबत फार मोठे प्रयत्न सुरू आहेत. यूनोची पत्रिका व चीनची सायन कर्क रास लक्षात घेता सायन कर्केत गुरू गेल्यावर (१९६६) हे प्रयत्न सफल होतील असे दिसते.

## १९६५ सालातील ग्रहणे

| ग्रहण | वेळ व तारीख | सायन रास | कोठे दिसेल |
|---|---|---|---|
| सूर्य | मे ३१ २-४३ रात्री | मिथुन-९ | न्यूझीलंड, सेंट्रल अमेरिका मेक्सिको, व्हेनेझुएला, कोलंबिया |
| चंद्र | जून १४ ७-३० सकाळीं | धनु-२२ | पॅसिफिक महासागर, दक्षिण अमेरिका, उत्तर अमेरिका, आफ्रिका |
| सूर्य * | नोव्हेंबर २३ ९-४२ सकाळीं | धनु-१ | अरेबिया, भारत, इन्डोनेशिया आस्ट्रेलिया. |
| चंद्र | डिसेंबर ८ १०-५२ सकाळीं | धनु-१६ | युरोप, आफ्रिका, हिंदी महासागर. |

* हे ग्रहण भारताचे दृष्टीने अशुभ.

**पाकिस्तान**—एकंदरीत विचार करता पाकीस्तानाची रास निरयन वृषभ असावी असे वाटते. वृषभ राशीतील १९६५ मधील राहूचे प्रथम त्या देशाला अत्यंत अशुभ आहे. राजकीय वातावरण तंग व घडामोडीचे राहून अत्यंत अस्थिर परिस्थिती राहील. लोकांच्यांतील असंतोषामुळे खूनासारख्या प्रकारांनी उग्र रुप धारण करील. नेतेपणांत बदल होण्याची दाट शक्यता आहे.

अशातऱ्हेने या वर्षाला नैसर्गिक संकटातून व दिव्यातून जावे लागणार आहे, असे दिसते. रोफेलसारख्या ज्योतिर्विदांना मंदगती ग्रहाचे युति-प्रतियोगमुळे एक नवे तत्त्वज्ञान निर्माण होईल, की ज्यामुळे अखिल मानवजातीवर त्याचा पगडा दीर्घकालपर्यंत टिकून राहील, असे वाटते. सरजामशाही, मांडवलशाही, वसाहतवाद व पर्वापर्वाचा समाजसत्तावाद या वळणावळणाने चाललेला मानवसमूह तिसऱ्याच एका तत्त्वज्ञानाने भारला जाईल काय ? काही ज्योतिर्विदांना मेडिकल शाखेत कॅन्सरसारख्या असाध्य रोगावर अजिंक्य असे संशोधन निघेल असे वाटते. या सर्व विचारांची सत्यता ठरविण्यास काळ हा एकच समतोल असा न्याय दर्शविणारा शास्ता आहे. !! ●●●


श्री. केळकर
यांचा आगामी
२६ जानेवारी
जनता विशेषांकातील
स्फोटक लेख

# राशिभविष्य... एक नवे थोतांड आहे काय?

# राजकीय घडामोडी

## शोध आणि बोध

### १ : केनेडी खुनाची चौकशी

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ् केनेडी यांच्या खुनाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या वॉरेन कमिशनने गेल्या ऑक्टोबरात आपला अहवाल सादर केला. अमेरिकन नेते व वृत्तपत्रांच्या प्रतिक्रिया पाहिल्या तर या अहवालाने त्यांचे समाधान झालेले दिसते, पण या अहवालाने संपूर्ण सत्य उजेडात आलेले नाही, असे मानणाऱ्या मंडळीतही जगातील काही थोर विचारवंत मंडळी आहेत. विख्यात तत्त्ववेत्ते बर्ट्रांड रसेल यांनी कमिशनच्या अहवालाबद्दल काही शंका व्यक्त केल्या. ऑक्सफर्ड विद्यापीठातील अर्वाचीन इतिहास विषयाचे प्राध्यापक ह्यू ट्रेव्हर रोपर यांनी लंडन संडे टाइम्स पत्राच्या १३ डिसेंबरच्या अंकात एक लेख लिहिला असून चौकशीतील कच्च्या दुव्यांकडे लक्ष वेधले आहे. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे सत्यसंशोधनाचे दृष्टीने महत्त्वाचे वाटतात. या ऐतिहासिक घटनेचे सर्व धागेदोरे समजण्याचे दृष्टीने वॉरेन कमिशन अहवाल आणि त्याची दुसरी बाजू दोन्ही समजून घेणे आवश्यक आहे.

**कमिशनचे प्रमुख निष्कर्ष**

केनेडींच्या खुनानंतर सातच दिवसांनी म्हणजे २९ नोव्हेंबर १९६३ ला वॉरेन कमिशन नेमण्यात आले. दहा महिन्यांनी या कमिशनने आपला अहवाल सादर केला. कमिशनने ५५२ साक्षीदार तपासले. प्रत्येकी ५०० पानांचा असे २६ खंड या साक्षीपुराव्याचेच आहेत. या प्रचंड साक्षीपुराव्याची छाननी करून कमिशनने पुढील निष्कर्ष काढले.

☐ केनेडींच्या खुनाचा राजकीय कट झालेला नव्हता. ली हार्वे ओसवाल्ड (केनेडींचा खुनी) किंवा जॅक रुबी (ओसवाल्डचा खुनी) यांनी याबाबतीत कोणाही देशी किंवा परदेशी व्यक्तींशी संधान बांधून कट रचला नव्हता.

☐ ज्या गोळ्यांनी केनेडी ठार झाले व गव्हर्नर जॉन कोनाली जखमी झाले त्या ली हार्वे ओसवाल्डने झाडल्या. हा खून आखण्यात व पार पाडण्यात त्याला कोणीही मदत केल्याचा पुरावा कमिशनला आढळला नाही. ओसवाल्डला या कामासाठी एखाद्या परदेशी सरकारने प्रवृत्त केले किंवा एखाद्या परदेशी सरकारचा तो हस्तक होता, असा पुरावा मिळालेला नाही.

☐ डलासमधील काही उजव्या गटांनी केनेडींबद्दल व्यक्त केलेली कट्टर मते किंवा डलास शहरातील उजव्या गटांच्या अतिरेकीपणाने निर्माण झालेले वातावरण याचा ओसवाल्डने केलेल्या केनेडींच्या खुनाशी काही संबंध होता, याला पुरावा नाही.



अंधारी स्वप्न बुडाले

**ओसवाल्डची मानसशास्त्रीय चिकित्सा**

खुनामागे डाव्या किंवा उजव्या गटाचा कट नव्हता, तर मग ओसवाल्डने हा खून कशासाठी केला ? कमिशनच्या चौकशीत हाच सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता. त्याचे उत्तर शोधण्यासाठी कमिशनने ओसवाल्डसंबंधी पुराव्यात मिळालेली सर्व माहिती एकत्र करून त्याची मानसशास्त्रीय दृष्टीने छाननी केली आहे.

ओसवाल्डला ओळखणाऱ्या माणसांना ती एक साधी निरुपद्रवी व्यक्ती वाटे, पण आपण मोठे आहोत, मोठे होणार, अशा त्याच्या स्वतःविषयी कल्पना होत्या. कधी तो स्वतःला 'सेनापती' समजे, तर कधी राजकीयद्रष्टा समजे. वीस वर्षांनी मी पंतप्रधान होईन, असे तो म्हणे. इतिहासातल्या थोर पुरुषांशी तो स्वतःची तुलना करी. आपण एवढे मोठे असताना परिस्थितीने दडपले गेलो, असे त्याला वाटे. या परिस्थितीविरुद्धचा त्याचा संताप व तिटकारा हिंसक कृत्यातून व्यक्त होई.

वडील वारल्यानंतर दोन वर्षांनी तो जन्मला. पित्याचे छत्र त्याला लाभले नाही. आई काहीशी एककल्ली होती. ओसवाल्ड १६ व्या वर्षी आरमारात भरती झाला. तो कोणात मिसळत नसल्याने सहकाऱ्यांना



**ओसवाल्ड**
**शत्रुत्वाची भावना, आक्रमक वृत्ती आणि वैफल्य**

तो लाजाळू आहे, असे वाटे, पण तो तसा नव्हता. एकदा पिस्तूल जवळ बाळगल्याबद्दल व दुसऱ्यांदा एका सार्जंटला शिवीगाळ केल्याबद्दल लष्करी कोर्टमार्फत त्याची चौकशी झाली होती. आरमारातून १९५९ साली मुक्त झाल्यावर तो रशियास गेला व त्याने रशियन नागरिकत्व मागितले. अमेरिकेबद्दलचा तिटकारा व्यक्त करताना एका पत्रात तो लिहितो, "युद्धात अमेरिकन सरकारच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या लष्करी गणवेशधारी कोणाही अमेरिकनास मी ठार करीन." रशिया त्याची हकालपट्टी करण्याच्या तयारीत असता मनगट कापून त्याने आत्महत्येचा अयशस्वी प्रयत्न केला. तेव्हा रशियन सरकारला त्याची दया येऊन त्यांनी त्यास रशियात राहू दिले. मिन्स्क येथील एका कारखान्यात त्याला काम दिले. तिथे मरीना प्रुसाकोव्हा या १९ वर्षांच्या तरुणीशी त्याची ओळख व लग्न झाले.

कामगाराचे जिणे जगण्यात त्याला समाधान वाटेना, तेव्हा रशियात १८ महिने काढल्यावर त्याने स्वदेशी जायचे ठरविले. डलासमध्ये कुटुंबासह तो राहू लागला. एका फोटोग्राफिक कंपनीत त्याला नोकरी लागली होती पण त्या जीवनातहि तो रमला नाही. त्याने ती नोकरी ६ एप्रिल १९६३ ला सोडली.

## ज. वॉकरच्या खुनाचा प्रयत्न

यानंतर चारच दिवसांनी मेजर जनरल एडविन वॉकर यांचा त्यांच्या घरी खून करण्याचा अयशस्वी प्रयत्न ओसवाल्डने केला. त्याची तयारी एकदोन महिने आधीपासून तो करीत होता. आपल्या वहीत त्याची रूपरेषाहि त्याने लिहिली होती. रात्री घराबाहेर पडताना मरीनासाठी लिहिलेल्या चिठीत त्याने म्हटले होते, "मी जिवंत राहिलो आणि मला पकडले तर सिटीजेलमध्ये ठेवतील." पण हा खुनाचा प्रयत्न अयशस्वी झाला. वॉकर आपल्या अभ्यासिकेत वाचीत बसले होते. खिडकीतून गोळी आत आली, पण वॉकर यांनी पुस्तक जवळून वाचण्यासाठी त्याचवेळी डोके खाली वाकविल्याने नेम चुकला. ओसवाल्ड मकास चेहऱ्याने घरी परतला. 'मी वॉकरला गोळी घातली' असे त्याने मरीनाला सांगितले.

यानंतर थोड्याच दिवसांनी क्यूबा कमिटीसाठी एक प्रदर्शन भरविण्याचा अयशस्वी प्रयत्न ओसवाल्डने केला, पण त्याच वेळी क्यूबात जाण्याचे विचार त्याच्या मनात चालू होते. तो २७ सप्टेंबरला स्वतः मेक्सिकोस गेला व तेथे सरळ क्यूबाचे वकिलातीत गेला. क्यूबाचा व्हिसा मिळविण्याचा त्याने प्रयत्न केला, पण यश आले नाही. मेक्सिकोत तो सात दिवस होता. तेथे केनेडींचा खून करण्याबाबत त्याने कोणाशीहि संधान बांधल्याचा पुरावा नाही.

## वैवाहिक जीवनात वैफल्य

ओसवाल्डचे वैवाहिक जीवनही विफल झाले होते. मरीनाला तो मारहाण करी. धूम्रपान करायचे नाही, मद्यपान करायचे नाही असे हुकूम सोडी. वैवाहिक जीवनात अपेक्षित असलेले सुख ओसवाल्डकडून तिला मिळत नव्हते. अठरा नोव्हेंबरला म्हणजे केनेडींचे खुनाच्या चार दिवस आधी टेलिफोनवर त्यांचे भांडण झाले. मरीना मिसेस रुथपेन यांच्याकडे व ओसवाल्ड एका बोर्डिंग हाउसमध्ये राहात असे. पण तो खोटं नाव धारण करून तेथे राहात आहे, असे कळल्यावर मरीना भडकली. तरीही तो तिच्याकडे अनेकदा येई, पण तिची बोलण्याची इच्छा नाही, असे दिसताच त्याचे येणे बंद झाले.

यानंतर २१ नोव्हेंबरला संध्याकाळी तो पुन्हा पेन यांचे घरी मरीनाचे भेटीस गेला. त्याने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण ती काहीच बोलेना, तेव्हा तो अस्वस्थ झाला. मध्यंतरी एक तास तो बाहेर गेला होता. बहुधा याच वेळी त्याने गॅरेजमध्ये जाऊन रायफलची घडी केली व ब्राउनपेपरच्या बॅगमध्ये ती ठेवली. या बॅगमध्ये 'पडद्याची दांडी' आहे असे सांगून दुसऱ्या दिवशी सकाळी तो आपल्या कामगिरीवर निघाला व त्याने ती पार पाडली !

## सारे जगच आपले शत्रू आहे असे वाटे

कमिशन शेवटी म्हणते, "केनेडींचा खून करण्यामागे ओसवाल्डचा एकच हेतू होता असे म्हणता येणार नाही. आपल्या भोवतालचे सारे जग आपल्याविरुद्ध आहे, आपल्याशी शत्रुत्व करीत आहे, असे त्याला वाटे. त्याला कोणाशी चांगले संबंध प्रस्थापित करता आले नाहीत. तो नेहमीच असंतुष्ट होता. खुनाच्या बराच काळ आधी अमेरिकन समाजाबद्दलचा तिटकारा त्याने व्यक्त केला होता. ज्या आदर्श समाजाच्या शोधात तो होता, तेथेही (रशियात) प्रथमपासून त्याची निराशा झाली. आपल्या काळाच्या पुढे असलेला थोर पुरुष म्हणून इतिहासात आपल्या नावाची नोंद व्हावी अशी त्याची आकांक्षा होती. मार्क्सवाद व कम्युनिझमवर त्याची निष्ठा होती. परिणामाची पर्वा न करता एखादे कृत्य निर्धाराने पार पाडण्याची कुवत आपल्यात आहे, हे जनरल वॉकर यांच्या खुनाच्या प्रयत्नाने त्याने दाखवून दिले. या व इतर अनेक घटकांतून केनेडींचा खून करणारी ली हार्वे ओसवाल्ड ही व्यक्ती घडत गेली."

ओसवाल्डच्या चरित्ररेखेच्याद्वारे कमिशनने खुनी माणसाच्या मनोभूमिकेचे चित्रच आपल्यापुढे उभे केले आहे. ओसवाल्डचे आपल्या पत्नीशी पटत नव्हते, हे एकच केनेडींच्या खुनाचे कारण आहे, असे

कमिशनला वाटत नाही. शत्रुत्वाची भावना व आक्रमक वृत्ती हे ओसवाल्डचे स्वभावविशेष पत्नीशी भेट होण्यापूर्वीपासूनचेच आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षासारख्या थोर व्यक्तीवर गोळ्या झाडण्याची अशी अनुकूल संधी त्याला पुन्हा कधीच मिळण्याचा संभव नव्हता. ती त्याने बरोबर साधली.

वॉरेन कमिशनच्या इतर भागात नवीन असे फारसे काही नाही. अध्यक्षाच्या संरक्षणाची काळजी घेण्यात डलास पोलीस, सुरक्षादल व एफ्. बी. आय. याच्याकडून झालेल्या ढिलाईबद्दल कमिशनने टीका केलेली आहे.

**संपूर्ण सत्य पुढे आले नाही**

कमिशनच्या अहवालातील कच्चे दुवे प्रा. ह्यू ट्रेव्हर-रोपर यांनी आपल्या लेखात स्पष्टपणे मांडले आहे. कमिशनपुढे सर्व पुरावा आला नाही. काही पुरावा दडवून ठेवण्यात आला. काही पोलिसानी नष्ट केला आणि खुनी ओसवाल्डचाच खून झाल्याने त्या सर्वांत महत्त्वाचा पुरावा नाहीसा झाला. अशा परिस्थितीत संपूर्ण सत्य शोधण्यात कमिशनला यश आले, असे ट्रेव्हर-रोपर यांना वाटत नाही.

**ओसवाल्डच्या जबाबाची टिपणेच नाहीत**

आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ प्रो. ट्रेव्हर-रोपर यानी मांडलेले काही प्रमुख मुद्दे—

☐ ओसवाल्डला अटक केल्यानंतर कॅ. फ्रिट्झ यानी त्याला सांगितले की तुला जबाब देण्याची सक्ती केली जाणार नाही. पण तू दिलेला जबाब तुझ्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरला जाऊ शकेल. ओसवाल्डचा बारा तास जाबजबाब घेण्यात आला, पण पोलिसानी त्याची टिपणे ठेवली नाहीत किंवा टेपरेकॉर्डिंग केले नाही, हे खरे असण्याची शक्यता नाही. कमिशनला हे रेकॉर्ड मिळाले नसेल तर पोलिसानी किंवा एफ. बी. आय्. ने ते नष्ट केले असले पाहिजे.

☐ अध्यक्ष केनडीना तपासणारे डॉ. ह्यूम यांनी अध्यक्षाना पुढच्या बाजूने गोळ्या झाडण्यात आल्या असे म्हटले होते. पोलिसानी प्रथम हेच गृहीत धरून तपास केला, पण फोटोवरून हे अशक्य दिसले तेव्हा गोळ्या मागून आल्या असल्या पाहिजेत, असा निष्कर्ष पोलिसानी काढला व डॉ. ह्यूम याना त्याप्रमाणे आपला मेडिकल रिपोर्ट जुळवून घेण्याबाबत त्याचे मन वळविले. पोलिसाच्या सांगण्यानुसार बदल न केलेला असा मूळचा मेडिकल रिपोर्ट उपलब्धच नाही. आपण आपले सर्व मूळचे कागद जाळून टाकले व त्याची नक्कल ठेवली नाही, असे शपथपूर्वक निवेदन (अॅफिडेव्हिट) डॉ. ह्यूम यानी केलेले आहे.

☐ टेक्सास स्कूल डिपॉझिटरी या इमारतीच्या सहाव्या मजल्याचे एका खोलीतून गोळ्या झाडण्यात आल्या, ही माहिती खुनानंतर काही मिनिटातच हॉवर्ड ब्रेनने सांगितली. असे असता ती खोली लागलीच तपासण्याचा प्रयत्न पोलिसानी का केला नाही? त्या इमारतीतील इतर खोल्याच्या तपासणीचे वेळी ही खोली तपासण्यात आली.

☐ ओसवाल्डने ज्या खोलीतून गोळ्या झाडल्या, त्या खोलीत एक खास तयार केलेली मोठी कागदी बॅग सापडली. या बॅगेमधूनच त्याने खोलीत रायफल आणली असा कमिशनचा निष्कर्ष आहे, पण ही बॅगही नष्ट करण्यात आली व तिच्या जागी तिची प्रतिकृती पोलिसानी

# कमिशनचे निष्कर्ष टिकणारे नाहीत

**— बर्ट्रंड रसेल**

प्रा. ट्रेव्हर-रोपर याचा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर केनेडी खुनाची चौकशी करीत असलेल्या ब्रिटिश कमिटीचे प्रमुख बर्ट्रंड रसेल यानी यासंबंधी 'सण्डे टाइम्स'च्या २० डिसेंबरचे अंकात एक पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, "वॉरेन कमिशन अहवालातील एकही मूलभूत निष्कर्ष टिकणारा नाही आणि सर्व महत्त्वाच्या बाबतीत प्रत्यक्ष पुरावा, कमिशनने दिलेल्या त्याच्या साराशाशी पूर्णपणे विसंगत आहे. गोळ्या कोणत्या दिशेने आल्या व टिपिटचा खून या घटनासंबंधी महत्त्वाच्या साक्षीदारांच्या साक्षीच घेण्यात आल्या नाहीत. टिपिटच्या खुनाशी संबंधित म्हणून ओसवाल्डचे वर्णन रेडिओवर प्रसृत करण्यात आले. पण टिपिटच्या खुनापूर्वी तीस मिनिटे आधी हे वर्णन प्रसृत करण्यात आले होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

**खुनामागे एकापेक्षा अधिक व्यक्ती**

(केनेडीच्या खुनासाठी) ओसवाल्डने ज्या रायफलीचा उपयोग केला असे सांगण्यात येते त्या रायफलीने खून होण्यासारखा नाही हे विचारात घेता, तसेच कमिशनने दिलेली गोळ्याची दिशा आणि केनेडीचे जाकीट व शर्ट यांना पडलेली भोके यांचा मेळ जमत नाही याचा विचार करता, कमिशनला आपला निष्कर्ष सिद्ध करण्यात यश आलेले नाही. एवढेच नव्हे तर अध्यक्षांचा खून करण्यात एकापेक्षा अधिक व्यक्तीचा हात होता असे सिद्ध करण्यात कमिशन अहेतुकपणे यशस्वी झाले आहे.

ड्रेफ्रच्या बाबतीत (सत्य शोधून काढण्यासाठी) झोलाला बारा वर्षे झगडावे लागले. अधिकाऱ्याचे दडपण, वृत्तपत्रांचा विरोध अशा प्रतिकूल परिस्थितीत केनेडींच्या खुनाची चौकशी करणारे श्री. लेन यांनी एका वर्षात ओसवाल्डच्या बाबतीत बरेच साध्य केले आहे.

आमच्या समितीसाठी डल्लासमध्ये कार्य करणारे स्वतंत्र संशोधक सारखा नवीन पुरावा पुढे आणीत आहेत. 'केनेडींना कोणी ठार केले?' या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपणाला आता फार काळ वाट पहावी लागणार नाही अशी मला आशा आहे" ● ● ●

तयार करून घेतली. ती खऱ्याप्रमाणे असेलही, पण याबाबतीत पोलीस सांगतील त्याशिवाय दुसरे प्रमाण नाही.

☐ ओसवाल्डचा खुनी जॅक रुबी डलास पोलिसांचा निकटचा सहकारी होता. हा खून केजमेंटमध्ये झाला. तेथे रुबीने कसा प्रवेश मिळविला, याबाबत त्याचा जाबजबाब घेताना पोलिसांनी अनेक प्रश्न विचारले, पण तो काहीच सांगेना. एवढ्यात तीन पोलीस तेथे आले. मेनस्ट्रीटच्या बाजूने आपण आत आलो, असे रुबी आपल्याजवळ म्हणाल्याचे त्यांनी सांगितले व रुबीनेही नंतर तेच सांगितले. पण हा महत्त्वाचा पुरावा या तीन पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना लगलीच का कळविला नाही ?

यासारखे सत्यसंशोधनाचे दृष्टीने आवश्यक प्रश्न विचारण्याची टाळाटाळ कमिशनने केली आहे. पोलिसांच्या पुराव्याची कायद्याचे दृष्टीने व योग्य बौद्धिक कसोटी लावून छाननी कमिशनने केलेली नाही. यामुळे पोलीस रिपोर्टापलीकडे या अहवालाला महत्त्व नाही, असा निष्कर्ष प्रा. ट्रेव्हर-रोपर यांनी शेवटी काढला आहे.

## २ : केरळ निवडणुका

### काँग्रेसचा एक डाव फसला

केरळमधील निवडणुका पुढे ढकलण्याचा विचार मागे घेणे अखर लोकमताच्या दडपणामुळे सरकारला भाग पडले. पण लोकसभेत हे जाहीर करताना कायदा मंत्री ए. के. सेन यांनी असा आव आणला की जणू सरकारपुढे ही सूचनासुद्धा विचारासाठी नव्हती. पण या खुलाशाने कोणीहि जाणकार फसणार नाही. मंत्रिमंडळात वरच्या पातळीवर या सूचनेचा विचार झाला होता, हे आता उघड गुपित आहे.

केरळमधील निवडणूक परिस्थितीची पाहणी केल्यावर काँग्रेस नेत्यांना असे दिसून आले की—एकूण १२६ जागांपैकी जेमतेम ४० जागा सुद्धा मिळविणे काँग्रेसला कठीण जाईल. तेव्हा निवडणुका पुढे ढकलल्या तर काँग्रेसला तयारीला आणखी वेळ मिळेल, असा विचार काही नेत्यांच्या मनात आला. काँग्रेसच्या पराभवाचे भीतीने निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या, अशी टीका आपणावर होणार याची जाणीव या नेत्यांना होती. ही टीका टाळण्यासाठी, निदान तिची धार बोथट करण्यासाठी दोन प्रकारचे युक्तिवाद करण्यात येऊ लागले.

### धान्यपरिस्थितीची सबब

पहिला केरळपुरताच युक्तिवाद असा की केरळमध्ये सध्या धान्य-परिस्थिति विकट आहे. रेशनिंगच्या कामात बराच नोकरवर्ग गुंतलेला आहे, त्यात पुन्हा निवडणूक व्यवस्थेच्या कामास त्याला जुंपावयाचे म्हणजे रेशनिंगचे व्यवस्थेवर त्याचा परिणाम होईल, म्हणून सध्या निवडणुका पुढे ढकलणे जनतेच्या हिताचे होईल.

### व्यापक भूमिकेचा देखावा

दुसऱ्या युक्तिवादात अधिक व्यापक भूमिकेचा आव आणला होता. केरळमध्ये सध्या निवडणुका घेतल्या तर काँग्रेसचा पराभव होईल, अशा संकुचित, स्वार्थी दृष्टीने आम्ही या प्रश्नाचा विचार करीत नाही, तर अधिक व्यापक दृष्टीने या प्रश्नाकडे पाहात आहोत. दोन सार्वत्रिक निवडणुकांच्या दरम्यानचे काळात कोणत्याहि राज्यात पुन्हा निवडणुका घेण्याची प्रथा रद्द करावी, अशा व्यापक भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार चालू असल्याचे सांगण्यात आले. यावर प्रश्न असा उद्‌भवतो, की हा व्यापक विचार काँग्रेस नेत्यांना आजच का सुचला? १९६० मधील केरळ निवडणुकाचे वेळी किंवा १९६१ मधील ओरिसा निवडणुकांचे वेळी का सुचला नाही ? कारण त्यावेळी तो विचार काँग्रेसला सोयीचा नव्हता. केरळमध्ये कम्युनिस्टविरोधी लोकमताचा तवा तापला होता. तेव्हा आताच निवडणुका घेतल्या तर काँग्रेस विजयी होईल, असे काँग्रेस नेत्याना वाटत होते. म्हणून १९६० साली त्या पुढे ढकलल्या नाहीत. ओरिसामध्ये तर सार्वत्रिक निवडणुकीच्या केवळ एक वर्ष आधी घाईने निवडणुका घेण्याचे काही कारण नव्हते. पण समिश्र मंत्रिमंडळासाठी गणतंत्र परिषदेशी केलेली सोयरीक काँग्रेसला आता गैरसोयीची वाटू लागली होती. तेव्हा ती सोयरीक काँग्रेस नेत्यांनी मोडून टाकली आणि आताच निवडणुका घेतल्या, तर काँग्रेसला विजयाची खात्री असल्याने तेथे घाईने निवडणुका घेतल्या. केरळ आणि ओरिसात फेरनिवडणुका घेताना पक्षाचे हित आणि सोय हाच विचार काँग्रेसश्रेष्ठींच्या मनात प्रामुख्याने होता आणि आता निवडणुका पुढे ढकलण्याचा विचार करतानाहि तीच दृष्टी प्रामुख्याने होती. पण जागरूक लोकमताच्या दडपणामुळे हा डाव फसला.

### केरळ काँग्रेसची अगतिकता

केरळमधील निवडणुकाना आता दोन महिने राहिले आहेत, पण निवडणूक मोहिमेचे चित्र अजून स्पष्ट नाही. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत या प्रश्नाचा नुकताच विचार झाला व दुसऱ्या कोणत्याहि पक्षाचे किंवा गटाचे सहकार्य न घेता काँग्रेसने केवळ स्वतःच्या बळावर निवडणुका लढवाव्या असे ठरविले असल्याचे अध्यक्ष कामराज यांनी सांगितले. गेल्या निवडणुकीत काँग्रेस, प्रजासमाजवादी आणि मुस्लीम लीग याची संयुक्त आघाडी होती. सत्तेवर येण्यापुरता काँग्रेसने या पक्षाचा उपयोग करून घेतला आणि सधी मिळताच त्यांना बाजूला सारले असा अनुभव या पक्षांना आला असल्याने काँग्रेसला त्यांचे सहकार्य मिळणेच शक्य नव्हते. तेव्हा एकट्याने निवडणुका लढविण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे, तो स्वसामर्थ्याच्या जाणिवेतून नव्हे तर अगतिकेतून घेतला आहे.

डाव्यांच्या संयुक्त आघाडीत सामील व्हावयाचे नाही, पण विरोधी पक्षांची मते आपसात विभागली जाऊ नयेत यासाठी जागांच्या वाटणीचा करार करावयाचा अशी संयुक्त समाजवाद्यांची भूमिका आहे.

### डाव्यांच्या आघाडीतील मतभेद

डाव्यांच्या आघाडीत कोणाकोणाला घ्यावयाचे याबाबत उजव्या व डाव्या कम्युनिस्ट पक्षात बोलणी चालू आहेत, पण अजून एकमत झालेले नाही. मुस्लीम लीग व बंडखोर काँग्रेस गट यांचे सहकार्य घ्यावे, निदान जागांच्या वाटणीचा करार त्यांच्याशी करावा असा डाव्या कम्युनिस्टांचा आग्रह आहे. पण या दोन गटांशी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करण्यास उजवे कम्युनिस्ट तयार नाहीत.

—समीक्षक

• • •



भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

# राजा शिवछत्रपती

राजहंस प्रकाशन

प्रसिद्धीच्या वाटेवर

४१९ नारायण पेठ, पुणे २

# अल्पबचत मोहिमेत महाराष्ट्र आघाडीवर

महाराष्ट्राने पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजना कालावधीत आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षात एकूण २०० कोटी रुपये गोळा करून स्पृहणीय कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्रातील जनता अल्पबचतीचा उच्चांक प्रत्येक वर्षी पूर्ण करीत आली आहे. त्यामुळेच महाराष्ट्र अल्पबचतीत सतत आघाडीवर आहे. संरक्षण बचतीतील गुंतवणूक म्हणजे विजयासाठी केलेली बचत. आपण सारेच काही प्रत्यक्ष संरक्षण कार्यात सहभागी होऊ शकत नाही. परंतु अधिक बचत करून, ती संरक्षण बचतीच्या विविध योजनात गुंतवून राष्ट्राचे संरक्षण सामर्थ्य आपणास वाढविता येईल. संरक्षण बचत योजनेद्वारा आकर्षक दराचे करमुक्त व्याज मिळते. १० व १५ वर्षाच्या संचित मुदतीच्या ठेवीपासून प्राप्तीकरात सूट मिळते. तुमच्या बचतीद्वारा केवळ तुम्हालाच नव्हे तर तुमच्या देशालाहि सुरक्षितपणा प्राप्त होतो हे लक्षात असू द्या.

**अधिक बचत करा !**
**मुदतीपूर्वी पैसे काढू नका !!**

# तुम्हीं घरमालक असलां
# तरी
# भाडेकरूहि आहांत



तुमच्या मालकीचें घर असलें तरी त्याचवेळीं तुम्हीं भाडेकरूहि आहांत. कारण कदाचित तुम्हांला तुमच्या घराची दुरुस्ती अथवा डागडुजी करावी लागेल. तेव्हां या संभाव्य दुरुस्तीसाठीं तुम्हीं दरमहा थोडथोडी तरतूद केलेली बरी नाहीं का? संचित मुदतीच्या ठेवींच्या खात्यांत दरमहा तुम्हीं १० रुपये गुंतवीत गेल्यास १० वर्षांनीं तुम्हांला तुम्हीं भरलेल्या रकमेहून २५० रुपये अधिक म्हणजे एकूण १४५० रुपये मिळतील. त्यांतून तुम्हीं तुमच्या घराची डागडुजी करूं शकाल आणि तें नव्याप्रमाणें दिसूं लागेल.

तुम्हीं नियमितपणें आणि योजनाबद्ध रीतीनें सरकारच्या अल्पबचत योजनेंत पैसे गुंतवीत गेलांत तर अशा इतरहि अनेक गरजा भागविण्याला तुम्हांला तीं रक्कम उपयोगी पडेल.

SMALL SAVINGS
SS
SERVE THE STATE & YOUR FAMILY

## अल्प बचत

महाराष्ट्र सरकारच्या अल्पबचत संचालनालयातर्फे प्रकाशित

